मेहता मराठी
ग्रंथजगत

मार्च, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक तिसरा

जागतिक महिला दिन

तू तेव्हा तशी
तू तेव्हा अशी
तू बहरांच्या बाहूंची...

आवर्जून वाचावे



मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ज्येष्ठ अनुवादक उमा कुलकर्णी यांच्या कोल्हापूर येथील कला प्रदर्शनाचे उद्‌घाटन अनिल मेहता यांच्या हस्ते झाले.

पुण्यातल्या सर्वोच्च शिक्षण संस्थेचा प्रवास...'वाटचाल फर्ग्युसनची' या पुस्तकाचे माजी केंद्रीय गृह व न्याय सचिव डॉ.माधवराव गोडबोले आणि माजी केंद्रीय सचिव शीलाताई भिडे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

यावेळी संपादक डॉ. राजा दीक्षित आणि प्रकाशक सुनील मेहता यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मेहता मराठी ग्रंथजगत

। मार्च २०१७ । वर्ष सतरावे । अंक तिसरा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय ४

उपक्रम १२

आकाशस्पर्श
– रेणू गावस्कर २०

बाईपणाच्या पन्नास छटा
– शुचिता फडके ३०

मुक्त नको... जागी हो!
– प्रज्ञा ओक ३८

स्त्री-प्रधान साहित्याची मोहीनी
– रेश्मा कुलकर्णी-पाठारे ५०

अंतरीचे तेज...
– शीला कारखानीस ५८

बंदिनी : एका मनस्विनीचं...
– अंजली धर्माधिकारी ६४

उर्मिला – 'सखी' पुस्तकातून ७०

बहिणाबाईंची जीवनाभिमुख कविता ८८

स्मरण ९२

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

'ती'च्या चैतन्याची विविध रूपं

स्त्री ही पृथ्वीवरील चैतन्य आहे. आपल्या आजूबाजूला तिच्या या चैतन्यदायी अस्तित्वाचा अनुभव आपण घेतच असतो; पण साहित्यातून (पुस्तकांतून), विशेषत: स्त्रियांच्या आत्मकथनांमधून, त्यांच्या चरित्रांमधून 'ती'च्या या चैतन्याच्या खुणा उत्कटतेने प्रत्ययाला येतात. तर 'ती'च्या या चैतन्याची विविध रूपं अधोरेखित करणारी अनेक पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसने आतापर्यंत प्रकाशित केली आहेत. काही स्वतंत्र आत्मकथनं आहेत, काही अनुवादित आत्मकथनं आहेत, काही इतरांनी लिहिलेली चरित्रे आहेत. या सगळ्यातून जाणवणारं 'ती'चं चैतन्य तिच्या जीवनाशेतून प्रकटत राहतं. 'ती'च्या चैतन्यपूर्ण अस्तित्वाची या पुस्तकांमधून विखुरलेली विविध रूपं अनुभवण्याचा हा एक प्रयत्न.

आशा अपराद यांचा जन्म एका मुस्लिम कुटुंबात झाला. वडील सुधारक विचारांचे असल्यामुळे आशा अपराद यांचं शिक्षण सुरू होतं; पण दुर्दैवाने त्यांचे वडील लवकर वारले आणि बुरसटलेल्या विचारांच्या आईने त्यांचं बालपण हिरावून घेतलं. जळत्या लाकडाने त्यांच्या पायाला डागून त्यांना लंगडत चालणं भाग पाडलं. कोवळ्या वयात एका ड्रायव्हरशी लग्न लावून देऊन त्यांची सगळी स्वप्नं उधळून लावली. यथावकाश आशाजी चार मुलींची आई झाल्या. हे मनाविरुद्ध लादलं गेलेलं जीवन कंठत असताना चौथ्या मुलीच्या जन्माच्या वेळी त्यांची सकारात्मकता उसळून वर आली. त्या मुलीच्या जन्मानंतर त्यांनी एस.एस.सी.पासून शिक्षणाला सुरुवात केली आणि दहा वर्षांत त्यांनी एम.फिल.पर्यंत मजल मारली आणि नंतर प्राध्यापिका म्हणून त्या नोकरीला लागल्या. सकारात्मकतेचा हा प्रेरक प्रवास त्यांनी मांडला आहे, 'भोगले जे दु:ख त्याला...' या

त्यांच्या आत्मकथनातून.

असाच आणखी एका स्त्रीचा सकारात्मक प्रवास अनुभवता येतो ‘इराकहून सुटका’ या पुस्तकातून. इराकमध्ये जन्मलेल्या आणि सद्दामच्या भीतीने नंतर कुटुंबाबरोबर ऑस्ट्रेलियात स्थलांतरित झालेल्या लतिफाने स्वत:च हा प्रवास शब्दबद्ध केला आहे. अठरावर्षीय लतिफावर तिच्या मिखाईल नावाच्या लांबच्या नात्यातला भावाने केलेला बलात्कार,स्वत:च्या कौमार्यभंगाबद्दल तिने बाळगलेले मौन, आजोबा आजारी असल्याचं निमित्त सांगून तिच्या आईने तिला इराकमध्ये तिच्या वडिलांकडे नेऊन पोहोचविणे, त्यानंतर लतिफाचा सुरू झालेला बंदिवास, इराकमध्ये लग्नाच्या आधी मुलीची घेतली जाणारी कौमार्य चाचणी आणि त्यात ती पास झाली नाही तर तिला ठार मारून टकण्याची प्रथा, यामुळे अनेक चांगल्या स्थळांना लतिफाने दिलेला नकार, इराकमध्येही तिच्या जीवनात आलेले तरुण, पण त्यांनीही तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून बघणे, तिच्या आत्याच्या नवऱ्याने तिचा केलेला लैंगिक छळ, तिने पळून जाण्याचा प्रयत्न करताच तिच्या वडिलांनी तिला जीवे मारण्याचा केलेला प्रयत्न, शेवटी इराकमधील अमेरिकी सैन्याच्या मदतीने तिने स्वत:ची करून घेतलेली सुटका...लतिफाचा हा प्रवास जीवघेणा आणि अंगावर शहारे आणणारा आहे; पण आहे त्या परिस्थितीला शरण न जाता स्वत:च्या सुटकेचा तिने केलेला प्रयत्न खरोखरच तिचं धाडस आणि स्व-अस्तित्वाची जाणीव दर्शविणारा आहे.

जीवनाला अशाच धाडसाने सामोरी जाणारी आणखी एक स्त्री म्हणजे बेबी हालदार. सातवीतच शाळा सोडाव्या लागलेल्या बेबी यांचं लग्न त्यांच्यापेक्षा दुप्पट वयाच्या, अडाणी आणि मंद बुद्धी माणसाबरोबर लावून देण्यात आलं. पंचविशीतच त्या तीन मुलांची आई झाल्या. नवऱ्याचं वागणं असह्य झाल्यावर तीन मुलांसहित त्यांनी घर सोडलं आणि त्या काही घरांमध्ये मोलकरणीचं काम करायला लागल्या. अपार कष्टांतून आपल्या मुलांना वाढविणाऱ्या बेबी हालदार यांनी अल्पशिक्षित असूनही स्वत:ची जीवनकथा लिहिली. स्वत:बद्दल लिहावंसं वाटणं म्हणजेच स्वअस्तित्वाची जाणीव होणं.

नसीमा हुरजूक यांचं ‘चाकाची खुर्ची’ हे आत्मकथन म्हणजे स्वअस्तित्वाची तीव्र जाणीव आहे. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचं कमरेखालचं शरीर अचानक लुळं पडलं; पण नसीमाजी खचल्या नाहीत. त्यांनी केवळ स्वत:लाच सावरलं नाही तर अनेक अपंगांचं जीवन सावरण्यासाठी त्यांनी ‘हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड’ ही संस्था कोल्हापूर येथे सुरू केली. ती संस्था त्या समर्थपणे सांभाळत आहेत. धडधाकट माणसालाही लाजवेल असं नसीमाजींचं कर्तृत्व आहे. त्यांच्यातील हे चैतन्य अपंगांबरोबरच धडधाकट माणसालाही प्रेरणा देणारं आहे.

जिथे स्त्रीला वस्तू मानलं जातं अशा ठिकाणी जेव्हा एखादी लहान मुलगी तालिबान्यांच्या विरोधात पेटून उठते आणि त्यांच्या विरोधात आवाज उठवते, तिच्या शिक्षणासाठीही तिला लढा द्यावा लागतो, अशी एक मुलगी मलाला. शाळेतून परत येत असताना तालिबान्यांनी तिच्यावर गोळ्या झाडल्या; पण मृत्यूशीही ती झुंजली आणि जीवनाला परत सामोरं जाताना तिचं धैर्य कुठेही उणावलं नाही. ती निर्धाराने पुढे चालते आहे. तिच्या धैर्याची कहाणी वाचायला मिळते, ‘मी मलाला’ या सुप्रिया वकील अनुवादित पुस्तकात. येवढ्या लहान वयात नोबेल पारितोषिक मिळवण्याचं भाग्यही तिला लाभलं आहे.

तर स्त्रीच्या अस्तित्वाचा हा हुंकार, तिचं हे चैतन्य विविध प्रकारे जाणवून देणाऱ्या पुस्तकांपैकी आणखी एक पुस्तक म्हणजे ‘रुपेरी सिंधू’. बॅडमिंटनपटू सिंधूचं अतुल कहाते यांनी लिहिलेलं हे चरित्र आहे. भारतात क्रिकेट व्यतिरिक्त अन्य खेळांना फारशी अनुकूल नसलेली परिस्थिती आणि अशा परिस्थितीत रिओ ऑलिम्पिकमध्ये सिंधूने दाखवलेली चुणूक, एक खेळाडू म्हणून तिची झालेली जडणघडण यावर या पुस्तकातून प्रकाश टाकला आहे. आजच्या काळात स्त्रियांच्या बाबतीतलं चित्र काही अंशी बदलतं आहे, याचा प्रत्यय ‘रुपेरी सिंधू’तून येतो. मुलगी असूनही क्रीडा क्षेत्रात जाण्यासाठी तिच्या आई-वडिलांनी तिला दिलेला पाठिंबा आणि तिचं करियर घडविण्यात तिच्या प्रशिक्षकांच्या बरोबरीने त्यांचा असलेला वाटा, हे मुलींच्या बाबतीतील सकारात्मकतेचं द्योतक आहे.

अशी सकारात्मकता ठासून भरलेलं आणखी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे किरण बेदी. आयपीएस परीक्षा पास होऊन आपल्या प्रशासकीय कारकिर्दीचा स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या बेदींची 'ॲज आय सी' मालिकेअंतर्गत 'स्त्रियांचे सक्षमीकरण', 'भारतीय पोलीस सेवा', 'नेतृत्व आणि प्रशासन' ही माधुरी शानभाग अनुवादित पुस्तके त्यांच्या अभ्यासू, निडर, कर्तव्यनिष्ठ, नेतृत्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवितात. 'ॲज आय डेअर' हे त्यांचं चरित्र शब्दांकित केलं आहे सुप्रिया वकील यांनी. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्या म्हणतात,'मी हे पुस्तक अद्ययावत केलं आहे. याचा उद्देश आहे भारतीय पोलीस सेवेतील (IPS) पहिल्या महिला अधिकाऱ्याच्या इतिहासाचा प्रत्यक्ष स्वत:च दस्तऐवज तयार करणे....कारण मी एके दिवशी स्वत:च इतिहासाचं पान बनणार आहे!'

मेहता पब्लिशिंग हाऊसने 'नोबेल ललना : भाग १' आणि 'नोबेल ललना : भाग २' ही पुस्तकं प्रकाशित करून स्त्रीच्या विविध क्षेत्रांतील अत्युच्च प्रतिभेचा वेध घेतला आहे. ही दोन पुस्तकं म्हणजे स्त्रीची कर्तृत्वगाथा आहे. स्त्रीची कर्तृत्वगाथा अधोरेखित करणारं आणखी एक पुस्तक म्हणजे 'आघाडीचे महिला नेतृत्व.' सुधा मेनन लिखित आणि सुमिता बोरसे अनुवादित या पुस्तकात अनु आगा, पी. टी. उषा, मल्लिका साराभाई अशा विविध क्षेत्रांतील यशस्विनींच्या कर्तृत्वाचा आलेख रेखाटला आहे.

तळागाळातील स्त्रियांचं आर्थिक स्वावलंबन, त्यांची एकता आणि त्यांचं जीवन याविषयी सांगताना, अशा महिलांसाठी स्थापन केलेली संस्था SEWA (Self Employed Women's Association) या संस्थेबद्दलही माहिती देणारं पुस्तक म्हणजे 'वुई आर पुअर बट सो मेनी.' इला आर. भट्ट यांनी लिहिलेलं हे पुस्तक अनुवादित केलं आहे सुनीति काणे यांनी.

तर स्त्रीची सकारात्मकता, तिची सहनशीलता, तिचं चैतन्य याचं दर्शन घडविणारी अनेक पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत. जसे तसलिमा नासरिन यांचे विलास गीते अनुवादित 'द्विखंडित', मृणालिनी गडकरी यांचे 'भगिनी निवेदिता,' सुप्रिया वकील अनुवादित

‘मी, संपत पाल,’ सुनंदा अमरापूरकर अनुवादित ‘आमेन,’ सुप्रिया वकील अनुवादित ‘सेक्स वर्कर’, ‘कटिंग फ्री’, सुनंदा अमरापूरकर अनुवादित ‘शेम’, मीना टाकळकर अनुवादित ‘द प्राइस ऑफ लव्ह’, शीला कारखानीस अनुवादित ‘माझी ललाटरेषा’ इ. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या अशा स्त्रीप्रधान पुस्तकांची यादी आणखी मोठी आहे. स्त्रीच्या चैतन्याची विविध रूपं त्यातून अनुभवता येतात.

ज्या मुस्लिम स्त्रियांनी, विशेषत: भारताबाहेरील मुस्लिम स्त्रियांनी लिहिलेली जी आत्मकथनं आहेत, ती अंगावर शहारा आणणारी आहेत. स्वातंत्र्य तर सोडाच, पण तिच्या अस्तित्वावर घाला घालणारी तिथली पुरुषी मानसिकता आहे. अशा आत्मकथनांमधून ती प्रकर्षाने अधोरेखित होते. स्त्रीला उपभोग्य वस्तू समजणाऱ्या समाजात अनेक हालअपेष्टांना तोंड देत आपलं अस्तित्व सिद्ध करणाऱ्या आणि आत्मकथनांतून ते मांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या या स्त्रियांना खरंच सलाम करावासा वाटतो. तसलिमा नासरिनसारख्या स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रीला स्वत:चं अस्तित्व सिद्ध करण्याचा अपराध केला म्हणून निर्वासित केलं जातं आणि तरीही ती स्त्री आपल्या मतांवर ठाम राहते, ही बाब अनेक स्त्रियांना प्रेरणा देणारी आहे.

याचबरोबर स्त्रीच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्वखुणा अधोरेखित करणारी पुस्तकंही विविध क्षेत्रांत काम करू इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी मार्गदर्शक आहेत.

तेव्हा स्त्रीच्या साहित्यातील चैतन्यरूपी आविष्काराला मन:पूर्वक अभिवादन!

मेहता मराठी ग्रंथजगत

विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये / पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८८८

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.com

m.dailyhunt.in

play.google.com

eBooks



Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

उपक्रम दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

- श्री स्वामी समर्थ रामदास

❊ वाचकांसाठी सुवर्णसंधी ❊

'करा मैत्री पुस्तकांशी'

'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा नवीन उपक्रम

१६ मार्च २०१७ ते १५ एप्रिल २०१७

दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ४०टक्क्यांपर्यंत सूट

१७ मार्च – बाळ भागवत यांचा जन्मदिन

‘अ टाइम टु किल, एजल्स अँड डेमन्स, डेव्हिल मे केअर, ग्रोईंग अप बिन लादेन, वन शॉट, द अफगाण, द सेव्हन स्क्रोल,देव छे! परग्रहावरील अंतराळवीर,द वॉचमन, एक्झोडस्’ या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३७४५/-

१७ मार्च ते २० मार्चपर्यंत.

सवलत किंमत १७९९/-

२० मार्च – आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन

‘सेकंड लेडी, द गेस्ट ऑफ ऑनर, द मिरॅकल, द सेव्हन सिक्रेट’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १०७०/-

२० मार्च ते २२ मार्चपर्यंत.

सवलत किंमत ५८८/-

२१ मार्च – जागतिक कविता दिवस

‘किनारे मनाचे, निर्बाचित कविता, तिची सावली, कविता दोघांची’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३५५/-

२१ मार्च ते २३ मार्चपर्यंत.

सवलत किंमत १७७/-

२२ मार्च – डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन

‘चाळीशीनंतरची वाटचाल, वेदना आणि व्याधींसह चांगले जीवन, व्याधीमुक्त’या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ७८०/-

२२ मार्च ते २४ मार्चपर्यंत.

सवलत किंमत ५०७/-

२२ मार्च– प्रियंका कुलकर्णी यांचा जन्मदिन

‘महात्मा गांधी आणि तीन माकडे, व्हिदर जस्टिस’ या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत -३००/-

२२ मार्च ते २४ मार्चपर्यंत

सवलत किंमत १९५/-

२५ मार्च – व. पु. काळे यांचा जन्मदिन

‘व. पु. काळे’ लिखित **४७** पुस्तकांचा एकत्रित संच

मूळ किंमत - ६२९०/-

२५ मार्च ते २७ मार्चपर्यंत

सवलत किंमत ३५९९/-

२५ मार्च – अजित ठाकूर यांचा जन्मदिन

‘लेट्स किल गांधी, सन्स ऑफ फॉर्च्युन, द ॲटर्नी, द दा विंची कोड’ या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १७४५/-

२५ मार्च ते २७ मार्चपर्यंत

सवलत किंमत ९६०/-

२६ मार्च – राहुल गोखले यांचा जन्मदिन

राहुल गोखले लिखित ‘विज्ञानातील सरस आणि सुरस’ या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १८०/-

२६ मार्च ते २७ मार्चपर्यंत

सवलत किंमत ११७/-

२८ मार्च – भारती पांडे यांचा जन्मदिन

‘मयादा इराकची कन्या, माझे माझ्यापाशी काही नाही, ब्लास्फेमी, एक एक पाऊल, गव्हर्नन्स, हा शोध वेगळा, काळी,

मजल दरमजल, स्पाय प्रिन्सेस, तेच दिन सोनेरी, द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २२२५/-

२८ मार्च ते ३० मार्चपर्यंत.

सवलत किंमत १३३५/-

२९ मार्च - नागनाथ कोत्तापले यांचा जन्मदिन

'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – १२०/-

२९ मार्च ते ३० मार्चपर्यंत.

सवलत किंमत ७२/-

१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन

सुधा पाटील लिखित 'बालपरिचर्या' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – २८०/-

१ एप्रिल ते ३ एप्रिलपर्यंत.

सवलत किंमत १६८/-

१ एप्रिल - सुरेश नाईक यांचा जन्मदिन

सुरेश नाईक लिखित 'या सुखांनो, कविता दोघांची ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३३०/-

१ एप्रिल ते ३ एप्रिलपर्यंत.

सवलत किंमत १९८/-

३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन

किशोर पवार लिखित 'आपली सृष्टी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ११००/-

३ एप्रिल ते ५ एप्रिलपर्यंत.

सवलत किंमत ६६०/-

५ एप्रिल – व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन

व्यंकटेश माडगूळकर लिखित **४१** पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ५२००/-

५ एप्रिल ते ७ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ३०९९/-

७ एप्रिल – जागतिक आरोग्य दिन

‘**चला जाणून घेऊ या-** तंदुरुस्ती, योगविद्या, मधुमेह, मधुमेह एक आव्हान, हृदयविकार निवारण, हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी तंत्र, Cancer Care & Mysteries & Yoga’ पुस्तकसंचावर सवलत.

संचाची मूळ किंमत - १०५५/-

७ एप्रिल ते १० एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ६३३/-

८ एप्रिल – रणजित देसाई यांचा जन्मदिन

रणजित देसाई लिखित **४१** पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ५८१०/-

८ एप्रिल ते ९ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ३५९९/-

९ एप्रिल – अशोक जैन यांचा जन्मदिन

‘बिजनेस लिजंड्स, बिजनेस महाराजे’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ७१५/-

९ एप्रिल ते १० एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ४२९/-

११ एप्रिल – महात्मा फुले यांची जयंती

‘महात्मा, शेतकऱ्याचा असूड’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ५७०/-

११ एप्रिल ते १२ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ३४२/-

११ एप्रिल - सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन

'भारतीय साहित्यिक, खाली जमीन वर आकाश, समकालीन साहित्यिक' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ५६०/-

११ एप्रिल ते १२ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ३३६/-

१२ एप्रिल - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन

'अदम्य जिद्द, बी द चेंज- भ्रष्टाचाराशी लढा, चिकन सूप फॉर द टिनएज सोल, चिकन सूप फॉर द फादर्स सोल भाग १ व २, चिकन सूप फॉर द मदर्स सोल, कटिंग फ्री, डिझाइन युवर करिअर, धीरूभाईझम, एक सांगू?, फरासि प्रेमिक, फाईव्ह पाईंट समवन, आय डेअर, जे. आर. डी. टाटा यांची पत्रे, कळेल का त्याला आईचे मन, की नोट जे. आर. डी. टाटा, मैत्री अशी आणि तशी, माझी जीवनयात्रा, मी मलाला, मी संपत पाल गुलाबी साडीवाली रणरागिणी, मृत्यु माझ्या उंबरठ्याशी, नवभारताचे शिल्पकार, वन नाईट ॲट कॉल सेंटर, प्रतिकूलतेवार मात, सेक्स वर्कर, द थ्री मिस्टेक ऑफ माय लाईफ, थॉट लीडर्स, टाईमपास ' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ६२४५/-

१२ एप्रिल ते १४ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ३५९९/-

१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन

द. मा. मिरासदार लिखित **२३** पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २८४५/-

१४ एप्रिल ते १८ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत १६९९/-

१४ एप्रिल - रविंद्र ठाकूर यांचा जन्मदिन

'महात्मा, व्हायरस' पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ६४५/-

१४ एप्रिल ते १५ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
३८७/-

१९ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन

जेफ्री आर्चर लिखित **११** अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३८७०/-

१५ एप्रिल ते १९ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१८९९/-

९ एप्रिल - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन

डॉ. बोल्ली लिखित 'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २७०/-

१५ एप्रिल ते १६ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१६२/-

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

अधिक माहितीसाठी संपर्क :

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा
www.mehtapublishinghouse.com

e-books आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता Computer, i-pad आणि Tab वर वाचा.

play.google.com/store/books • m.dailyhunt.in/Ebooks/marathi

www.amazon.com उपलब्ध....

मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

T-Book Club
TBC ची मेंबरशीप घ्या, आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com

२ री आवृत्ती

आघाडीचे महिला नेतृत्व

लाखोंना स्वत:च्या क्षमतेची खरी
जाणीव करून देण्यास उद्युक्त
करणाऱ्या यशस्विनींच्या अंतरंगाचं
मनमोहक दर्शन!

मूळ लेखक
सुधा मेनन

अनुवाद
सुमिता बोरसे

किंमत : २८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

आता ती केवळ... राबणारी बिनचेहऱ्याची बाई राहिलेली नाहीतर ती स्वत:चे हक्क असलेली स्वतंत्र नागरिक आहे. केवळ घरकाम, मोलमजुरीच नव्हेतर उद्योगसमूहाची अध्यक्षा... बँकेची व्यवस्थापिका... प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ती... ते उत्कृष्ट कलाकार अशा विविध कार्यक्षेत्रांत तिने आपल्या कर्तृत्वाचा 'कॅन्व्हॉस' चितारला आहे.
अनु आगा... लीला पूनावाला... मेहेर पद्मजी... किरण मुझुमदार-शॉ... यांच्यासारख्या प्रथितयश उद्योजिका!
शुभा मुद्गल, मल्लिका साराभाई यांच्यासारख्या कलाकार!
शिखा शर्मा... नैना किडवाई... प्रिया पॉल... यांच्यासारख्या यशस्विता आणि सुवर्णकन्या पी.टी. उषा...
यांच्या यशोगाथांचा हा आलेख!

आकाशस्पर्श

– रेणू गावस्कर

स्त्रियांना शिकायचं असतं, आपल्या संवेदनांना जपायचं असतं, निर्मितीक्षम आयुष्याचं स्वप्न बघायचं असतं आणि जगायचंही असतं; पण त्यांच्या हाती काय लागतं?

श्यामची आई म्हणजे यशोदाबाई साने यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त काही स्नेहीजन एकत्र बसलो होतो. तिथं श्यामच्या आईच्या आणि पर्यायानं श्यामच्याही अनेक आठवणींना उजाळा मिळाला.

श्यामच्या म्हणजे साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांच्या आईच्या संस्कारांची छाप आहे हे सर्वमान्य आहे. भाऊबीजेच्या पैशातून स्वत:ला लुगडं घेण्याचा विचारही न करता श्यामच्या वडिलांना दिवाळीच्या दिवशी त्या पैशातून नवीन धोतराचं पान घेणारी श्यामची आई, ‘अस्पृश्य’ आजीची टोपली उचल असं सामाजिक रोषाचा विचार न करता श्यामला सांगणारी आई, कळ्या तोडू नयेत असं सांगणारी कोमलहृदयी आई आणि त्याचवेळी मुलाला पोहायला येत नाही हे समजल्यावर त्याच्या पाठीवर वेताची छडी ओढणारी श्यामची आई.

एका संवेदनशील आईच्या आणि पर्यायाने तेवढ्याचं संवेदनशील स्त्रीच्या आठवणींना उजाळा देताना माझ्या मनात यशोदाबाईंच्या दोन स्मृती पुन्हा पुन्हा वर येतात. यशोदाबाईंचे वडील श्यामच्या वडिलांना

म्हणजे त्यांच्या जावयाला कर्जबाजरी झाल्याविषयी टाकून बोलायला लागले, तेव्हा यशोदाबाईंनी आपल्या वडिलांना तसे न करण्याविषयी तर सांगितलेच, शिवाय नानांनी त्यावेळी (यशोदाबाईंचे वडील) मुलीच्या घरची पायरी न चढण्याचा निश्चय केला, तेव्हा मुलगी दुःखी झाली खरी; पण स्वाभिमानाला तिलांजली नाही दिली तिनं. दुसरा प्रसंग सावकाराच्या अपशब्दांविषयी आहे. 'पैसे नसतील तर बायको विका' असे भयंकर शब्द यशोदाबाईंच्या कानात उकळत्या तेलासारखे पडले. त्याक्षणी घराचा लिलाव निघण्याविषयीचं त्यांचं सारं भय संपलं आणि सावकाराला बाहेरचा रस्ता दाखवायला त्या कचरल्या नाहीत.

वर उल्लेखलेल्या दोनही प्रसंगांची माझ्या मनात ज्या ज्या वेळी उजळणी होते, त्या त्या वेळी वाटतं, काळाचा संदर्भ लक्षात घेता, परिस्थितीचा बिकटपणा डोळ्यांपुढे आणला तर यशोदाबाई किती तेजस्वी स्त्री असल्या पाहिजेत, हे समजतं. दोन्ही प्रसंगांनंतर यशोदाबाईंच्या पदरात पडला तो वाईटपणाच. पहिल्या प्रसंगात वडील नाराज झाले आणि पतीही. दुसऱ्या प्रसंगात तर कर्जाच्या ओझ्यानं करवादून गेलेल्या श्यामच्या वडिलांनी आपला संताप पत्नीवरच काढला. वाईट वाटतं ते एवढंच, की या तेजस्विनीची बूज राखली गेली नाही. एक शहाणी, धैर्यवान स्त्री म्हणून तिचं स्वतंत्रपणे मूल्यमापन झालंच नाही. ती आपल्यासमोर येते ती 'श्यामची आई' म्हणूनच. इरावतीबाई कर्वे यांच्या शब्दांत सांगायचं तर जणू 'श्यामची आई' असण्यातच तिच्या जीवनाची परिपूर्ती होती.

श्यामची आई काय किंवा विनोबांची आई काय, या व्यक्ती म्हणून खूपच मोठ्या होत्या. माणूस म्हणून वरच्या पातळीवर होत्या. विनोबांच्या आईंनी आपलं जीवन तत्त्वज्ञान किती मोजक्या पण केवढ्या अर्थपूर्ण शब्दांत मांडलंय बघा! विनोबांची आई म्हणते,'देतो तो देव, राखतो तो राक्षस!' बस्स! एवढेच शब्द; पण ते जीवनाचं केवढं मोठं तत्त्वज्ञान सांगून जातात.

विनोबांनी विवाह न करण्याचा आपला मनोदय आईला सांगितला.

आईनं ऐकलं मुलगा काय म्हणतो ते आणि ती उद्‌गारली, ‘लग्न करतो तो एक पिढी उद्धरतो. न करणारा बेचाळीस पिढ्या उद्धरतो.’

साने गुरुजींची आई आणि विनोबांची आई यांच्याविषयी वाचताना या दोन्ही स्त्रियांची वैचारिक उंची समजावून घेताना भारावून जायला होतं. या दोघीजणी अपवादात्मक असतील; पण त्याही काळात अशा स्त्रिया होत्या; मात्र रूढी-परंपराच्या बंधनात त्या अशा काही गुरफटल्या गेल्या की प्रतिभेची उत्तुंग उंची लाभूनही त्याचा आविष्कार करण्याची संधीच लाभली नाही त्यांना.

वर उल्लेखिलेल्या स्त्रिया अपवादात्मक होत्या आणि संधीच्या अभावी जीवनाचं उत्तुंग शिखर नाही गाठू शकल्या त्या; पण अपवादात्मक आव्हानांनी ज्यांना गाठलं, त्यांनी मिळालेल्या संधीचं केवढं सोनं करून दाखवलं. याच्याही आठवणी विसरता येणार नाहीत.

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री डॉक्टर डॉ. आनंदीबाई जोशी आणि त्यांच्या पाठीला पाठ लावून आलेल्या डॉ. रखमाबाई हा साधारण दीडशे वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. आनंदीबाईंचे पती गोपाळराव जोशी यांना स्त्री शिक्षणाच्या वेडानं झपाटून टाकलं होतं. विवाहाच्या पहिल्या दिवसापासून गोपाळराव पत्नीला शिकवू लागले. मुली लिहित्या - वाचत्या झाल्या तर त्यांना लवकर वैधव्य येतं असा समज रूढअसण्याचा तो काळ. त्या काळी हा ज्ञानयज्ञ सुरू झाला आणि आनंदीबाई नावाची कोवळी सतरा वर्षांची मुलगी, ‘एतद्देशीय स्त्रिया पुरुष डॉक्टरांकडे जात नसल्यानं कित्येकदा हकनाक आपल्या प्राणाला मुकतात,’असं प्रतिपादन करून या देशातली पहिली स्त्री डॉक्टर होण्यासाठी सातासमुद्रापार गेली.

वयाच्या एकविसाव्या वर्षी आनंदीबाई डॉक्टर झाल्या. यशाचं उत्तुंग शिखर त्यांनी गाठलं; पण त्याचवेळी परदेशात दीर्घकाळ झालेल्या आबाळीमुळे क्षयानं त्यांना गाठलं; वयाच्या बाविसाव्या वर्षी परदेशातून आल्यावर पुण्यात एकही दिवस प्रॅक्टिस न करता डॉ. आनंदीबाई मरण पावल्या.

१ ली आवृत्ती

वुइ आर पुअर बट सो मेनी

गरीब कष्टकरी स्त्रियांमधील क्षमता,
त्यांच्यावरची परिस्थिती आणि त्यांच्या
जीवनसंघर्षात ‘सेवा’ या संस्थेचा सक्रीय
सहभाग याविषयी संस्थेच्या
इला भट्ट यांचे प्रेरणादायी कथन

मूळ लेखक
इला आर.भट्ट

अनुवाद
सुनीति काणे

किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

‘सेवा’ (SEWA - Self Employed Women's Association) हे इलाबेन भट्ट यांचं अलौकिक जीवितकार्य आहे. लहानसहान व्यवसायांवर उपजीविका करणाऱ्या तळागाळातल्या लाखो गरीब स्त्रियांना संघटित करून ‘सेवा’नं त्यांना त्यांच्या कुवतीची, हक्कांची आणि संघटित झाल्यामुळे लाभलेल्या बळाची जाणीव करून दिली आणि त्यांना सक्षम बनवून त्यांची परिस्थिती सुधारली. कचरा गोळा करणं, चिंध्यांपासून रजयांच्या खोळी शिवणं, भरतकाम करणं, डिंक गोळा करणं, मिठागरांमध्ये मीठ बनवणं अशा विविध व्यवसायांतल्या स्त्रियांच्या मालाला बाजारपेठ आणि चांगले भाव मिळवून देणं, कर्जाच्या चिखलातून वर काढायला स्वस्त दरानं कर्ज देणं, त्यांना इतर विविध सुविधा मिळवून देणं अशी अनेक कार्य ‘सेवा’नं कशी तडीला नेली, याचा प्रेरणादायी, उद्बोधक प्रवास हे पुस्तक घडवतं. स्त्री-कल्याण, दारिद्र्य निर्मूलन, नोकरीच्या सुसंधीमध्ये वाढइच्छिणाऱ्या प्रत्येकानं हे पुस्तक वाचायलाच हवं!

पण आनंदीबाईंची तपश्चर्या वाया नाही गेली. आपल्या बालवयात करून दिलेल्या लग्नाचं वैयर्थ्य लक्षात येऊन रखमाबाई या सतरा वर्षांच्या मुलीनं त्यांचं स्वप्न जणू पूर्ण केलं. हिंदू धर्मशास्त्रानुसार हिंदू स्त्रीला लग्न मोडण्याचा अधिकार नाही हे समजल्यावर तुरुंगवासाची शिक्षा भोगण्याची तयारी दाखवली. सुदैवानं 'रखमाबाई बचाव' आंदोलन झालं. रखमाबाईंच्या नवऱ्याला त्या काळी त्यांना २०० रुपये पोटगी द्यावी लागली. आंदोलनाचे इंग्लंडमध्ये देखील पडसाद उमटले. रखमाबाई विवाह बंधनातून सुटल्या. परदेशी जाऊन डॉक्टर झाल्या आणि जवळपास पन्नास वर्षं प्रॅक्टिस करून त्यांनी अगणित स्त्रियांची यशस्वी बाळंतपणं करून त्यांना जीवनदान दिले. रखमाबाईंचे कर्तृत्व याहूनही खूप मोठे आहे; पण ते विस्ताराने लिहिण्याऐवजी त्यांनी एक व्यक्ती म्हणून आणि एक कर्तृत्ववान स्त्री म्हणून काळावर उमटवलेला अमिट ठसा वाचकांपुढे आणणं जास्त महत्त्वाचं वाटतं.

या सगळ्याचा विचार करता स्त्रियांच्या संदर्भात काळ बदलला आहे, यात शंकाच नाही. हल्लीच राज्यातील महानगरपालिकांच्या आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. विजयी उमेदवारांच्या (आणि पराभूत उमेदवारांची देखील) नावांची यादी वाचताना त्यात कितीतरी स्त्रियांच्या नावाचा उल्लेख वाचताना खूप अभिमान वाटत होता. काहीच वर्षांपूर्वी केवळ 'चूल आणि मूल' एवढंच स्त्रीचं कार्यक्षेत्र मानलं जात असताना हा एवढा बदल कधी आणि कसा झाला याचा विचार साहजिकपणे मनात येतो. या देशाची पंतप्रधान एक स्त्री होती, राष्ट्राध्यक्ष होण्याचा मान एका स्त्रीला मिळाला, काही राज्यांच्या मुख्यमंत्री पदावर स्त्रिया विराजमान झाल्या, ही खरोखरीच आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे; मात्र हे सगळं आठवताना एक बारीकशी कळ आणणारी आठवणही येते आहेच.

काही वर्षांपूर्वी मी आपल्या राज्यातील एका गावात गेले होते. त्या गावातील सरपंच एक महिला होती. व्यासपीठावर माझ्याशेजारी बसल्या होत्या त्या बाई. कार्यक्रम सुरू झाला. स्त्री-पुरुषांच्या त्या

कार्यक्रमात स्थानिक पुढाऱ्यांची भाषणं सुरू होती. मी त्या सरपंच महिलेला 'तुम्हीदेखील बोला' असं म्हटल्यावर 'एवढ्या पुरुषांच्यात बोलण्याची सवय नाही. शिवाय आमच्या मालकाला बी ते आवडायचं नाही,' असं उत्तर मिळालं.

मनात अशी वैचारिक दोलनं निर्माण झाली, की मला हटकून आठवतात, त्या पोलीस दलात उच्चतम पदावर काम करणाऱ्या श्रीमती मीरा बोरवणकर. एक स्त्री म्हणून, दोन मुलांची आई म्हणून तुलनेनं सोपं पोस्टिंग मिळणं शक्य असताना श्रीमती बोरवणकर यांनी ते नाकारलं. अतिशय आव्हानात्मक पोस्टिंग स्वीकारलं. त्याचं फलितही दिसलंच. राज्यातील एक भयावह स्कँडल शोधून अनेक स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचं उचित श्रेय त्यांना मिळालं.

श्रीमती मीरा बोरवणकर हे नाव काही अपवादात्मक नाही. पोलीस सेवा किंवा प्रशासकीय क्षेत्रातील कर्तबगार स्त्रियांची कितीतरी नावं आपल्यासमोर आहेतच ना! डॉ. किरण बेदी हे त्यापैकीच एक राष्ट्रीय पातळीवर गाजणारं नाव. प्रशासकीय सेवेत असताना सामाजिक प्रश्नांविषयी अतिशय कळकळीनं काम करणाऱ्या लीना मेहेंदळे, मनीषा म्हैसकर यांनीही किती मूलगामी काम केलंय! या स्त्रिया निदान उच्चपदस्थ आहेत; पण हल्लीच एका राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तीनं सिग्नलचे नियम मोडले म्हणून त्याचा मार खाऊनदेखील त्याला घट्ट पकडून ठेवणारी महिला कॉन्स्टेबल महाराष्ट्रानं वेगवेगळ्या चॅनेल्सवर पाहिली आहे.

या सगळ्या स्त्रिया आपल्या आसपास वावरताहेत. आपल्या उत्तुंग कर्तृत्वानं इतरांना प्रेरणा देताहेत. याशिवाय देखील साहित्य, नृत्य, नाट्य, गायन, चित्रकला, सिनेमा या जीवनस्पर्शी कलांमध्ये स्त्रीनं आपली मुद्रा उमटवली आहे.

मात्र या सकारात्मक बाबींचा विचार करताना समाजातील निम्न स्तरावर असलेल्या स्त्रीचा विचार अजिबात मनाआड करता येणार नाही. केवढ्या मोठ्या संख्येनं समाजातील स्त्रिया हिंसाचाराला बळी

पडतात, याची अंधुकशी कल्पना देखील अंगांवर शहारे आणते. दारूचं व्यसन, नशिल्या पदार्थांचं व्यसन हे स्त्रीला बळी देतं. दारू पिऊन हिंसक होणाऱ्या पुरुषांकडून शारीरिक व मानसिक हिंसेच्या बळी ठरणाऱ्या स्त्रियांना कर्तृत्वाचं कोणतंही अवकाश मोकळं राहात नाही. शिक्षणाची दारं बंद झाल्यावर मुलींना अगदी कोवळ्या वयात लग्न नावाचा अत्याचार सहन केल्याशिवाय पर्याय राहात नाही. दारिद्र्य, दुष्काळ अशा मनुष्यनिर्मित व निसर्गनिर्मित आपत्तींना तोंड देता देता किती लहान मुली वेश्या व्यवसायाची वाट चालू लागतात, याची मोजदाद करणं अवघड आहे.

या गटातल्या स्त्रियांना शिकायचं असतं, आपल्या संवेदनांना जपायचं असतं, निर्मितीक्षम आयुष्याचं स्वप्न बघायचं असतं आणि जगायचंही असतं; पण त्यांच्या हाती काय लागतं? या संदर्भात मला हल्ली दृश्य माध्यमांवर दाखवली जाणारी जाहिरात इथे आठवते. त्या जाहिरातीत एका स्त्रीचे हात दाखवले आहेत. 'ज्या हातांनी थोपटलं, शाळेत नेलं, खाऊ घातलं, वगैरे वगैरे...' त्या हातांची ही दशा व्हावी?' अशा अर्थाची कुठल्यातरी क्रीमची जाहिरात आहे ती; मात्र ती जाहिरात बघताना ज्या हातांनी एवढी सगळी कामं केली, ममता, स्नेहाचा स्पर्श दिला त्या असंख्य हातांना (पर्यायानं त्या माय-भगिनींना) काय मिळालं, असा प्रश्न माझ्या मनात आल्याशिवाय राहात नाही. लेखाचा शेवट करताना वस्ती पातळीवर मुलांसोबत खेळलेल्या एका बैठ्या खेळाची आठवण येते.

मुलं अभ्यास करून कंटाळून गेली, की काही ना काही बैठे खेळ खेळण्याचा बूट निघायचा. समाज मंदिरात धावपळीचे खेळ खेळायला जागाच नसायची. त्यातल्या एका खेळाचं रूप अगदी साधं होतं. प्रत्येकानं चेंडू हातात घ्यायचा व त्या चेंडूला एक काल्पनिक नाव द्यायचं. त्या नावानुरूप चेंडूचं ते रूप आपल्याला आवडतं की नाही सांगायचं.

असाच एकदा चेंडू सीमाकडे आला. दहा-बारा वर्षांच्या सीमानं

शेजारच्या दिनेशकडे चेंडू फेकला आणि ती म्हणाली, ‘चेंडू म्हणजे मी आहे आणि मला ‘मी’ फार आवडते.’

सीमानं फेकलेला चेंडू तिच्याहून वयानं थोड्या मोठ्या असलेल्या दिनेशनं सहज झेलला आणि तो उसळून म्हणाला, ‘ऍहेरे... म्हणे चेंडू म्हणजे मी आहे. पोरगी कधी चेंडू असते का? उडते का खेळते? सीमासारखी नुसती घरी बसते!’ (सीमाची शाळा तिच्या व्यसनी वडिलांनी बंद केली आहे). पुरुषप्रधान समाजाच्या व्यवस्थेत अनेक सीमा नुसत्याच घरी बसतात. नाहीतर आईला सोबत करत तिच्या कामावर जातात. त्यांना चेंडूसारखी उसळी मारून आकाशाला स्पर्श करण्याची संधी आपण कधी देणार, हा खरा कळीचा प्रश्न आहे.

❖



एकाकीपणाचा दोष

संपूर्ण संन्यास घेतलेली मी
निर्वासित बाहेरून आणि आतूनही.
चुकून वाढलेली ही नखं, अस्वस्थ बोटं
पिंजारलेले केस, अस्ताव्यस्त हात
खूप दूर, अगदी एकांती
मी एकाकी, निर्वासित.
माझ्या एकाकी घरात,
वाराही घाबरतो डोकवायला
मध्यरात्री एखाद-दुसरं कुत्रं केकाटायचं
पण एका दुपारी तेही सोडून गेलं-अचानक
तू आहेस एक ढोंगी
आपादमस्तक फसवा
सगळ्यांना ठाऊक आहे तुझा बाहेरख्यालीपणा
तरीही मी येते तुझ्याजवळ
एकाकी आहे म्हणून
आणि होते कलंकित-वारंवार
गढूळ पाण्यात डुबक्या मारून
घाण माखून घेते माझ्या स्वच्छ शरीरावर
तुझा स्वैराचार ठाऊक आहे सर्वांना
तरीही एकाकी असल्यानं,
तुझंच दार ठोकते.
लोक मात्र ह्याला 'प्रेम' म्हणून फसतात.

– तसलिमा नासरिन
('निर्बाचित कविता' मधून)

❖

१४ वी आवृत्ती

चौघीजणी

मूळ लेखिका

लुइसा मे अल्कॉट

अनुवाद

शान्ता ज. शेळके

किंमत : ४००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

मुग्ध शैशवातली कोवळी सुखदुःखे ..... लुइसा मे अलकॉट या ख्यातनाम अमेरिकन लेखिकेची ‘लिटल् वुइमेन’ ही कादंबरी अठराशे अडुसष्ट साली प्रथम प्रकाशित झाली. प्रसिद्धीबरोबरच तिला अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. अनेक भाषांमधून ती अनुवादित झाली आहे. हॉलिवुडने तिच्यावर दोन वेळा चित्रपटही काढले आहेत.

‘लिटल् वुइमेन’ ही अमेरिकेतल्या ‘मार्च’ कुटुंबाची –

विशेषतः त्यातल्या मेग, ज्यो, बेथ आणि ॲमी या चार बहिणींची – कहाणी आहे. या व्यक्तिरेखा लेखिकेने आपण व आपल्या बहिणी यांच्यावरूनच बहुतांशी रंगवल्या आहेत. शेजारचे वृद्ध लॉरेन्स आजोबा आणि त्यांचा देखणा प्रेमळ नातू लॉरी यांनी या कथेत आणखी अनोखे रंग भरले आहेत. हे एक अतिशय हृद्य आणि विलोभनीय असे कुटुंबचित्र आहे. एकमेकींपासून स्वभावाने अगदी वेगळ्या असलेल्या मार्च बहिणींचे परस्परांवरील उत्कट प्रेम, त्यांच्या आशा-आकांक्षा, कोवळी सुखदुःखे, भविष्याची स्वप्ने याचे हे कधी विनोदी,

तर कधी हृदयस्पर्शी असे चित्रण आपल्या साध्या सच्चेपणामुळे वाचकाला थेट अखेरपर्यंत गुंतवून ठेवते...

बाईपणाच्या पन्नास छटा

— शुचिता फडके

प्रणयोत्कटता आणि समाधानाची भावना ही निव्वळ पुरुषांची मक्तेदारी नाही, हे माहीत असूनही स्त्रिया स्वतःला व्यक्त करू शकत नाहीत. निखळ प्रणय म्हणजे 'स्व'शी प्रामाणिक राहून केलेला आचार हे लक्षात घेतलं तर फिफ्टी शेड्सच्या अनुवादाचं सार्थक झालं असं मी म्हणेन.

शिव आणि शक्ती! विश्वाच्या निर्मितीमागचे मूलस्रोत! नवनिर्मितीला पोषक आणि आवश्यक असं नातं! उत्क्रांतीच्या टप्प्यावरून पुढे जात, असंख्य बदलांना सामावून घेत, पिढ्यान्‌पिढ्या अधिक प्रगल्भपणे वाटचाल करणारं हे नातं! निर्मितीच्या वेळेस दोन्ही स्रोतांचं प्रकटीकरण समान पातळीवरून असावं; परंतु कालांतराने त्याला वेगवेगळे आयाम प्राप्त होत गेले. शिवस्वरूपाचं वर्चस्व दृढहोत गेलं.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यंतरापर्यंत हे चित्र बहुतेक सगळीकडे सारखंच होतं; मात्र त्याचदरम्यान अस्वस्थतेचं वारं वेगाने वाहू लागलं होतं. शिक्षणाची दारं विस्तृतपणे खुली झाली. आजवर फक्त चूल-मूल सांभाळणाऱ्या स्त्रिया मोठ्या प्रमाणावर बाहेर पडू लागल्या. आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे जगण्याचे आयाम बदलले. स्वतःचे विचार व्यक्त करण्याची धिटाई अंगात आली. यामागचं कारण सोपं होत; मात्र ते समजावून घ्यायला आपल्याला मॉस्लोवच्या विचारसरणीकडे एक नजर टाकायला हवी.

ही विचारसरणी एका पिरॅमिडवर आधारित आहे. याच्या तळाला

असलेल्या दोन श्रेणी आपल्या मूलभूत गरजांबद्दल सांगतात; अन्न-वस्त्र-निवारा ही आपली अर्थात पहिली गरज, सुरक्षितता ही दुसरी गरज, तिसऱ्या पायरीवर प्रेम आणि आपलेपणा या भावना येतात, स्व-सन्मान आणि स्व-प्रकटीकरण या सर्वांत वरच्या दोन पायऱ्या आहेत. व्यक्तीच्या मूलभूत गरजा जोवर पूर्ण होत नाहीत तोवर व्यक्ती वरच्या पायरीकडे जात नाही. भरण-पोषण-सुरक्षा मिळाली की प्रेम आणि आपलेपणाची भावना व्यक्त करण्याकडे लक्ष जातं. जोवर आपल्याला इतरांकडून प्रेम आणि आपलेपणा मिळत नाही तोवर आपण स्व-सन्मानाकडे सजगपणे पाहत नाही. तोच नियम शेवटच्या पायरीला लागू होतो. अर्थात, काही सन्माननीय अपवाद असतात जे थेट वरच्या पायरीवर पोहोचतात.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जागतिक स्तरावर यांत्रिकीकरण झालं. त्यामुळे जग जवळ आलं. शोध खुले झाले. मॉस्लोवच्या पहिल्या दोन श्रेणींची पूर्तता स्वसामर्थ्यावर करण्याची क्षमता स्त्रियांच्या अंगी आली. तिसऱ्या श्रेणीची पूर्तता होताना स्त्रियांना ‘स्वत्वाचं’ भान प्रकर्षाने येऊ लागलं. शिवस्वरूपाप्रमाणेच शक्तिस्वरूपाला मान्यता मिळावी म्हणून प्रयत्न सुरू झाले. यातूनच स्त्रीमुक्तिवादी चळवळीची बीजं पेरली गेली.

ज्या अमेरिकेत लिहिलेल्या ‘फिफ्टी शेड्स’ने सध्या धुमाकूळ घातला आहे, तिथे साधारण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवात झाली. विसाव्या शतकात बेट्टी डॉडसन या चित्रकर्मीने त्यामध्ये विशेष योगदान दिलं. स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याचा तिने उघड प्रसार केला. त्याचप्रमाणे, त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी अपराधमुक्त हस्तमैथुन गरजेचं आहे, हे तिचं ठाम मत होतं. स्त्रीला देखाल लैंगिक सुखाचा अधिकार आहे याची तिने जगाला नव्याने जाणीव करून दिली. शिव आणि शक्तीच्या समतोलाचं महत्त्व पुन्हा समोर आलं.

साहित्य जगतात याबद्दल अधूनमधून काहीन्‌काही लिहिलं जातं खरं; पण ते सारं आपल्यापर्यंत पोहोचतंच असं नाही. शिवाय कुठेतरी आपल्या मनावर देखील टॅबू असतात ना? त्यामुळे लैंगिक विषयाला वाहिलेलं साहित्य फारसं वाचलं जात नाही. किंबहुना, या साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोण निकोप नाही. तसं म्हटलं तर आहार, भय आणि निद्रा

यांच्याइतकंच महत्त्व मैथुनाला आहे. या चार बाबी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत, तरीही, या विषयाबद्दल वाचलं जात नाही. शिवाय, दर्जेदार शब्दकृती तशी दुर्मिळच, हेही एक कारण असावं. 'डेझर्ट फ्लॉवर,' 'रतिकथा मंजिरी,' 'व्हजायना मोनोलॉग' वगैरे पुस्तकांतून स्त्रीच्या एकंदरीत लैंगिक भावनांचा विचार केला आहे. त्यांच्या वाचनाने आपण विचार करायला प्रवृत्त होतो. डर्टी रोमान्सची पुस्तकं वाट्टेल तेवढी उपलब्ध आहेत. ती मात्र आपल्याला कंटाळवाणी वाटतात. फूटपाथवर मिळणारी पिवळ्या वेष्टनातली पुस्तकं याच प्रकारात मोडतात.

'फिफ्टी-शेड्स' बद्दल मी कितीतरी दिवस अनभिज्ञ होते. 'भाषांतर करणार का?' या विचारण्यात संदिग्धता होती. त्यामुळे माझी उत्सुकता चाळवली गेली. मी गूगल केलं आणि माझ्या ज्ञानात भर पडली. विषय कोणताही असो, प्रत्येक पुस्तक माझ्यासाठी आव्हान असतं. आलेल्या कामाला नाही म्हणणं मला तात्त्विक दृष्टीने पटत नाही. शिवाय, सेक्स टु स्पिरिच्युॲलिटी (एस टु एस) हा माझा अनुवादाचा प्रांत आहे. त्यामुळे मी हे पुस्तक हातात घेतलं. अनुवाद करायचा तर पुस्तक आपल्या रोमारोमांत भिनावं लागतं. त्यासाठी, त्याची पारायणं करावी लागतात. मूळ लेखकाने उतरवलेले विचार 'आपलेसे' करावे लागतात. त्याप्रमाणे मी फिफ्टीचे तिन्ही भाग अनेकदा वाचले. 'ग्रे' हे चौथं पुस्तकसुद्धा वाचून काढलं.

मात्र, पहिल्यांदा फिफ्टी वाचताना अनेकदा कानातून धूर निघाला. आपण हे नक्की काय वाचतोय बरं, असा प्रश्न पडला. पुस्तकात भरमसाठ शृंगार होता. तरीही लक्षात आलं, की निव्वळ शृंगारावर आधारित असं हे पुस्तक नाही. त्याहीपलीकडे जात विषयवासना आणि सॅडिझम मला जाणवलं. अनुवादाचा अनुभव असला तरी आपल्याला हे असं इतकं 'खुल्लमखुल्ला' लिहिणं जमणार आहे का, हा प्रश्न पडला. शिवाय, लिखाणाला न्यायदेखील मिळायला हवा होता. इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द शोधावे लागणार होते. त्यासंदर्भात फेसबुकच्या वाचन-कट्ट्यावर मी विचारणा केली असता, अनेकांनी अनेक प्रकारे मला नामोहरम करण्याचा प्रयत्न केला. 'तुम्ही असं घाणेरडं पुस्तक का अनुवादित करता?' 'साहित्य-क्षेत्राला त्यातून काय मोठं योगदान मिळणार

आहे?' 'आपल्या देशात असली पुस्तकं वाचतं का कोणी?' 'दुसरं एखादं चांगलं पुस्तक का नाही करत तुम्ही?' अशा अनेक प्रश्नांच्या फैरी माझ्यावर झाडल्या गेल्या. तरुण मंडळींनी या पुस्तकाबद्दल खूप उत्सुकता दाखवली; परंतु अनेकींची मानसिकता 'शी:! काहीतरी काय घाणेरडं!' अशीही जाणवली; पण तोवर माझा विचार पक्का झाला होता. माझ्या बहुतांशी मित्र-मैत्रिणींना, वयोगट २० ते ७५-या पुस्तकाबद्दल प्रचंड उत्सुकता आहे. त्याला कारण यातून आपल्याला आपली ओळख करून घ्यायची संधी देखील मिळते.

मग मात्र ख्रिश्चन आणि ॲनाची मानसिकता समजून घेत मी वाचत राहिले. कधी नोट्स काढल्या. कधी कविता लिहिल्या. कधी नुसतंच पुस्तक हातात धरून बसले. मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे मला ख्रिश्चन आणि ॲना वेगळ्या प्रकाराने दिसू लागले. ते असं का वागत गेले त्याचा कार्यकारणभाव कळत गेला. मुळात हे पुस्तक ॲनेस्टेशियाच्या नजरेतून लिहिलंय. वरपांगी पाहिलं तर ते विषय-वासनेवर आधारित आहे असं आपल्याला वाटतं; पण तसं नाही; कारण विषयवासना हा शब्दच मुळी नकारात्मक आहे. त्याऐवजी प्रणय म्हटलं की त्यातील कोमल तरलता आपल्याला जाणवते. मग मैथुन हा सोहळा बनतो. तो आदिम आहे. विश्वाच्या पुनरुत्पादन कार्याचा गाभा आहे. या विचाराचा स्वीकार केला, की आपण त्या पुस्तकाचे इतर कंगोरे जाणवून घेऊ लागतो. माझंही तसंच झालं. त्यानंतर हे निव्वळ अनुवादाचं काम न उरता एक आविष्करण होत गेलं.

दुसऱ्या भागाचा अनुवाद करताना सेक्सला उपचार-उपयोग, भोग-उपभोग, निकटता-जवळीक आणि पायंडा-सुसंस्कार या विविध अंगांनी मी निकोपपणे बघू शकले. आजवर न जाणवलेली पुरुषाची मनोभूमिका लक्षात आली. अधिकार गाजवण्याची इच्छा अनेकदा आपल्या व्यक्तीला जपण्यापोटी येते. शक्य झालं तर तिच्या पायाशी सारं जग आणून ओतावंसं वाटतं. संवेदनशील मनाला जोडीदाराची असुरक्षितता सहन होत नाही. त्यातून हक्क गाजवला जातो, जो मग मालकी हक्क वाटू लागतो, हे नव्याने लक्षात आलं; मात्र त्या मालकी हक्काला वेगळं वळण लागतं

आणि प्रणयाची गोडी संपते; अर्थात यावर वेगळं लिहावं लागेल.

प्रणय ही मूलभूत प्रेरणा आहे. त्याबद्दल संकोच वाटणं स्वाभाविक आहे; पण त्यात लाज वाटून घेण्यासारखं काही नाही. उत्कट क्षणी अद्वैताचा साक्षात्कार होण्याची ताकद प्रणयात आहे. स्पर्शाशी एकरूप होत, मनापासून झोकून देणारी प्रणयिनी मग स्वतःला नव्याने पाहू-जाणू लागते. आजच्या या आधुनिक युगात देखील स्त्रिया 'प्रणय' या विषयावर फार काही बोलू धजत नाहीत. जाहीरपणे आपली मतं मांडणाऱ्या स्त्रिया आहेत; पण त्या फार मोजक्या. एकंदरीत स्त्रियांच्या तुलनेत त्यांचं प्रमाण फार कमी आहे. त्या पार्श्वभूमीवर ॲना स्वतःच्या समाधानाची मागणी करते तेव्हा आपल्याला जाग येते. आपल्या गरजा बोलून दाखवण्यात निर्लज्जपणा नाही, हे लक्षात येतं. प्रणयमग्न जोडीदारांनी एकमेकांशी मोकळेपणाने संवाद साधणं अजिबात चुकीचं किंवा गैर नाही. प्रणयोत्कटता आणि समाधानाची भावना ही निव्वळ पुरुषांची मक्तेदारी नाही, हे माहीत असूनही स्त्रिया स्वतःला व्यक्त करू शकत नाहीत. निखळ प्रणय म्हणजे 'स्व'शी प्रामाणिक राहून केलेला आचार हे लक्षात घेतलं तर फिफ्टी शेड्सच्या अनुवादाचं सार्थक झालं असं मी म्हणेन.

बाकी, या अनुवादामध्ये मी नेहमीसारखीच तल्लीन झाले. प्रत्येक अनुवाद मला एक नवीन जाणीव देतो. फिफ्टीने देखील ती दिली. त्यामुळे मी आता तिसरा भाग अगदी जोमात करते आहे. सुरुवातीचा संकोच आता उरला नाहीये. ॲना आणि ख्रिश्चन माझे सुहृद झाले आहेत. दिवसभरातून अनेकदा ते माझ्या मनात डोकावत असतात. जीवन समरसून जगण्यासाठी मला खुणावत असतात. भूतकाळाची ओझी बाळगण्यापेक्षा वर्तमानातला प्रत्येक क्षण समरसून जगण्याची धिटाई माझ्यात जागवत असतात.

तशी ती तुम्हा साऱ्यांत जागो, हीच सदिच्छा!

❖

साधीसुधी गोष्ट

एक ‘एक्स’ नावाचा क्रोमोझम फिरत फिरत
जाऊन मिळाला दुसऱ्या ‘एक्स’ क्रोमोझमला.
त्याचं ‘वाय’ शी सुद्धा मीलन होऊ शकलं असतं-कारण
‘एक्स’ आणि ‘वाय’ मध्ये मुळात काहीच फरक नाही.
जसा ‘ए’ आणि ‘बी’ मध्ये नाही,
‘आर’ आणि ‘एक्स’ मध्ये नाही, अगदी तसाच.
‘ओ’ आणि ‘पी’- वजनमापात आहे का एकापेक्षा दुसरा कमी?
‘एक्स’ आणि ‘वाय’- ह्यांच्याही किंमतीत काही फरक नाही.

‘एक्स’ आणि ‘एक्स’च्या मीलनातून जन्माला येतो माणूस
‘एक्स’ आणि ‘वाय’ च्या संयोगातूनही जन्म घेतो माणूस
काही शारीरिक भेद सोडले तर दोघात नसतो फरक
दोघेही हसतात-रडतात, खातात-पितात, झोपतात.
हळूहळू मानवी गुणदोषांसहित वाढतात.
कोणीच कोणापेक्षा कमी नसतो.

म्हणून दोघात फरक करण्याचं काहीच कारण नाही. पण
एक चटकन ओढून घेतो गादीवाली खुर्ची आणि जाड गाद्यागिरद्या,
संपत्तीतला ऐंशी टक्के भाग; आणि माशाचं डोकं.
दुसऱ्याच्या पानात काटे आणि उष्टं अन्
वाट्याला अळत्याची स्वस्त बाटली, केसाचं सुगंधी तेल.
‘एक्स’ आणि ‘वाय’ मध्ये ऐंशी आणि वीस,

उच्च आणि नीच, जास्त आणि कमी - ह्यांचा काय संबंध ?
पण ‘वाय’ बसलाय ‘एक्स’ च्या डोक्यावर,
मजेत पाय हलवत, शीळ घालत, आनंदात.
‘एक्स’ मात्र आहे जखमी.
त्याच्या गुडघ्यात दुखणं, कमरेत लचक.
हा भेदाभेद सगळेच पाहतात डोळ्यांनी
पण बोलत मात्र नाही कोणी
आमच्या तर छाटल्यात जिभा, शिवलेत ओठ
बांधलेत हात आणि पायात बेडी.

आम्हाला कधीतरी तोंड उघडता येईलका ?

– तसलिमा नासरिन
(‘निर्बाचित कविता’मधून)

❖



५ वी आवृत्ती

तुकयाची आवली

मंजुश्री गोखले



किंमत : २००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

आवलीला त्या घटनेचा पुरता अर्थ कळला.
ती विलक्षण चरकली.
बुवांच्या टाळ-चिपळ्या बुवांशिवाय?
आवलीनं टाहो फोडला. धनी ऽ ऽ ऽ! धनी ऽऽऽऽ!
आणि ती बुवांच्या बैठकीवर कोसळली.
बुवा ज्यांना आपले श्वास आणि उच्छ्वास म्हणत होते, त्याच टाळ-चिपळ्या आज बुवांपासून वेगळ्या, अनाथ होऊन बुवांच्या बैठकीवर पडल्या होत्या.
करपलेल्या काळजानं आणि चरकलेल्या मनानं त्या टाळ-चिपळ्या उराशी धरून आवली आकांत करत होती. तिचा आकांत सगळ्या गावकऱ्यांचं काळीज चिरत गेला. विठ्ठलाच्या मूर्तीचा थरकाप उडवत गेला. त्याच्या पायाखालची वीट थरारली.
इंद्रायणी क्षणभर वाहायचं विसरली.
विठ्ठल मंदिराच्या कळसाला छेदत आवलीचा टाहो आकाश फाडत गेला. नंतर कितीतरी वेळ त्याचे पडसाद आकाशातून येत राहिले. वाळवंटात कोसळत राहिले. विठ्ठलाच्या मंदिराच्या गाभाऱ्यावर आदळत राहिले.

मुक्त नको...
जागी हो!

– प्रज्ञा ओक

खूप कष्टानं मिळवलेली शिक्षणाची संधी स्त्रियांनी पुढच्या पिढीसाठी फक्त लिहिण्या-वाचण्यापुरती किंवा अर्थार्जनासाठीच वापरण्याची मनोधारणा निर्माण केली का? पुढच्या पिढीकडे खरंखुरं 'स्त्री' म्हणून जागं होणं का पोचलं नाही?

अमृता प्रितम यांची एक कविता आता माझ्यासमोर आहे. या कवितेतून स्वतंत्र स्त्रीचं आत्ताचं स्थान अधोरेखित होतं असं वाटतं. कवितेचा भावार्थ साधारण असा आहे. 'आज माझ्या घराचा पत्ता मी पुसून टाकलाय, तसंच गल्लीचं नावही पुसून टाकलंय; पण तरीही तुम्हाला मला भेटायचंच असेल तर प्रत्येक देशातल्या, प्रत्येक शहरातल्या गल्लीतला दरवाजा ठोठवा आणि जिथे कुठे स्वतंत्र' आत्मा' स्वतंत्र सत्त्व दिसेल तेच माझं घर असेल असं समजा....

स्त्री स्वतंत्र झाली... या एकविसाव्या शतकात तर ती स्वतंत्र म्हणूनच वावरतेय....अर्थात हेही बऱ्याच अंशी पांढरपेशा समाजापुरतंच अजूनही मर्यादित आहे, असं वाटावं इतपत आजूबाजूची परिस्थिती आहे.

साधारण एकोणिसाव्या शतकापासून सुरू झालेल्या स्त्री शिक्षणाच्या तसंच स्त्री सुधारणेच्या धडपडीला आता या काळात निश्चित असं फळ मिळालंय असं मानायला हरकत नाही. अर्थात या धडपडीसाठी अनेक समाजधुरीणांना सुरुवातीला प्रचंड प्रमाणात विरोध झाला, हेही सत्य आहे.

भारतीय स्त्रीच्या तुलनेत पाश्चात्त्य जगात औद्योगिक क्रांतीमुळे शिक्षणाची ओळख स्त्रियांना लवकर झाली. अन्यथा व्हिक्टोरियन

युगामध्ये तिकडेसुद्धा स्त्रियांनी घरातल्या घरात विणकाम, घर सांभाळणे, मुलाबाळांचं संगोपन एवढ्यावरच समाधान मानणं होत होतं. इंग्लंडमधल्या ज्या लोकशाहीबद्दल अगदी कौतुकाचा बोलबाला होता तिथेही स्त्रियांना राजकीय मतदानासाठी जबरदस्त लढा द्यावा लागला होता. एमिलिन पॅखर्स्ट यांच्या नेतृत्वाखाली हा लढा जवळ जवळ चाळीस वर्षं चालू होता.

भारतामध्ये इथल्या स्त्रीला शिक्षण मिळविण्यासाठी, इथल्या रूढी-परंपरांशी सातत्यानं लढावं लागलं. केशवपन, सोवळं-ओवळं यासारख्या स्त्रियांची वाताहत करणाऱ्या रूढी एकदम एकाएकी संपणं किंवा संपवणं शक्यच नव्हतं. सातत्यानं होणाऱ्या परकीय, त्यातल्या त्यात यवनांच्या आक्रमणानं 'स्त्रीसंरक्षण' या मुद्यावर तिला घराच्या चार भिंतींमध्ये अक्षरशः जखडून ठेवण्यात आलं होतं.... महर्षी कर्वे, रमाबाई रानडे, फुले दांपत्य यांनी स्वतःच्या अशा निरनिराळ्या मार्गांनी स्त्रियांना स्वच्छ प्रकाशात आणण्याचे सुफळ प्रयत्न केले, हे निर्विवाद सत्य. महर्षी कर्वे यांची सुरुवातीलाच झालेली हेटाळणी, रमाबाई रानडे यांना झालेला आप्तांचा विरोध आणि फुले दांपत्याला, त्यातल्या त्यात सावित्रीबाई फुल्यांना मिळालेले दगड-धोंड्यांचे प्रसाद हे कोणत्याही सुधारणेसाठी खचून जाण्यासारखेच होते; परंतु अथक प्रयत्नांचं फळ हे गोडच असतं हेही मानायला हवं.

साधारण शंभर वर्षांपूर्वीची ही परिस्थिती आणि आत्ताचं हे एकविसावं शतक... काळाचा प्रवाह अत्यंत वेगानं वाहतोय... आधुनिक काळातले स्त्रीमधले बदल हे नक्की इतक्या बेफाम वेगानं घडताना दिसतायत - काही वेळा मधल्या पिढीतल्या आमच्यासारख्या माणसांना संभ्रमात पडल्यासारखं होतंय. स्त्री शिक्षणाचा मूळ हेतू स्त्री 'जागृत' होणं असा आहे. किंबहुना तो तसाच असावा; परंतु सध्याच्या काही घटना, स्त्रीची वाटचाल आणि समाजातली आंदोलनं पाहता चांगलं आणि वाईटाचा लंबक फारच वेगानं फिरतोय असं दिसतं. स्वकर्तृत्वावर अत्युच्च्य पदावर पोचलेल्या स्त्रिया आणि माध्यमातल्या ग्लॅमरचं व्यसन लागलेल्या सुशिक्षित स्त्रिया.... परिणामस्वरूप होणारे गुन्हे... विकृतीकडे वाटचाल करणारा समाजपुरुष .... हे सर्व पाहिलं, ऐकलं की स्त्रीमुक्ती

म्हणजे नक्की काय, असा प्रश्न पडतो. माझ्या दृष्टीने माझ्या आवाक्यातली स्त्रीमुक्तीची व्याख्या इतकीच आहे, की 'स्त्रीजागृती' म्हणजे स्त्रीमुक्ती. स्त्री जागृत होणं याचा परिपूर्ण अर्थ आहे... अंतर्बाह्य जागृती! अन्यायाविरुद्ध आवाज उठवणं, खरंखुरं जागं होणं.... पोशाखातला बदल हे आधुनिक स्त्रीचं चिन्ह होता कामा नये असं वाटतं...

१८५७ सालामध्ये अमेरिकेमधल्या काचेच्या कारखानातल्या स्त्रियांनी आपल्या मागण्यांकरता बंड केलं होतं तो दिवस होता आठ मार्च! त्या दिवसापासून ८ मार्च हा महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. साधारण दीडशे वर्षांपूर्वी तिकडे स्त्रिया संघटित झाल्या आणि हे बंड केलं. त्यावेळी स्त्रीवरच्या अन्यायाला दुसऱ्या कोणी नाही तर स्त्रियांनीच वाचा फोडली.... म्हणजे स्त्री खऱ्याखुऱ्या अर्थानं तिथे जागी झाली, असं म्हणावं लागेल.

जगभरातल्या स्त्रियांचा विचार करता पाश्चात्त्य काय किंवा आशियाई स्त्रिया काय.... आधुनिकीकरण हे तर होणारच होतं; कारण काळ धावत असतो तसे बदल होतच असतात.... स्त्रीमधले बदल घडवण्यासाठी जगभरातल्या विचारवंतांनी, अनेक स्त्रियांनी अतोनात कष्ट घेतले. स्वतःच्या घरापासून ते समाजातल्या इतर घटकांकडून अनेक वेळा मानहानी पत्करली आणि स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणलं...स्त्रियांना मिळालेलं शिक्षण, स्वातंत्र्य, मिळालेल्या निरनिराळ्या संधी काही वेळा त्या संघर्ष करून मिळवाव्या लागल्या. हे सगळं स्त्रियांनी पुरेशा परिपक्वतेनं सांभाळलं का, असा प्रश्न वारंवार पडतो; अन्यथा बाहेर पोशाखापासून आधुनिक राहणी आणि आणि घरात निरर्थक रूढींची मनापासून जपणूक, असं चित्र घराघरामध्ये दिसतं. खूप शिकलेल्या स्त्रियासुद्धा विधवा स्त्रीला कुंकू लावताना अडखळतात, तेव्हा त्यांच्या शिक्षणाचा फोलपणा जाणवतो. खूप कष्टानं मिळवलेली शिक्षणाची संधी स्त्रियांनी पुढच्या पिढीसाठी फक्त लिहिण्या-वाचण्यापुरती किंवा अर्थार्जनासाठीच वापरण्याची मनोधारणा निर्माण केली का? पुढच्या पिढीकडे खरंखुरं 'स्त्री' म्हणून जाग होणं का पोचलं नाही? अन्यथा कौटुंबिक स्तरावर सुशिक्षित स्त्रिया या सुना-मुलींना 'कर्मकांडाच्या' भिंतीतून मुक्त का करू शकल्या नाहीत? कर्मकांड, रूढी-परंपरा,

३री आवृत्ती

ॲज आय सी...

भारतीय पोलीस सेवा...

मूळ लेखिका

डॉ. किरण बेदी

अनुवाद

माधुरी शानभाग

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

"आपण सर्व स्वत:च्या कृतीचे पोलीस झालो तर ती फार मोठी क्रांती ठरेल." "सुधारणा, वाईट गोष्टी रोखणे आणि चांगल्याचा अंमल करणे, यासाठी पोलीससेवेची सत्ता वापरता येते."

"ही सेवा मानवी हक्कांचे संरक्षण करू शकते अन् पायमल्लीही करू शकते. यातील काय निवडायचे ते

या सेवेत असणारे आणि येऊ पाहणारे, यांनीच ठरवायचे आहे."

"आज आपल्या देशातील पोलीससेवा काही राजकारणी वापरतात. आपला वापर होऊ द्यायचा की नाही हे आपणच ठरवू शकतो."

"ही सेवा सुलभ आणि परिणामकारक व्हायची असेल, तर सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने वाटचाल करायला हवी. असे द्रष्टे, कुशल, समर्पित नेतृत्व या सेवेतून पुढे यायला हवे अन् ते तळापर्यंत झिरपायला हवे आहे." पोलीससेवा अधिकाधिक लोकाभिमुख आणि नीतिमान कशी होईल यावर आपल्या दीर्घ, डोळस अनुभवाचे विचार मांडणाऱ्या डॉक्टर किरण बेदी, वाचकांना या पुस्तकाद्वारे आपल्या संवेदना, सहभाग आणि प्रतिक्रिया देण्यासाठी उद्युक्त करतात.

लग्नसमारंभातले काही अर्थशून्य विधी, मानपान यातून शिकलेल्या स्त्रियाही सुटल्या नाहीत, हेच खरं. मिळालेल्या शिक्षणाची हीच का फलश्रुती? समाजातल्या सर्व स्तरांपर्यंत हे स्वातंत्र्य पोहोचलं का?.... तर निश्चित होकारार्थी उत्तर देता येणार नाही. अर्थार्जन करणारी सुशिक्षित घरातली स्त्री आणि अर्थार्जन करणारी तळागाळातली स्त्री यामध्ये अजूनही प्रचंड अंतर आहे. तळागाळातली स्त्री अजूनही घरातल्या पुरुषांच्या वर्चस्वाखाली वावरते आहे. दहा घरची धुणी-भांडी करणारी स्त्री दिवसभर कष्ट करून घरी परतते तेव्हा घरी रिकामा बसलेला, दारूच्या नशेतला नवरा उशीर झाला म्हणून तिला फैलावर घेताना दिसतो. तिचे सगळे पैसे ओरबाडून घेऊन तिला घराची मोलकरीण म्हणून आणि रात्री मादी म्हणून वापरतो. ही अजूनही समाजातल्या खालच्या स्तरावरची सर्वसामान्य हकिगत आहे. त्या स्त्रीसाठी कुठे आहे स्वातंत्र्य? कुठे आहे स्त्रीमुक्ती? ती बंडही करू शकत नाही; कारण ती संघटित नाही. शिवाय परंपरांच्या मळलेल्या वाटेवरून तिचा प्रवास चाललेला आहे. त्यामुळे या एकविसाव्या शतकातसुद्धा अजूनही दारुड्या आणि मारहाण करणाऱ्या नवऱ्यासाठी ती वटपौर्णिमा मनापासून पूजते.

कशी आणि कुठून आणायची 'जाग' यांना? डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांच्या 'सर्च' या संस्थेच्या स्त्री जागृती शिबिरात भाषण करताना एकदा साधनाताई आमटे म्हणाल्या, ''स्त्री जागर आणि स्त्री मुक्तीच्या परिभाषेत बोलणं मला जमणार नाही. कारण आमची दुनिया वेगळी आहे. आमचे अनुभव सामान्य जगापेक्षा वेगळे आहेत; पण तरीही स्त्री जागृतीवर आजतागायत अनेक विचार पुढे येत आहेत. प्रबोधन चालू आहे; पण ते फक्त शहरांपुरतं, सुशिक्षित स्त्रियांपुरतं मर्यादित आहे. सामान्य मजूर वर्गातील स्त्रिया अजून आहेत त्याच ठिकाणी आहेत.''

सुशिक्षित स्त्रिया सुरक्षित घरातल्या छोट्या छोट्या तडजोडीचंही भांडवल करतात...स्वतःच्या पायावर उभं असण्यचा अभिमान जरूर असावा; परंतु स्वतःच्या पायावरचं हे उभं राहणं छोट्या छोट्या तडजोडींनी डळमळतं तेव्हा खंत वाटते.

गेल्या काही महिन्यांमध्ये सॉफ्टवेअरमध्ये काम करणाऱ्या मुलींचे खून झाले. काहींना बलात्कारांना सामोरं जावं लागलं. पुरुषांच्या बरोबरीनं,

त्यांच्या खांद्याला खांदा लावून बुद्धीच्या जोरावर यश पादाक्रांत करणाऱ्या या स्त्रियांची अखेरही अशी होणं म्हणजे समाजापुढे भलमोठं प्रश्नचिन्ह उभं राहतंय. शेवटी निसर्गानं दिलेल्या गोष्टी स्त्रीमुक्तीच्या लाटेनं उधळता येत नाहीत, हे स्पष्ट होतं. स्त्री ही बळानं पुरुषांपेक्षा निर्सगतः कमी आहे हे मान्य करणं भाग पडतं. मग या निसर्गदत्त देणगीवर तोडगा कसा काढणार? तर स्वसंरक्षणाच्या क्लृप्त्या शोधून काढून...

म्हणूनच सुरुवातीचा मुद्दा पुन्हा स्पष्ट करते... स्त्री मुक्त होण्यापेक्षा ती 'जागी' होणं आवश्यक आहे. उगीच देवळांमध्ये प्रवेशासाठी आंदोलनं करण्यापेक्षा स्वतःचा परिघ कुठपर्यंत आहे आणि आपण त्या परिघापर्यंत जास्तीत जास्त डोळसपणानं काय काय करू शकतो, हे तपासणं महत्त्वाचं आहे.

खून-बलात्काराच्या बातम्या वाचल्या की संभ्रम पडतो, आता पुन्हा दीडशे-दोनशे वर्षांपूर्वींच्या अंधाऱ्या गुहेत बायकांनी जायचं का? शिक्षणानं जाग येण्याऐवजी 'माज' येतो का काय, हा निर्लज्ज प्रश्न मनात वारंवार डोकावतो.

समाजसुधारकांचे अतोनात कष्ट, कष्टातून लखलखीतपणे पुढे आलेल्या स्त्रिया, स्वशिक्षणाचा त्यांनी 'जागृती' साठी केलेला उपयोग आणि त्याची गोमटी फळं हे चित्र सध्या धूसर का वाटतेय?

सुधा मूर्तींसारखी विद्वान स्त्री अत्यंत साधेपणानं राहूनही स्वतःच्या हक्कासाठी जे.आर.डी. टाटांबरोबर हुज्जत घालू शकली. कमला सोहोनींसारखी शास्त्रज्ञ, घर अत्यंत उत्तमरीत्या सांभाळून त्याकाळच्या केवळ पुरुषी क्षेत्रात कार्यरत राहून संशोधन करत राहिली. अशा अनेक स्त्रिया साध्यासुध्या राहून आत्मविश्वासानं पुढे जात राहिल्या. आत्ताच्या चंदा कोचर, पेप्सीच्या इंद्रानुयी, अरुंधती भट्टाचार्य अशा अनेक क्षेत्रातल्या उच्च पदावरच्या स्त्रियांचा अभिमान वाटतो... पण मग तरीही समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन फक्त 'मादी' म्हणून असावा, अशी परिस्थिती का उद्भवलीय....

रोजची वर्तमानपत्रं, बातमीपत्रं देणाऱ्या वाहिन्या या सदोदित बलात्कार-खून आणि विकृती यांचंच चित्रण भडकपणे का करतात, सामूहिक बलात्कार हा साथीच्या रोगासारखा पसरतोय. कुठल्याही वयाच्या

बालिकेपासून ते प्रौढस्त्रियांपर्यंत...बलात्कार होतातच... माणसातला हिंस्त्र पशू 'स्त्री'कडे अजूनही 'मादी' म्हणूनच का पाहतोय? आजच्या स्त्रीसाठी पुरुषांना कठोर शिक्षा देणारे कायदे आवश्यक आहेत. आता स्त्रियांनी केवळ या गोष्टींसाठी संघटित होणं आवश्यक आहे. आता शिक्षणाचा मार्ग सुकर झालाय. त्याच शिक्षणाचा उपयोग करून खडबडून जागं होऊन निराळा पवित्रा घ्यायला हवाय. मंदिर-मशिद प्रवेशासाठी चळवळी करण्यापेक्षा स्त्रीच्या संरक्षणासाठी पुरुषांना कठोर शासन होणाऱ्या कायद्यांची मागणी करा. कायद्याची अंमलबजावणी तत्परतेनं होण्यासाठी आक्रमक व्हा. नुसत्या मेणबत्त्या पेटवून, मूक मोर्चा काढून हे बलात्कारी नराधम ताळ्यावर येणं शक्य नाही... त्यासाठी बायकांनीच कठोर पावलं उचचली पाहिजेत आणि सध्याची अस्वस्थता संपवली पाहिजे.

सध्या स्त्रियांच्या बाबतीत प्रगतीच्या दृष्टीनं सगळं आलबेल आहे असं दिसतं; पण आहे आलबेल तरी... कुठेतरी काळजात भीती आहे. अस्वस्थता आहे...

दीडशे वर्षांपूर्वी शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. मुख्य प्रवाहात येण्यासाठी धाप लागेपर्यंत धडपड करावी लागली.

आता या वर्तमानकाळात तिच्या स्त्रीत्वालाच मुळी आव्हान दिलं जातयं... म्हणूनच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे तिनं फक्त पोशाखापुरतं, शिक्षणापुरतं आधुनिक न होता 'जागं' होणं अत्यंत आवश्यक आहे.

❖

२ री आवृत्ती

ओंकाराची रेख जना

स्त्री आणि शूद्र असूनही
युगप्रवर्तक अभंगरचना
करणाऱ्या
संत जनाबाई यांची जीवनयात्रा!

मंजुश्री गोखले

किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

जनीनं हरिश्चंद्र आख्यानाचा आणि कीर्तनाचा समारोप केला.सगळी इतकी भारावून गेली होती की, कीर्तन संपल्यावर विठूनामाचा गजर करण्याचं भानही कुणाला राहिलं नव्हतं. जनीच्या चेहऱ्यावरचे बधिर भाव बघून नामदेवाला भडभडून आलं, तर ज्ञानेश्वर गहिवरले. त्या दोघांना समोर बघून जनी लहानाहूनही लहान झाली. लटपटत्या पावलानं थरथरत उभी असलेली जनी खाली कोसळणार तोच ज्ञानेश्वर-नामदेवांनी तिला सावरलं. पोटाशी धरलं. प्रेमभरानं तिच्या पाठीवर थोपटून तिला सामोरी केली. आणि म्हणाले ''धन्य ऽऽ! धन्य हो जनाबाई तुम्ही! जनाबाई, तुम्ही एक स्त्री, त्यातही शूद्र; पण इतकी अर्थपूर्ण आणि भावगर्भ रचना तुम्ही करू शकता हा या युगातला चमत्कार मानावा लागेल. तुमचा प्रत्येक हुंकार म्हणजे ओंकार आहे. ओंकार ही त्या ईश्वराची मोहोर आहे. देवाची स्वाक्षरी आहे. आणि जनाबाई, तुम्ही त्या 'ओंकाराची रेख' आहात, ओंकाराची रेख!'' एक म्हणजे विठ्ठलाच्या दगडी मूर्तीच्या डोळ्यांतून पाणी का वाहत होतं आणि दुसरी म्हणजे गर्भागारात नेहमीच्या 'विठ्ठल विठ्ठल' या ध्वनिगुंजनाऐवजी 'ओंकाराची रेख', 'ओंकाराची रेख' असा काहीतरी ध्वनी कसा घुमत होता याचा!

आमची स्त्रीविषयक पुस्तके

hemlekeâeÛe veeJe	DeveJeeo	ekeâcele
[eÙeje DeeHeâ Deve øeâkeâ : Deve øeâkeâ	ceie}e eveie[keâj	220
veeš eJeoeTš ceeÙe [ešj : yeóe cenceoe	}evee meenevee	240
meeceepÙe yejKÙeeceeieÛe : keâejceve eyeve }eove	DeeJeveeMe ohe	180
ceÙeeoe - FjekeâÛee keâvÙee : peeve memeve	Yeejlee hee[	295
mheeÙe eØevmeme : ßeeyevee yeeme	Yeejlee hee[	250
enjeFve DeeHeâ o [Peš : [evÙee De}-veen	MeeYevee eMekeâveeme	150
De¤CeeÛee iee° : ehekeâe eJejeCee	ceevee keâeCekeâ	180
yevš Me[epe : keâeceuee Meecemee	jMcee keâuekeâCee	320
eye}eieie : mececce De}e	emeOe peeMee	240
Skeâekeâe ye[: keâLejeve yeeukeâeJnkeâ DeeeCe keâje ueeve	emeOe peeMee	250
o ØeeÙeJnš hehej DeeHeâ Fmšve pÙeJeue : ceejeve eue[ue	$e+pelee keâuekeâCee	280
o [eÙeje DeeHeâ ceje yeie : Sme.S}. MveeÙe[jceve	MeeYevee eMekeâveeme	180
ceeÙe vece Fpe meucee : HeâeeoÙee Heâkeâej	mven} peeMee	200
ieume DeeHeâ ejÙeeOe : jpee DeumeeeveÙee	mven} peeMee	260
eJnoj peemšme : veeovee DeePee	eØeÙekeâe keâuekeâCee	110
lejene epeJele cee : meDeeo	ieeje keâUkeâj	250
eJeoMee keâvÙee : meeeoÙee MeHeâ[	mvenuelee oeleej	390
JeoveÛee Heâue : ceeejDeele keâeceeje/mePeve cekeueue[	meveoe Decejehejkeâj	200
eveJÙeepe Øece : Deve veceekeâ	Deeveo JeÅe	140
ceePÙee DecceeÛee iee° : nveve Deue-MeKe	Jeovee keâ[škeâj	295
iee° Skeâ keâjeveeÛee : mkeâeš Dee’[ue	ce$eÙee peeMee	195
ecejepe : ye[}e Ûeõjlvee	meveoe Decejehejkeâj	130

Deve DeeÙe Heâej Deve DeeÙe :		
ye[}e Ûeõjlvee	meveoe Decejehejkeâj	120
GieJeleeÛÙee eoMeuee : pÙeeueÙee «eiemeve	MÙeeceue keâuekeâCee	550
leÛe eove meeveje... : lenececee Devece	Yeejlee hee[	295
ye[šeHeâkeâ : meeÙeceve ueFme	Øemeeooòe iee[ieeU	350
le®ieelee }meeJeuÙee : ¤Peyen Ye¤Ûee	}evee meenevee	200
FjeCeceOeve meškeâe :		
mePeeve DeePeeoe/Depe }e Heâjevle	eJeo }e šekeâkeâj	250
JeF Deej heDej yeš mee cevee : Fuee Yeó	meveeele keâeCe	295
ceòeâ eJenie : ÛeeveÛÙee leeve keâvÙee :		
peie Ûeie	eJepeÙee yeeheš	600
eleyešÛÙee JeešJej : meeyeS šveyekeâve	Jevovee De$e	240
KejKeeveeÛee JeŒeeÅeeepekeâe : ieue ueceeve	Je<ee JeueCekeâj	200
mekeime Jekeâj : vee }vee pecee }e	meeØeÙee Jekeâe}	120
cee, meheleheeue, ieueeyee mee[eJeeuee jCejeeieCee		
: Devee yejLee[	meeØeÙee Jekeâe}	170
cee ceueeuee : ceueeuee ÙemeHeâpeF	meeØeÙee Jekeâeue	295
Fve o vece DeeHeâ Deevej : ceKleej ceeF	Gukeâe jeTle	80
Deiuee : keâevmšvme eyemkeâe	Gukeâe jeTle	250
eyeÙeev[Deiuee : keâevmšvme eyemkeâe	Gukeâe jeTle	250
mekeâue DeeHeâ ueeFš: ekeâjCepeele		
DenueJeeeueÙee/jeenuee iehlee	G<ee cenepeve	350
o je[DeeHeâ ueemš Fveemevme :		
meeceeuee ceece	Yeejlee hee[	160
Deeuee-DeeOeeej : yeyee neueoej	ceCeeeuevee ie[keâje	160
mueceieue [eecie : ®eyevee Deuee	ce$eÙee peeMee	140
e[veeÙeue : peemekeâe mšve	ce$eÙee peeMee	320
Mece : pemeeJeoj meIeje	meveoe Decejehejkeâj	250
S jeMeÙeve [eÙeje :		
Devee heeeuelekeâeJemkeÙee	MeeYevee eMekeâveeme	300
FevHeâ[ue : DeeÙeeve enjmee Deuee	veeuee Ûeeoejkeâj	410
o ØeeFme DeeHeâ ueJn :		
evekeâeuee še. pecme	ceevee šekeâUkeâj	220

veece[: DeeÙeeve enjmee Deuee	Øeepeòeâe eÛe$e	280
Devekeâe[Meve}}Jn		
: veleee}Ùee DeeeieDeevee/Jnvemee neJee[	vee}e Ûeeoejkeâj	260
Deeceve - o DeešeyeeÙee«eeHeâe DeeHeâ De veve		
: ememšj pemcee	meveoe Decejehejkeâj	180
ueHeiš š šue		
: Fcceekeâuee Feueyeeeiepee/mšeJn SeJeve	pÙeelmvee ueue	295
ceePee ueueeešj<ee : veeHeâmee nepee	Meeuee keâejKeeveeme	300
Dee"JeCeeÛe ceelee : Jnje eieemeie	[e. eJeveÙee OeejJee[keâj	240
Skeâe ceeleÛee ue{e		
: heceuee ejÛe[meve/peve yeeTueš	me<ecee peeMee	295
cee Peeje ienjceevee Skeâ oMeõene		
: Peeje ienjceevee	jMcee keâuekeâCee	200
ÛeekeâeÛee KeÛee	vemeecee njpekeâ	230
Yeeie} pe o:Ke lÙee}e...	DeeMee Deehejeo	250
yeejyee}e	JeMee}e nUoCekeâj	220
YeejleeÙe mJeele$Ùe}{Ÿeelee}eŒeÙee :		
veJeePe ceeoe	Deve. Jeemelee Heâ[keâ	300
DelejeUJeej meveelee eJeuÙecme		
: keâhšve Sme. Me<eeõe/DejeeOekeâe Mecee	Deve. eÛe$ee JeeeUye	90
Feoje : keâLejeve øeâkeâ	Deve. }evee meenevee	440
meeeveÙee ieeOee : Skeâ DevevÙemeeOeejCe peeJeveØeJeeme		
: jeCee emeie	Deve. ueevee meenevee	350
DeeIee[eÛe ceenuee velelJe : meOee ceveve	Deve. meecelee yeejme	280
mJehveekeâ[ve melÙeekeâ[		
(keâuhevee ÛeeJe}eÛee keâneCee)	ceeOeje MeeveYeeie	60
ceoj šjmee	Devele yeojkeâj	295
ceje"Meenelee}ceveemJevee	[e. me. j. oMehee[	140
veeye}}}vee - Yeeie 1	ceeje emejmecekeâj	180
veeyeue ueuevee - Yeeie 2	ceeje emejmecekeâj	120
®heje emeOe	Deleue keânele	125
›eâeeleÙeeeievee Yeeievee eveJeeolee	ceCeeeuevee ie[keâje	450

epeÛÙee nelee heeUCÙeeÛee oeje..

: mšHeâvee nMe/nvee meeueimeve	Deve. meveeele keâeCe	280
keâceÙeeeievee (DeenuÙeeyeeF neUkeâj)	eJepeÙee peneeiejoej	300
veeueeeievee (õeheoe)	emcelee heeleveeme	400
DeeOeUe : keâLejeve eheÙeme	Meevlee MeUkeâ	140
keâ®Cee<škeâ	JÙekeâšMe cee[ieUkeâj	140
keâlekeâj Jeenvee	Gcee keâuekeâCee	200
}ppee : lemeeuecee veemeejve	}evee meenevee	195
eveÙelee	ceeOeJee omeeF	120
njJe}uÙee Jeeše	ceeOeJee omeeF	120
ceepeje	ceeOeJee omeeF	150
keâLee meeJe}eÛee	ceeOeJee omeeF	190
Ûee[keâ	jepeve ieJeme	150
ejJeCeeJeeÙe}e ceiee	jepeve ieJeme	150
Skeâ heeÙeje Jej	mJeelee Ûeeoekeâj	160
HeâejJe[De[e[eueš	mJeelee Ûeeoekeâj	180
Dekeâjenle MevÙeeÛee yejepe : eovekeâj pee<ee Depevee vejJeCe		160
ceneYeejleelee}ceeleJeovee : eovekeâj pee<ee me<ecee MeeeU«eece		110
e"keâje	Je. he. keâeU	70
ne Jeeš SkeâšeÛee	Je. he. keâeU	150
ceneÕelee : meOee celee	Gcee keâ}keâCee	150
[e}j yen : meOee celee	Gcee keâ}keâCee	150
hejele : meOee celee	Gcee keâuekeâCee	200
DeemlelJe	S. Deej. Ùeeoe	100
veJee Œee	eJe. me. Kee[keâj	140
hejJeevee : [yeeje Seueme	DeheCee JeueCekeâj	140
MeeePeÙee : [yeeje Seueme	DeheCee JeueCekeâj	110
o ye[eJevej : [yeeje Seueme	DeheCee JeueCekeâj	120
De#eÙehee$e : eyevo Yeš	Depevee vejJeCe	200

❖

स्त्री-प्रधान साहित्याची मोहिनी

- रेश्मा कुलकर्णी-पाठारे

हिऱ्याला जेवढे पैलू नसतील इतके एका
स्त्रीच्या स्वभावाला व व्यक्तिमत्त्वाला असतात
असं म्हणतात - आणि म्हणूनच तिला
आपल्या लेखनाच्या केंद्रस्थानी ठेवावं ह्याची
मोहिनी जगभरातील लेखकांना नेहमीच
पडलेली दिसून येते.

There are only three things you can do with a woman;
Love her, suffer her, or make literature out of her.

'स्त्री साहित्याचे वैश्विक आयाम' ह्या विषयावर जेव्हा 'मेहता मराठी ग्रंथजगत'साठी लेख लिहिण्याची सुवर्ण संधी मिळाली, तेव्हा मला सर्वांत प्रथम सुप्रसिद्ध अमेरिकन साहित्यिक हेन्री मिलर यांचं उपरोक्त वाक्य आठवलं. विचार करू लागले तसं लक्षात आलं, की खरोखरीच, गेली कित्येक शतकं, आपल्या देशातल्या आणि परदेशातल्या साहित्यामध्ये 'स्त्री' ही विविध अंगाने केंद्रस्थानी राहिली आहे. लेखक स्वत: स्त्री असो वा पुरुष, त्यांना बहुतांश वेळी एका स्त्री पात्राला आपल्या लिखाणाच्या केंद्रस्थानी ठेवावंसं वाटलेलं आहे. कधी ती नायिका असते, तर कधी खलनायिका; कधी भावुक असते तर कधी कणखर; कधी चतुर असते तर कधी अगदी बावळट, भोळसट - मात्र, तिचं रूप कुठलंही असलं तरी स्त्रीवर आधारलेल्या साहित्याला वाचकांची नेहमीच भरभरून दाद मिळालेली आहे. जेन ऑस्टेनचे 'प्राईड ॲण्ड प्रेज्यूडाईस, आर्थर गोल्डनचं 'मेमॉयर्स ऑफ अ गेईशा', खालेद होसेनीचं 'अ थाऊजन्ड स्प्लेन्डिड सन्स', गुरू रविंद्रनाथ

टागोरांचं ‘चोखेर बाली’, शांता गोखलेंचं ‘रिटा वेलिनकर’ - अशी असंख्य उदाहरणं देता येतील हे सिद्ध करण्यासाठी की स्त्री-अभिमुख साहित्य हे नेहमीच खूप प्रसिद्ध झालं आहे. पुरुष केंद्रस्थानी असलेलं साहित्य कमी चांगलं असतं असं मुळीच नाही; पण स्त्री जिथे केंद्रस्थानी असते, ते साहित्य वाचकांना अधिक खिळवून ठेवतं; कारण त्यामध्ये असलेली आंतरिक ताकद, वाचकांमध्ये वैचारिक आणि एकूणच सामाजिक बदल घडवून आणायला कारणीभूत ठरते.

पण हे असं नेमकं का आहे? काय आहे असं एखाद्या स्त्रीमध्ये की ती पुस्तकांच्या निर्जीव पानांना निव्वळ आपल्या अस्तित्वाने एवढं सजीव करू शकते? त्या साहित्याला एवढं सबल करू शकते? माझ्या मते, या प्रश्नाचं उत्तर कलाशास्त्राच्या प्रणालीमध्ये खूप छान गवसते. कुठलीही स्त्री - मग ती प्रत्यक्ष असो, वा एखाद्या लेखकाच्या कल्पनेतली मूर्ती असो - ही कलाशास्त्रामध्ये वर्णिलेल्या नवरसांची मूर्तस्वरूप असते. हास्य, कारुण्य, अद्भुतता, प्रसंगी रौद्रता - हे सगळे गुण ती आपल्या विविध भूमिकांमध्ये इतक्या विलोभनीय पद्धतीने दर्शवत असते की त्यामुळे प्रत्येक पुस्तकातलं स्त्री पात्र खूप रोचक होऊन जातं. हिऱ्याला जेवढे पैलू नसतील इतके एका स्त्रीच्या स्वभावाला व व्यक्तिमत्त्वाला असतात असं म्हणतात - आणि म्हणूनच तिला आपल्या लेखनाच्या केंद्रस्थानी ठेवावं ह्याची मोहिनी जगभरातील लेखकांना नेहमीच पडलेली दिसून येते. तस्लिमा नसरीन, माया एंजेलू, तेहमीना दुर्रानी, काझुओ इशिगुरो, या आणि अशा जगाच्या कानाकोपऱ्यातील व निरनिराळ्या दशकांमध्ये कामे केलेल्या कित्येक लेखक-लेखिकांनी स्त्रीची विविध रूपं दर्शवणारी उत्कृष्ट पुस्तकं लिहिलेली आहेत. एंजेलू यांचे ‘आय नो व्हाय अ केज्ड बर्ड सिंग्स’ यामध्ये त्यांनी वंशद्वेषावर मात मिळवून स्वत:चं अस्तित्व निर्माण करण्यासाठी पूर्वीची भोळसट माया (त्या स्वत:) कशी कणखर बनत जाते याचं वर्णन केलं आहे. तर, दुर्रानी यांच्या ‘ब्लास्फेमी’सारख्या हादरवून टाकणाऱ्या साहित्यकृतीमध्ये धार्मिक बंधनांत अडकलेल्या एका स्त्रीचे हृदयद्रावक वर्णन केलेले आहे. जागतिक पातळीवर,

स्त्रियांच्या समस्या आणि त्यामधून वाट काढणाऱ्या स्त्रियांचे अनुभव हे दोन विषय नेहमीच वाचकांच्या पसंतीला उतरले आहेत. कदाचित, प्रत्येक समाजामध्ये (अगदी आजतागायत), स्त्रीवर निरनिराळ्या प्रकारचे अत्याचार होत असल्यामुळे आणि त्यांमधून तावून-सुलाखून फारच कमी स्त्रिया बाहेर येत असल्यामुळे, सदर वाचनसाहित्य वाचकांच्या मनाला भिडत असावं.

वैयक्तिकदृष्ट्या सांगायचं तर, माझी स्वत:ची साहित्ययात्रा सुरू करून देण्यामध्ये एका स्त्रीचाच - अर्थात, माझ्या आईचा - फार मोलाचा वाटा होता. ती स्वत: अगदी पुस्तकांचा फडशा पाडणारी वाचक असल्यामुळे, घरामध्ये वाचनाचे संस्कार कोवळ्या वयापासून केले गेले. तशी तिला विविध विषयांवरची पुस्तकं वाचायला आवडत असली, तरी लहानपणापासून मी तिला सुनीता देशपांडे यांचं 'आहे मनोहर तरी...', साधना आमटे यांचं 'समिधा', आशा बगे यांचं 'भूमी' यांसारखी स्त्री-अभिमुख पुस्तकं वाचताना अधिक बघितलं असल्यामुळे, माझ्यावर नकळत तसेच संस्कार घडत गेले. आज, मी जरी पु.ल. देशपांडे, विश्वास पाटील, सिड्ने शेल्डन यांसारख्या थोर लेखकांची विविध विषयांवरची पुस्तके वाचत असले, तरी माझा काकणभर अधिक ओढा हा जीन सॅसन, तेहमीना दुर्रानी, आयान हिरसी अली, कविता महाजन यांसारख्या स्त्री-अभिमुख साहित्य लिहिणाऱ्या लेखकांच्या कलाकृतींकडे असतो. इंग्रजी आणि मराठी ह्या दोन्ही भाषांमध्ये स्त्री-अभिमुख साहित्य वाचून मोठी झाल्यामुळे, मेहता पब्लिशिंग हाऊससाठी जेव्हा सगळ्यात पहिल्यांदा कमिला शामसी यांचं 'बर्न्ट शॅडोज' हे पुस्तक अनुवादित करण्याची संधी मिळाली, तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा झाला. एक तर, कमिला शामसीसारख्या जगप्रसिद्ध आणि कैक पुरस्कारांनी नावाजलेल्या लेखिकेचं पुस्तक, तसंच, त्या आधी त्यांचं 'सॉल्ट ॲण्ड सॅफ्रन' हे अमेरिकेमध्ये राहणाऱ्या एका पाकिस्तानी मुलीच्या आयुष्यावर बेतलेलं अतिशय सुंदर पुस्तक मी वाचलं असल्यामुळे, शामसी या स्त्री-विषयक साहित्य किती सहजसुंदर लिहितात याबद्दल मला माहिती होती. त्यात,

नवं कोरे

ॲज आय सी...

स्त्रियांचे सक्षमीकरण...

मूळ लेखिका
डॉ. किरण बेदी

अनुवाद
माधुरी शानभाग

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

''सतत शिकणे अन् मिळालेले ज्ञान वाटून घेणे यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी जे पाहते, ऐकते, वाचते त्यातील जे मला अस्वस्थ करते, त्याबद्दल लिहिणे हे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते.

विशेषत: स्त्री आणि तरुण यांच्या सक्षमीकरणासाठी सर्वांनी सजग राहून कृती करायची गरज आहे.

लेखणीची ताकद वापरून, सामान्यांचा आवाज जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी हाती निशाण धरायचे काम मी यापुढेही करत राहीन.''

डॉ. किरण बेदी यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या प्रश्नांवर लिहिलेल्या लेखांचे हे संकलन, वाचकांना स्त्रीप्रश्नांबद्दल संवेदनशील करेल आणि प्रतिसाद द्यायला, कृती करायला उद्युक्त करेल.

मी जपानी भाषेची विद्यार्थिनी असल्याकारणाने, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानवर झालेल्या भयंकर बॉम्ब-हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या हिरोको तानाका या जपानी स्त्रीच्या रंजक जीवनप्रवासावर बेतलेलं हे पुस्तक मला अधिकच जवळचं वाटलं नसतं तरच नवल होतं. हिरोशिमा-नागासाकीवरील बॉम्बहल्ल्यांमुळे हिरोकोच्या आयुष्याला अकल्पित कलाटणी मिळते. आपलं घर, आपली माणसं, आपला प्रियकर हे सगळं एका क्षणात गमावून बसलेली हिरोको, कुठल्या मनोबल्याचा आधार घेऊन दिल्लीमध्ये नवं आयुष्य सुरू करते, पुन्हा एखाद्या व्यक्तीवर प्रेम करण्याची ताकद मिळवते, सर्वस्वी अनोळखी देशामध्ये व संस्कृतीमध्ये स्वत:ला कशी समरस करते - या व इतर अनेक कारणांसाठी 'बर्न्ट शॅडोज'चा अनुवाद करणं माझ्यासाठी फारच रोमहर्षक आणि अविस्मरणीय अनुभव ठरला. आपलं संपूर्ण आयुष्य पाचोळ्या-सारखं अस्ताव्यस्त होऊनही एक स्त्री निव्वळ आपल्या हुशारीवर, मनोधैर्यावर आणि मेहनतीवर स्फिंन्क्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा राखेमधून कशी उभी राहू शकते याचं चित्रण सदर पुस्तकात इतकं सुंदररीत्या केलं गेलं आहे, की त्याला तोड नाही.

अशाच दुसऱ्या एका विलक्षण स्त्रीवर आधारलेल्या पुस्तकाचा अनुवाद करण्याची मला पुन्हा संधी मिळाली ती झारा गहरमानीने स्वत:च्या एका विदारक अनुभवावर लिहिलेले 'माय लाईफ ॲज अ ट्रेटर'च्या निमित्ताने. लेखिका झारा गहरमानी निव्वळ १९-२० वर्षांची असताना, त्यावेळच्या इराणच्या सत्ताधाऱ्यांवर, आपल्या कॉलेजमध्ये (तिने) भाग घेतलेल्या प्रदर्शनांमध्ये स्फोटक भाष्यं व कृत्यं केल्याबद्दल, तिला एके दिवशी, भर दुपारी तेहरान शहराच्या रस्त्यावरून उचलून तुरुंगामध्ये डांबलं गेलं. तोपर्यंत अतिशय सुखद आणि सुरक्षित आयुष्य जगलेल्या झारासाठी हा फारच मोठा धक्का होता. तुरुंगामधील अट्टल गुन्हेगारांच्या संगतीने राहणं, पोलिसांची वेडीवाकडी मारझोड सहन करणं, सतत उभे-आडवे प्रश्न विचारून तिला भंडावून सोडणाऱ्या राक्षसी प्रश्नकर्त्यांच्या तावडीतून स्वत:चा बचाव करत राहणं, आपल्यावर देशद्रोहाचा भयानक आरोप ठेवला

गेलाय ह्या बातमीचा आघात पचवूनही स्वत:चं मानसिक संतूलन शाबूत ठेवून सुटकेचे प्रयत्न करणं - हे सगळं करत आपण इराणच्या एव्हिन तुरुंगातील तीस यातनामय दिवस कसे घालवले याचं प्रखर आणि वास्तववादी चित्रण केलेल्या आपल्या पुस्तकाद्वारे, झारा गहरमानी तमाम स्त्रीवर्गासाठी एक आदर्श ठरते. आपल्यावर एवढ्या लहान वयात ओढवलेल्या इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही एक स्त्री - जी एरव्ही पुरुषापेक्षा दुर्बल समजली जाते - मानसिकरीत्या किती सक्षम आणि कणखर राहू शकते, ह्याचं झाराने अतिशय सुंदर वर्णन केलेलं आहे. तसंच, त्या काळच्या इराणमधील राजकीय परिस्थिती कशी होती, सामान्य जनतेला कसा त्रास दिला जात होता या सगळ्या बाबींचं तिने जे चोख चित्रण केलंय त्यामुळे तिची राजकीय आणि सामाजिक समज किती गहन आहे याचंही प्रत्यंतर येतं. असं हे रोमहर्षक पुस्तक अनुवादित करणं ही माझ्यासाठी एक निराळीच पर्वणी होती.

अनुवादक म्हणून काम करताना, मला या अशा विषय आणि आशयसंपन्न स्त्री-अभिमुख साहित्यकृती अनुवादित करता आल्या हा मी एक प्रकारे स्वत:च्या स्त्रीत्वाचा गौरव समजते. समाजाच्या ज्या गटसमूहाला - अर्थात स्त्रियांना - नेहमी दुर्बल, कनिष्ठ व दुय्यम समजलं जातं, त्याच समूहाचा मी एक भाग आहे. अशातच, जेव्हा स्त्रियांच्या अस्तित्वाने, शब्दाने वा अनुभवाने संपन्न झालेल्या साहित्यकृती अनुवादित करण्याची मला संधी मिळते, तेव्हा तिचा आनंद शब्दांत वर्णन करता येण्यासारखा राहत नाही आणि विशेष म्हणजे, त्या अनुवादित पुस्तकांना जेव्हा पुरुष वाचकांची भरभरून दाद मिळते, तेव्हा खऱ्या अर्थानं भरून पावल्यासारखं वाटतं - नुसताच आपला अनुवाद वाचकांना आवडतोय म्हणून नाही, तर त्या निमित्ताने स्त्रीच्या सामर्थ्याचा डंका अजून दूरवर पसरत चालला आहे, आणि त्याला कुठेतरी, कणभर का होईना, मी निमित्तमात्र आहे या दोन्ही भावनांचा मिलाफ मनाला फार आनंद देऊन जातो.

❖



वाळूत मी घर बांधते

तू पोहणारा सागरी
वाळूत मी घर बांधते
मी बोळक्यांतुन मातिच्या
सुखदु:ख माझे रांधते.

हेलावते उभयांमध्ये
आभाळ शब्दांवाचुनी
श्वासांतली ही अंतरे
गीतातुनी मी सांधते.

एकातुनी एकापुढे
विस्तारती क्षितिजे तुझी
मी चार या भिंतींमध्ये
संसार माझा मांडते.

झेलीत माथा सूर्य तू
लाटांतुनी जासी पुढे
आभास घेउन भोवती
तिमिरातुनी मी नांदते.

ही बंधने तोडावया
आणू तरी बळ कोठूनी?
जाणूनही दुबळेपणा
माझ्यासवे मी भांडते.

झेपावते तुझियाकडे
येते पुन्हा मी मागुती
असहाय माझी वेदना
माझ्या उरातच कोंडते.

– शान्ता शेळके

(‘अनोळख’मधून)

❖

२ री आवृत्ती

शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या व तालिबानच्या गोळ्या झेलणाऱ्या मुलीची कहाणी

मी मलाला



मूळ लेखिका
मलाला युसूफजई
सहलेखिका
क्रिस्टिना लॅम्ब

अनुवाद
सुप्रिया वकील

किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

निसर्गसौंदर्याचं लेणं लाभलेल्या स्वात खोऱ्याचा तालिबानने ताबा घेतला तेव्हा एका मुलीनं आवाज उठवला. ती मुलगी म्हणजे – मलाला युसूफजई.
तिने तिच्या शिक्षणाच्या हक्कासाठी लढा द्यायचं ठरवलं...
पण, मंगळवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०१२ रोजी तिला याची किंमत मोजावी लागली. शाळेतून बसने घरी परतत असताना, वाटेत तिच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. आणि एकाएकी तिचं आयुष्य जीवन-मरणाच्या खोल दरीत लोटलं गेलं...
पण ती या हल्ल्यातून आश्चर्यकारकरीत्या वाचली,
आणि तिच्या ध्येयासाठी त्याच निर्धारानं कार्य करत राहिली...
ही आहे मलालाची कहाणी –
एक कोवळा आवाजसुद्धा परिवर्तनाची पहाट जागवू शकतो याची साक्ष देणारी...!

अंतरीचे तेज...

- शीला कारखानीस

अपार कष्ट घेण्याची तयारी, तीव्र इच्छाशक्ती, होणाऱ्या बदलांशी चटकन जुळवून घेण्याची मानसिकता, सहनशीलता, सहृदयता ही सारी स्त्रियांची बलस्थाने आहेत. ती पूर्वीही होती. आजही आहेत.

प्राचीन काळातले काही अपवाद सोडले तर जगातल्या सर्व समाजांमध्ये स्त्रीचे स्थान नेहमी दुय्यम दर्जाचेच राहिलेले आहे. भारतीय आणि पाश्चिमात्य समाज कितीही पुरोगामी असले तरी त्यातल्या स्त्रियांना आपले न्याय्य हक्क मिळवताना प्रत्येक पायरीवर एक लढाईच लढावी लागली आहे. मग तो हक्क मतदानाचा असो की वारसाहक्क मिळवण्याचा असो. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्यांची ही कथा, तर मग कट्टर धर्माभिमानी आणि प्रतिगामी अशा मुस्लीम समाजाबद्दल काय बोलावे? परंतु एक गोष्ट मात्र नक्की. काळ कुठलाही असो, समाज कुठलाही असो, वा धर्म कुठलाही असो, अंतरंगात घेऊन आलेल्या एका जन्मजात ठिणगीमुळे एखाद्या स्त्रीचे कर्तृत्व तेजाने उजळून निघते. ती अन्याय सहन करू शकत नाही, स्वातंत्र्यप्रियता वा बंडखोरी दडपून टाकू शकत नाही. कलावंत स्त्री आपली प्रतिभा दाबून टाकू शकत नाही. तिच्या बुद्धिमत्तेच्या प्रभेनं तिचं अवघं व्यक्तिमत्त्व उजळून निघतं. १

०विविध प्रकारचे साहित्य वाचताना किंवा अनुवाद करताना या

अशा स्त्रिया मला अनेक वेळा भेटल्या आहेत आणि त्यांच्या त्या अंगभूत तेजानं मी दिपून गेले आहे. अगदी असेच काहीसे नफीसा हाजी यांच्या ‘द रायटिंग ऑन माय फोरहेड’ या कादंबरीचा मराठी अनुवाद करताना झाले. आपल्या अनेक खंडांत आणि अनेक पिढ्यांमध्ये पसरलेल्या कुटुंबाचे वर्णन ही तरुण मुलगी करते आहे; परंतु या अनेक खंडांच्या आणि पिढ्यांच्या इतिहासाचा भार खांद्यावर असतानासुद्धा ही तरुणी - सायरा आपलं बंडखोर व्यक्तिमत्त्व दडपून टाकू शकत नाही - किंवा दडपू इच्छित नाही. एका पारंपरिक मुस्लीम कुटुंबात जन्माला येऊनसुद्धा ती त्या परंपरांविरुद्ध खंबीरपणे उभी राहते आणि आपल्या मनाने दिलेला कौल स्वीकारते. त्यासाठी ती मुस्लीम समाजाला अजिबात मान्य नसलेला पत्रकारितेचा व्यवसाय पत्करते आणि वेगवेगळ्या ‘स्टोरीज’ मिळवण्यासाठी जगभर प्रवास करीत राहते. वयाच्या अठरा- एकोणिसाव्या वर्षी लग्न करून पुढे संसार करत, मुलं वाढवत आणि एका पुरुषाच्या छायेत आपले सारे आयुष्य काढण्याची कल्पना ती साफ झुगारून देते. तिला शिक्षण घ्यायचं आहे, एक वेगळाच व्यवसाय करायचा आहे; परंतु अर्थातच, नियतीने मात्र तिच्यासाठी काही वेगळेच ताट वाढून ठेवले आहे.

सायराइतकीच आपल्या मनावर छाप पाडते ती तिच्या आजीची बहीण बडी नानी माँ. सुमार रूपामुळे लग्नाचे प्रस्ताव फारसे येतच नाहीत आणि ती नाईलाजाने शिकत राहते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर ती आपल्या कुटुंबाबरोबर पाकिस्तानात जाते. तिथं तिला इंग्लंडला जाऊन अधिक शिक्षण घेण्याची संधी मिळते. परत आल्यानंतर मुलींच्या कॉलेजमधली इंग्रजीच्या प्राध्यापिकेची नोकरी तिची वाटत पहात असते, त्याचबरोबर मिळणारे राहायचे क्वार्टरसुद्धा. ‘लग्न’ या विषयात तिची मते फारशी ठाम आणि आग्रही नसली तरी नाईलाजाने लादले गेलेले एकटेपण ती अगदी सहजपणे आणि आनंदाने स्वीकारते. तसे पाहिले तर स्वतःची हक्काची कमाई आणि राहती जागा यामुळं इतर विवाहित मुस्लीम स्त्रियांच्या तुलनेत तिचे

स्थान खूप मानाचे आणि स्थैर्याचे असते; पण आयुष्याच्या प्रवासात तिनंही काही ठाम मतं मिळवली आहेत. ती सायराला सांगते, ‘नवी मूल्यं स्वीकारताना जुनी फेकून द्यायची घाई करू नको. कारण आयुष्यात असे क्षण येतात की आयुष्य आपल्या हातात राहत नाही. जुनी संहिता टाकून देऊन परत नवीन निर्माण करायची म्हणजे परत चाकाचा शोध लावण्यासारखं आहे. त्या रूढिबद्ध संहितेचा लग्न हा फक्त एक भाग आहे. तेव्हा ती एक निरुपयोगी गोष्ट म्हणून फेकून देऊ नकोस.’ पारंपरिक रूढिबद्ध मुस्लीम समाजात लहानाचं मोठं होऊनसुद्धा आपलं स्वतःचं असं वेगळं व्यक्तिमत्त्व घडवणाऱ्या या दोन्ही स्त्रिया मला फार भावल्या. आणखी एक गोष्ट मला प्रकर्षानं जाणवली ती ही की धर्म वेगळा असला तरी भारतीय उपखंडात राहणाऱ्या आपणा सर्वांची जीवनमूल्यं खूप सारखी आहेत. इतकंच काय आपली राहणीही बरीचशी सारखी आहे. आपण आपल्या कुटुंबांशी, समाजाशी खूप बांधलेले असतो; परंतु हे बंध सैल करून घेऊन स्वतःचा वेगळा व्यवसाय आणि कुमारी मातेचं आयुष्य स्वीकारायची तयारी या दोन जगावेगळ्या गोष्टी करायची सायराची हिंमत आहे. दोन्ही गोष्टी करताना ती फक्त आपल्या अंतरीच्या आवाजाला प्रतिसाद देते.

आधुनिक समाजाचा ‘स्त्री’ हा एक अविभाज्य आणि सन्माननीय घटक आहे. शास्त्रज्ञांपासून सैनिकांपर्यंत आणि कलावंतांपासून अवकाशयात्री होण्यापर्यंत साऱ्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. साऱ्या संधी स्त्रियांना पूर्वीच्या तुलनेत कितीतरी सहजपणे उपलब्ध होत असल्या तरीही हे स्वतःला सिद्ध करणं सोपं काम नाही. मेहनत, कार्यकुशलता, चातुर्य या गोष्टी तर अनिवार्यच आहेत; परंतु त्याचबरोबर असावा लागतो तो अंतरात सतत प्रज्वलित राहणारा स्फुलिंग. मग तो एखाद्या साध्या गृहिणीच्या मनात असेल किंवा एखाद्या शास्त्रज्ञ स्त्रीच्या. ‘द रायटिंग ऑन माय फोरहेड’चा अनुवाद करताना मला सतत जाणवत होता तो सायराच्या मनातला

स्फुलिंग. अगदी लहानपणापासून ते कॉलेज शिक्षण पूर्ण करून पत्रकारितेचा व्यवसाय करेपर्यंत आपल्या अंतर्मनाने घातलेली साद ऐकून तिला प्रतिसाद देण्याची तिची धमक. अमेरिकेत वाढत असताना तिथलं आजूबाजूचं वातावरण आणि घरातले पारंपरिक संस्कार यांच्या दुहेरी कात्रीत सापडूनसुद्धा स्वतःचं मन ओळखण्याइतकी प्रगल्भता तिच्याकडे आहे. आपल्या आधीच्या तीन पिढ्यांना समजून घेत घेत स्वतःचं स्वतंत्र व्यक्तित्व ती जपत राहते.

भारत, पाकिस्तान, इंग्लंड आणि अमेरिका या चार देशांत फुलणाऱ्या या कादंबरीची नायिका-सायरा तिच्या मनस्वी, बंडखोर वृत्तीमुळे, तिच्या जगाबद्दलच्या अपार कुतूहलामुळे आणि तिच्या जिवट इच्छाशक्तामुळे आपल्या मनात कायमचं घर करून रहाते.

उलटपक्षी केवळ नशिबामुळेंच वाट्याला आलेले अविवाहित आयुष्य बडी नानी माँ मोठ्या सहजतेने स्वीकारते आणि अगदी ऐटीत आणि आनंदात व्यतीत करते. मुलींना इंग्रजी साहित्य शिकवण्याची आणि त्याची गोडी लावण्याचे कार्य ती अव्याहतपणे करते. आपले आयुष्य फुकट गेले असा विचारही तिच्या मनाला शिवत नाही. आपल्या नातेवाईकांच्या गोतावळ्यात तिचे आयुष्य मोठ्या सुखात जाते. आपले मन मोकळे करण्यासाठी आणि सल्ला घेण्यासाठी सायरा तिच्याकडे वारंवार वळते. ती बडी नानी माँ आपल्यालाही खूप आवडून जाते.

आज आजूबाजूला नजर टाकली तर अशा बऱ्याच सायरा आपल्याला दिसतात. समाजानं घालून दिलेल्या रूढिबद्ध मार्गानं आयुष्य व्यतीत करणं त्यांना पसंत नाही. आपल्याला आयुष्यात काय मिळवायचे आहे आणि कुठल्या गोष्टींना अग्रक्रम द्यायचा आहे याच्या स्पष्ट आणि स्वच्छ कल्पना त्यांच्या मनात आहेत. या निश्चित केलेल्या गोष्टी मिळवताना त्यासाठी जी किंमत मोजावी लागेल ती मोजण्याचीही त्यांची तयारी आहे. गेल्या सत्तर-ऐंशी वर्षांत बदलून गेलेले हे स्त्रीचे स्वरूप नक्कीच सुखावह आणि आशादायक आहे.

अपार कष्ट घेण्याची तयारी, तीव्र इच्छाशक्ती, होणाऱ्या बदलांशी चटकन जुळवून घेण्याची मानसिकता, सहनशीलता, सहृदयता ही सारी स्त्रियांची बलस्थाने आहेत. ती पूर्वीही होती. आजही आहेत. पूर्वी, ही बलस्थाने त्यांनी पुरुषी वर्चस्व झुगारून देण्यासाठी, शिक्षण घेण्यासाठी, नोकरी करून स्वयंपूर्ण होण्यासाठी वापरली. आजही ही बलस्थाने त्यांच्यासाठी तितकीच महत्त्वाची आहेत. आज त्या ती आपलं करिअर घडविण्यासाठी, नवी नवी क्षितिजं धुंडाळण्यासाठी, आपले स्वत्व जपण्यासाठी, आपली ओळख जगाला पटवून देण्यासाठी आणि समोर येणाऱ्या संकटांचा सामना करण्यासाठी वापरतात. पुरुषांनी निर्माण केलेल्या या स्पर्धेच्या जगात 'तू श्रेष्ठ की मी श्रेष्ठ' या वादात न पडता त्या मोठ्या आत्मविश्वासानं आणि डौलानं आयुष्य जगताना दिसतात. भविष्यकाळात येणारा प्रत्येक दिवस हा स्त्रीचाच असेल. तिच्यावर लादल्या जाणाऱ्या अन्यायाचा आणि हिंसाचाराचा यशस्वी सामना करीत, त्या कर्तृत्वाची विविध क्षेत्रे काबीज करीत आपल्या अस्तित्वाचा ठसा जगावर उमटवतील याची मला खात्री आहे.

❖

शब्द म्हणजे असतात केवळ बेटे
पाण्याने वेढलेली, एकमेकांपासून तुटलेली
सांभाळीत उरावर निबिड अरण्ये, हिंस्त्र श्वापदे
दूरचे क्षितिज न्याहाळीत आपल्यातच मिटलेली.

शब्द म्हणजे केवळ तारा, निर्जन वीजवाहिन्या–
क्षणकाळ पेटणाऱ्या, एरवी विझलेल्या,
पेटतेपणाची आतुर प्रतीक्षा करीत
मनातल्या धुळीमध्ये घनघोर निजलेल्या.

शब्दांनीच परस्परांना भिडू बघतो आपण
लढू बघतो आपण,
शब्दांना शब्द भेटतीलच असे नाही
शब्दांना शब्द भेटतीलच असे नाही

शान्ता शेळके

अजूनही

अजूनही असते तिच्यापाशी
नखभर काजळ
माझ्या जळजळत्या डोळ्यांसाठी,
आणि चिमूटभर अंगारा
माझी असलीनसली इडापिडा टाळण्यासाठी.

मऊसूत गोधडीची हवीहवीशी ऊब
मला वेढून असते तिच्या आसपास,
आणि बाळजीभ जागी करतो
तिच्या हातचा एखादा घास.

तिच्यापाशी जाताना
एकेक वर्ष सालीसारखे गळत जाते अंगावरून,
कोवळे आनंदवय
हसत हसत सामोरे येते दुरून.

माझे तान्हेपण सुखरूप
तिच्या संरक्षक ओटीत,
प्रत्येक नव्या भेटीत, मनाच्या मिठीत.

– शान्ता शेळके
('अनोळख' मधून)

❖

बंदिनी : एका मनस्विनीचं जीवननाट्य

– अंजली धर्माधिकारी

स्वातंत्र्यपूर्व काळातील ही कथा. स्त्रीच्या उपेक्षेचा, तिला दुय्यम लेखण्याचा, तिच्या अस्तित्वाला किंमत न देण्याचा, तिला अनेक जाचक बंधनांमध्ये जखडण्याचा तो काळ होता (आजही त्यात फार फरक झालेला नाही); परंतु जरासंध यांनी कल्याणीचा बंडखोरपणा, तिची स्वतंत्रता, तिची निर्भयता, तिचा मनस्वीपणा, तिची सकारात्मकता अधोरेखित करून काळाच्या पुढे पाऊल टाकलं आहे, असं म्हणायला हरकत नाही.

हिंदी चित्रपटसृष्टीत स्त्रीप्रधान चित्रपटांची संख्या किती आहे, या प्रश्नाचं वस्तुनिष्ठ उत्तर देणं सोपं नाही; पण जेव्हा स्त्रीप्रधान चित्रपटांचा विचार आपण करायला लागतो, तेव्हा गुरुदत्त यांचा 'साहब, बिबी और गुलाम', अमेय चक्रवर्तींचा 'सीमा', मेहबूब खान यांचा 'मदर इंडिया', बासू भट्टाचार्यांचा 'तीसरी कसम', महेश भट यांचा 'अर्थ' ही नावं पटकन डोळ्यासमोर येतात. याच मालिकेत आणखी एक नाव अपरिहार्यतेने जोडावंसं वाटतं, ते म्हणजे बिमल रॉय यांचा 'बंदिनी.'

'बंदिनी'च्या कथेला लाभली आहे १९३० सालची अर्थात स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी. ही कथा उतरली आहे जरासंध (चारुचंद्र चक्रवर्ती) यांच्या सिद्धहस्त लेखणीतून. उत्तर बंगालमध्ये तुरुंग अधीक्षक म्हणून त्यांनी काम केलं होतं. त्यामुळे तुरुंगाशी संबंधित

अनेक अनुभव त्यांच्या लेखणीतून साकारले. 'बंदिनी' हा त्यातीलच एक अनुभव. एक तुरुंग अधीक्षक एका बंदी स्त्रीच्या मनाचा इतक्या संवेद्यतेने विचार करू शकतो, ही बाब फार कौतुकास्पद वाटते.

या कथेची नायिका कल्याणी (नूतन) जेलमध्ये बंदी आहे. जेलमध्ये स्त्री कैद्यांवर उपचार करण्यासाठी डॉ. देवेंद्र (धर्मेन्द्र) येत असतो. तो कल्याणीकडे आकृष्ट होतो. तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त करतो; पण कल्याणी नकार देते. दरम्यान, कल्याणी तिची पूर्वकहाणी डायरीमध्ये लिहिते आणि जेलरला ती डायरी वाचायला देते. त्यातून कल्याणीचा भूतकाळ उलगडतो.

ती बंगालच्या एका खेड्यातलील पोस्टमास्तरची (राजा परांजपे) मुलगी असते. स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय असलेल्या देशभक्त बिकासशी (अशोक कुमार) तिचा परिचय होतो. परिचयाचं रूपांतर प्रेमात होतं; पण तिचा आणि बिकासचा विवाह होण्याआधीच पोलीस त्याला अटक करतात. कल्याणी त्याची वाट पाहत राहते; पण तो येत नाही आणि एक दिवस त्याने लग्न केल्याची बातमी कल्याणीच्या कानावर येते. त्यातच समाजाकडून कल्याणीचा आणि तिच्या वडिलांचा छळ सुरू होतो. तो असह्य होऊन कल्याणी गुपचूप घर सोडते. शहरात येते. तिथे एका हॉस्पिटलमध्ये तिला सेविकेची (Caretaker) नोकरी मिळते. तिथे तिला एका मानसिक संतुलन हरवलेल्या स्त्रीची सेवा करावी लागते. ती स्त्री कल्याणीला अपमानास्पद वागणूक देत असते. एके दिवशी कल्याणीला शहरात तिच्या शोधात आलेले तिचे वडील अपघातात गेल्याची बातमी समजते आणि त्यातच ती मनोरुग्ण स्त्री बिकासची बायको आहे हे कळल्यावर कल्याणी विष देऊन तिचा खून करते व जेलमध्ये जाते.

जेलमधून सुटका झाल्यावर जेलरच्या सल्ल्यावरून कल्याणी डॉ. देवेंद्रकडे जायला निघते. तिच्याबरोबर जेलमधील एक मेट्रन असते. देवेंद्रकडे जात असताना एका बंदरावर आजाराने जर्जर झालेल्या बिकासशी तिची भेट होते. त्याच्या सहकाऱ्याकडून ऐकलेल्या हकिगतीवरून बिकासने तिच्याशी प्रतारणा केली नाही, हे तिला

समजतं आणि ती परत बिकासच्या प्रेमात 'बंदिनी' होते.

या कथेतील कल्याणीची व्यक्तिरेखा मुळातच व्यामिश्र आहे आणि पडद्यावरही ती तितक्याच व्यामिश्रतेने साकारली आहे. बिकासच्या प्रेमात पडलेली कल्याणी ते जीवनातील अनेक कटू अनुभव सकारात्मकतेने पचवून परत बिकासच्या प्रेमात स्वत:ला झोकून देणारी कल्याणी, असा कल्याणीचा जीवनाकडून जीवनाकडे जाणारा प्रवास आहे. या कथेला तीन उत्कर्ष बिंदू (क्लायमॅक्स) आहेत. पहिला- बिकासने लग्न केल्याची बातमी कल्याणीच्या कानावर पडते. दुसरा - ती बिकासच्या बायकोचा खून करते. तिसरा - ती डॉ. देवेंद्राकडे जायचा विचार सोडून बिकासच्या प्रेमात बद्ध राहणं पसंत करते. या तीनही क्लायमॅक्सपाशी तिच्या मनाची जी घालमेल होते, ती घालमेल नूतनजींच्या नैसर्गिक अभिनयातून फार प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. मुळातच व्यामिश्र असलेल्या या व्यक्तिरेखेला नूतनजींनी अधिक उंचीवर नेऊन ठेवलं आहे. बिकासच्या भूमिकेत असलेल्या दादामुनी अर्थात अशोककुमार यांचा अभिनयही तितकाच सहज आहे.

शेवटच्या दृश्यामध्ये बंदरावर एका खोलीत बसलेले बिकास आणि कल्याणी. मध्ये फक्त एक भिंत. त्याचवेळी कानावर पडणारं 'मेरे साजन है उस पार.....' हे गीत. हे गीत म्हणजे कल्याणीच्या बिकासबद्दलच्या भावनांचा संयत आविष्कार आहे आणि या उत्कट आविष्काराचं श्रेय द्याव लागतं ते गीतकार शैलेंद्रजींना. खरं तर कल्याणीच्या जीवनातील नाट्यमय प्रसंगांवर गीत रचून तिच्या भूतकाळावर भाष्य करणारं गीत शैलेंद्रजींना रचता आल असतं आणि ते प्रसंग तिच्या नजरेसमोर तरळत आहेत, असं चित्रित करणं बिमलदांना सोपं गेलं असतं; परंतु बिमलदा असोत, शैलेंद्रजी असोत, की ते गीत संगीतबद्ध करणारे एस.डी.बर्मन असोत, पडद्यावर प्रसंग साकारणारे नूतन, अशोककुमार असोत, लेखकाने साकारलेली व्यक्तिरेखा त्यांच्या केवळ हृदयालाच भिडलेली नसायची, तर ती त्यांच्या रोमारोमांत भिनलेली असायची. त्यामुळेच या प्रसंगात कल्याणीच्या मनात उठलेले भावतरंग शैलेंद्रजी संवेद्यतेने टिपतात

आणि पडद्यावरही ती संवेद्यता तितक्याच परिणमाकारकेतेने साकार होते अशोककुमार आणि नूतन यांच्या देहबोलीतून, मुद्राभिनयातून.

१९३० सालची पार्श्वभूमी या कथेला लाभली आहे. स्त्रीच्या उपेक्षेचा, तिला दुय्यम लेखण्याचा, तिच्या अस्तित्वाला किंमत न देण्याचा, तिला अनेक जाचक बंधनांमध्ये जखडण्याचा तो काळ होता (आजही त्यात फार फरक झालेला नाही); परंतु जरासंध यांनी कल्याणीचा बंडखोरपणा, तिची स्वतंत्रता, तिची निर्भयता, तिचा मनस्वीपणा, तिची सकारात्मकता अधोरेखित करून काळाच्या पुढे पाऊल टाकलं आहे, असं म्हणायला हरकत नाही. त्यामुळे कल्याणीचा सेवाभाव, प्रेमातील निष्ठा, उदात्तता, सलज्जता हे स्त्रीसुलभ गुणही उजळून निघतात आणि या व्यक्तिरेखेचा हा मनोप्रवास पडद्यावर पुन:पुन्हा अनुभवावासा वाटतो.

जरासंधांच्या लेखणीतून साकारलेल्या या कल्याणीला बिमल रॉय यांनी तेवढ्याच बहुआयामित्वाने पडद्यावर सादर केलं आहे आणि नूतनजींच्या अभिनयातून त्या व्यक्तिरेखेची प्रत्येक छटा जिवंत झाली आहे. म्हणूनच या चित्रपटासाठी नूतजींना फिल्मफेअरच्या सर्वोकृष्ट अभिनेत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. वास्तविक, नूतनजी या चित्रपटानंतर चित्रपटसृष्टीतून संन्यास घेण्याचा विचार करत होत्या; पण ‘बंदिनी’ला लाभलेल्या अपूर्व अशा यशामुळे त्यांनी तो निर्णय बदलला आणि त्यानंतर अनेक उत्तमोत्तम भूमिका करून त्यांनी प्रेक्षकांना अपूर्व आनंद दिला.

❖

दोन हात

दोन हात
चुडा ल्यालेले, हळद माखलेले,
दाही नखांवर मेंदी चढवलेले;
बघता बघता हळद उतरते,
मेंदीचा रंग विटतो, चुडा फिकटतो,
हात राबू लागतात.
कधी शेणामातीत माखून घराच्या भिंती सारवतात,
कधी भांड्यांची चवड घासून घासून लख्ख करतात,
कधी चुलीच्या लवलवत्या उजेडात
भाकरीसंगे गोल फिरतात,
कधी तान्ह्या बाळडोळ्यांत अलगद काजळ भरतात;
हात पाण्याच्या हंड्याला आधार देणारे,
थकल्या माथ्याखाली उशी होणारे,
फाटके शिवणारे, ठिगळ लावणारे,
तुळशीपुढे दिवा होऊन तेवणारे,
इथे, तिथे सर्वत्र दिसणारे,
काळोखात हळूच डोळे पुसणारे;
हात असतील सासुरवाशी, माहेरवाशी,
हातांमागे उभी असेल माझीच आई, आजी,
मामी, मावशी,
परंपरेने सजीव होऊन आलेली माती;

— शान्ता शेळके
('अनोळख'मधून)

❖

३ री आवृत्ती

ॲज आय सी...

नेतृत्व आणि प्रशासन...

मूळ लेखिका
डॉ. किरण बेदी

अनुवाद
माधुरी शानभाग

किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

आपल्या स्पष्ट आणि निडर स्वभावाला अनुसरून डॉ. किरण बेदी अनुभवाला आलेल्या अनेक आक्षेपार्ह बाबींवर, भावलेल्या विषयांवर कळकळीने लिहीत असतात.
साध्या अनलंकृत शैलीतील हे लेखन सामाजिक अन् नैतिक विषयावरील त्यांची मते मांडत असते. या विषयांवर जनतेने जागृत होऊन विचार करावा, सजग व्हावे आणि एकत्र होऊन कृतिशील व्हावे हा हेतू मनात धरून त्या लिहीत असतात. देशातील सर्वसामान्यांना माहीत असलेल्या, नसलेल्या समस्यांवर लिहिलेले वाचताना, वाचकांना डॉ. किरण बेदींची एक संवेदनशील अधिकारी म्हणून ओळख होते. त्यांचे लिखाण वाचकांना सरकार, प्रशासन याबद्दल विचारप्रवृत्त करते.

उर्मिला

बेल वाजली. मनीषाने दार उघडलं. दारात एक विलक्षण देखणी स्त्री. पस्तिशीच्या घरातली. राजघराण्यातल्या किंवा एखाद्या संस्थानिकांच्या सिंहासनावरून अथवा अंतगृहातून बाहेर पडावी इतकी देखणी. गोरीपान. नितळ मखमली, छे, सॅटिनसारखी कांती. इतक्या मोहक लावण्यावर सेल्सगर्लची नोकरी करण्याची पाळी विधात्याने का आणली असावी? रणरणत्या उन्हात नक्की कोणता तरी साबण किंवा बायकांना लागणाऱ्या काही तशाच वस्तू घेऊन आली असणार. कालच सगळं आणलंय, असं सांगावं का?

तसंही करवेना.

तेवढ्यात नमस्कार करीत तिने विचारलं,

''आपण मनीषा देऊस्कर का?''

''हो.''

''मी उर्मिला सौमित्र. आपल्याला साठ्यांनी माझ्या संदर्भात फोन केला होता का? त्यांनी मला तसं कळवलं म्हणून...''

म्हणजे सेल्सगर्ल नाही तर—

''या ना, आत तर या.''

ती आत आली. सोफ्यावर बसली. मनीषाने पंखा लावला.

''पाणी आणू?''

''चालेल. फार शीतल नको.''

तिच्या 'शीतल' शब्दावर स्वत:शीच हसत, मनीषाने पाणी आणलं.

''आता बोला.''

''साठेसाहेबांचा फोन आला नाही, त्यामुळे आता मी काय बोलू?''

''त्यांना आपण आत्ता फोन करू. साठे म्हणजे...?''

''साठेकाकांना फोन लावायचाय? घरचा फोन देऊ?''

''मला माहीत आहे.'' असं म्हणत मनीषाने फोन नंबर फिरवला. पंधरा-

वीस वेळा बेल वाजली, फोन कुणी उचलला नाही.
उर्मिलाकडे बघत मनीषा म्हणाली, ''घरात कुणी नसेल. तुम्ही मला कामाचं स्वरूप तर सांगा.''
उर्मिला सांगू लागली, ''मी बिकानेरला राहते. मुंबईत पहिल्यांदाच येतेय. हे अवाढव्य नगर पाहून माझी छातीच दडपून गेली. ह्या मुंबईसारखी 'नवी मुंबई' असं काही नगर आहे का?''
मनीषाने विचारलं, ''म्हणजे वाशी का?''
''हां, तेच. मला तिथं जायचंय. साठेकाका म्हणाले, त्यांच्या घरापासून जायचं म्हणजे मला पत्ताच लागणार नाही. चेंबूरहून सोपं आहे. त्यांनी तुमचा पत्ता दिला. बाबू स्टेशनवर आला होता. त्याने इथपर्यंत सोडलं. मी त्याला म्हणाले, 'असाच वाशीपर्यंत चल.' त्याला वेळ नव्हता. आणि काकासाहेबांनी आपलं नाव...''
''इतकंच ना? काही बिघडलं नाही. आपण दोघी चहा घेऊ. मग सगळी सोय करते. चालेल ना? तोपर्यंत जरा ऊनही कमी होईल. मला संध्याकाळी एके ठिकाणी जायचं आहे. नाही तर मीही वाशीला आले असते.''
उर्मिला आणि मनिषा ह्यांचा चहा संपेसंपेतो मुलं शाळेतून परतली. अंजू मजेत होती. अजय काहीसा खट्टू होता. मनीषाने चौकशी करायच्या आत तो म्हणाला, ''आई, संस्कृतचा पेपर अवघड होता.''
उर्मिलेने उत्स्फूर्तपणे विचारलं, ''मला पेपर दाखवतोस?''
प्रश्नांकित चेहऱ्याने अजयने पेपर दिला. नजर फिरवीत उर्मिला म्हणाली, ''एकदम सोपा आहे.''
आणि नंतर ती संस्कृतमध्येच सगळी उत्तरं देऊ लागली. मुलं आणि मनीषा ह्यांचे चेहरे पाहून ती म्हणाली, ''मला संस्कृत लहानपणापासून येतं.''
अजयने कुणीही न सांगता विचारलं, ''मावशी, मला तुझ्यासारखं बोलायला शिकवशील?''
''मुंबईत आहे तोपर्यंत तुला नक्की तयार करीन.''
मनीषा म्हणाली, ''चला, हातपाय धुऊन घ्या. खायला देते. मला बाहेर जायचं आहे. घर नीट सांभाळा. भांडू नका आणि दाराला साखळी लावा. अनोळखी माणसाला दार उघडू नका.''

“मावशी आमच्या सोबतीला आहे.”
“त्यांनाही कामाला जायचं आहे. तुम्हाला खायला दिलं की मी सुटले.”
“खायला काय आहे?”
“सकाळचंच.”
दोन्ही मुलांनी तोंडं वाकडी केली.
“रोज रोज तुमच्यासमोर नवं काय ठेवणार?”
उर्मिलाने पटकन विचारलं, “तुमची तयारी होईपर्यंत मी तुम्हा तिघांसाठी काहीतरी बनवते.”
मुलांनी टाळ्या वाजवल्या. तिलाही भूक लागली असेल ह्याची जाणीव होऊन आणि स्वयंपाकघरापासून तेवढीच एक वेळ सुटका, ह्या विचाराने मनीषाने मूक संमती दिली. त्या तिघांनी एकमेकांचा आणि स्वयंपाकघराचा ताबा घेतला. नव्या कोऱ्या सहवासासाठी आपल्याप्रमाणेच मुलंही किती हपापलेली होती ह्याची मनीषाला गंमत वाटली.
तोंडावर पाणी मारता मारता मनीषा स्वत: विचारात पडली....
‘अनोळखी माणसाला दार उघडू नका’ असं मी मुलांना बजावलं आणि स्वत: साखळी न लावता दार उघडलं. इतकंच काय, दुपारचं खायला करायचं काम एक दिवस तर टळलं, इतक्या छोट्या स्वार्थासाठी ह्या अनोळखी उर्मिलेला मी थेट स्वयंपाकघरापर्यंतचा व्हिसा दिला. इतर घरांतल्या चोऱ्या-मारामाऱ्यांच्या, फसवणुकीच्या कहाण्या आपण ऐकतो तेव्हा त्यांना आपण मूर्खात जमा करतो. आपण इतक्या सहजी हिला सगळा ताबा कसा दिला?—जाऊ का पुढे?—तिला बाहेर काढू का?—साठेकाका नंतर रागवले तर?— साठेकाकांची आणि हिची खरंच ओळख आहे का?— नसली तर प्रथम साठेकाकाच म्हणतील,‘कुणीही माझं नाव सांगतो आणि तुम्ही विश्वास ठेवता?’ छे! काय करावं?
तेवढ्यात उर्मिला समोर येऊन म्हणाली, “तुम्ही म्हणत असाल, कोण ही बिकानेरची उर्मिला! आली आणि स्वयंपाकघरापर्यंत घुसली.”
“छे, छे! मला वाटलं तुम्ही म्हणाल की ‘आली भेटीला आणि धरली वेठीला’...”
“मी असं मुळीच म्हणणार नाही. मी एरवीही घरातच रमणारी आहे.”

मुलांचं खाणं-पिणं आटोपल्यावर उर्मिला-मनीषा दोघी बाहेर पडल्या. मनीषाने उर्मिलेला बसस्टॉपर्यंत सोडलं. 'मी जाईन व्यवस्थित' असं उर्मिलेने सांगितल्यावर मनीषा आपल्या कामाला गेली. एकदा मनीषाला वाटलं, आपण उर्मिलेला वाशीपर्यंत सोबत करावी. ती ज्या कामासाठी बाहेर पडली होती ते काम आजच्या आज करण्याची मुळीच आवश्यकता नव्हती. पण वाशीला आपला वेळ किती मोडेल, हेही सांगता येण्यासारखं नव्हतं. असा सगळा उलटसुलट विचार करून मनीषाने उर्मिलेचा विषय डोक्यातून काढून टाकला.

रात्री नऊ वाजता बेल वाजली तेव्हा मनीषाने काहीशा कुतूहलानेच दार उघडलं. पाहते तो दारात उर्मिला.

''झालं काम?''

''नाही हो! काका भेटले नाहीत. गावाला गेलेत. उद्या येतील.''

उर्मिलेचा आवाज ओळखून मुलं धावली. त्यांनी उर्मिलेचा हात धरून तिला खोलीत ओढून सोफासेटवर बसायला भाग पाडलं.

''तुमचा आता काय विचार आहे?''

उर्मिला म्हणाली, ''जवळपास एखादं हॉटेल असेल तर सांगा. मी तिथं रात्र काढीन. सकाळी पुन्हा वाशीला जाईन.''

''मावशी, हॉटेल कशाला? इथं राहा ना एक रात्र. तुम्हाला आमचं घर आवडलं नाही का?'' अजयने गळ घातली.

अंजू म्हणाली, ''मावशीला आपण दोघं आवडलो नसलो तर?''

उर्मिलेनं दोघांना जवळ घेत म्हटलं, ''तुम्ही दोघं कुणालाही आवडाल.''

''कुणालाही म्हणजे तुला नाही?''

''अजय, मोठ्या माणसांना 'ए-जा' करायचं नाही. इतकं कळत नाही?'' मनीषाने दटावल्यावर अजय आईला म्हणाला, ''मावशीला कुणी 'अहो' म्हणतं का?''

''बरोबर आहे!'' उर्मिलेनं पसंती दर्शवली.

''मग राहा. उद्या आमचा शेवटचा पेपर मराठीचा. आमचा अभ्यास घे.''

उर्मिलेचा हा उपयोग करून घेता येईल हे ध्यानी येताच मनीषा म्हणाली, ''मुलं म्हणताहेत तर राहा. एकट्या कुठे राहता हॉटेलमध्ये? त्यात तुम्हाला मुंबईची फारशी माहिती नाही. लांबून झकपक दिसणाऱ्या हॉटेलमध्ये काय काय चालत असेल, हे कधी कळायचं पण नाही.''

आईची संमती पाहून दोन्ही मुलांनी उर्मिलेची छोटी बॅग सरळ आत नेऊन ठेवली.
उर्मिलाने दोन्ही मुलांचा पटापट अभ्यास घेतला. मुलं जेवून झोपली.
"चला, आपणही जेवून घेऊ." मनीषा म्हणाली.
"तुमचे यजमान...? म्हणजे त्यांच्या अगोदरच जेवायचं?"
"त्यांची वाट पाहायची नाही."
"आपण अगदी पहिला घास घ्यायला आणि ते यायला..."
"तसं कधीकधी घडतं, ते मनावर घ्यायचं नाही."
उर्मिला म्हणाली तसंच झालं. घास संपायच्या आतच उमेश आला. त्याने येताक्षणी मनीषाकडे पाह्यलंही नाही. तो फोनकडे धावला.
"हॅलो, मी उमेश, एवढ्यात येतोय...ते राहू दे...तू बोल...कल्याणी स्टील दीडशे आहे...ओह, इटस् स्टुपिड...गॅमन इंडिया...नको...बरोज वेलकम...कीप इट पेंडिंग...टाटा स्टील...नंतर सांगतो...किर्लोस्कर कमिन्स...वर्थ थिंकिंग...तू असं कर ना त्यापेक्षा, सेन्टॉरवर ये...आत्ताच ये...अरे बाबा, मीसुद्धा थकलोय. सेन्टॉर म्हणजे ऑल द वे फ्रॉम चेंबूर...ओ.के. प्रीतम चालेल. सगळ्यांना आत्ताच्या आत्ता कळवायची जबाबदारी तुझी. ओ.के.!"
फोन संपवून उमेश आत आला. बूट न काढता स्वयंपाकघराच्या दारात उभं राहून तो म्हणाला, "मी जरा जाऊन येतो."
"ह्यांची ओळख करून देते. ह्या उर्मिला..."
"नमस्कार! उद्या बोलू. आत्ता जरा गडबडीत आहे."
दोघींच्या प्रतिक्रियेची वाट न बघता उमेश घरातून बाहेर पडलाही.
"त्यांना बेदम काम असतं का?"
उर्मिलाच्या ह्या प्रश्नावर मनीषा गप्प राहिली.
लगेच सावरून घेत उर्मिला म्हणाली, "क्षमा असावी. मला हे असं विचारणं शोभा देत नाही."
पुन्हा तिच्या वाक्यरचनेची गंमत वाटून मनीषा ओठातल्या ओठात हसली. उमेश नेहमीप्रमाणे आजही गेला ह्याची बोच काही प्रमाणात कमी झाली. तेवढ्यात अंजू आत येत म्हणाली, "आई, बाबा आले आणि पुन्हा गेले?"
"त्यांना जरा तातडीचं काम होतं."

''फुस्! माझा पेपर कसा गेला हे पण त्यांनी विचारलं नाही.''
''उद्या सांग सकाळी.'' मनीषा शांतपणे म्हणाली, पण तिचा चेहरा बदलला होता.
''तुम्ही चिंताग्रस्त दिसता. हरकत नसेल तर मजपाशी दु:खभार हलका करावा. उमेशना खूप कामं करावी लागतात, त्याचं वाईट वाटतं का?''
मग गप्प राहणं मनीषाला अशक्य झालं.
ती पटकन् म्हणाली, ''ही सगळी अनावश्यक कामं आहेत.''
''असं का म्हणता?''
''वाजवीपेक्षा जास्त प्राप्ती असताना, शेअर्स-डिबेंचर्स आणि त्याच प्रकारच्या उचापतीत किती आयुष्य घालवायचं? इतर कोणतेही आनंद नसतात?''
''त्यात त्यांना काही ना काही, आव्हान वाटत असेल. ईर्षा असेल.''
''आले किती– गेले किती, हे वर्षो न् वर्षं? संसार, बायको—ठीक आहे, नसेल रस. मुलं आहेत ना?''
''नुसती आहेत असं नाही, लाघवी आहेत.''
उर्मिलाचं वाक्य संपता संपता अंजू पुन्हा आली. उर्मिलेच्या पाठीवर डोकं घासत आणि मग खांद्यावर टेकवीत ती म्हणाली, ''मावशी, मला झोप येत नाही.''
''तुम्ही दोघं मगाशी छान झोपला होतात ना?'' मनीषाने विचारलं.
''मी नुसती पडले होते. बाबांची वाट बघत होते. मला पेपर चांगला गेला, हे त्यांना सांगायचं होतं. आमची परीक्षा असते, तेव्हाही बाबा भेटत नाहीत.''
''तुझी तक्रार मी नक्की त्यांना उद्या सांगेन. तू आता झोप. मला जरा मावशीबरोबर बोलू दे ना.''
मनीषाने जाणीवेने विनवणीच्या स्वरात सांगितलं. अंजू समजुतीने झोपायला गेली. आता सारवासारवी करायला, सुखी संसाराचं चित्र रंगवायला सवडच नव्हती. अंजू जाताक्षणी मनीषा सांगू लागली,
''सुरुवातीला आमचे खूप संघर्ष झाले. मुलं झाल्यानंतर ते बदलतील असं वाटलं होतं. तो अंदाजच ठरला. स्वभावात बदल होणार नाही, त्यांचे आनंद वेगळे आहेत, हे ध्यानात आल्यापासून मी गप्प बसायला लागले. पण त्यांनीच जन्म दिलेल्या छोट्या जिवांना काय सांगायचं? ह्या

वयातली मुलं त्यांना नंतरच्या आयुष्यात पुन्हा पाहायला मिळणार आहेत का?''

बाहेरच्या जिन्यासमोरच्या दारातून वारं चांगलं येतं म्हणून नीलम दार उघडं ठेवून कोणतं तरी साप्ताहिक वाचत होती. सिलिंग फॅनचा हवा कापल्याचा जो आवाज येतो, त्यानंही शिणवटा येतो. कामात व्यग्र असताना ते जाणवत नाही. मन उदास असलं म्हणजे सुखद सोयीतल्या उणिवाच बोचायला लागतात.

फ्रीज असला की तो डी-फ्रॉस्ट करावा लागतो. पाटा-वरवंटा गेला पण मिक्सरचा आवाज सहन होत नाही. टीव्हीवरच्या मिक्सरच्या जाहिरातीत, चमचमीत खाद्यपदार्थांनी भरलेलं रंगीबेरंगी डायनिंग टेबल, तोंडाला पाणी सुटलेला परिवार आणि 'दोन मिनिटांत सगळं तयार' असं म्हणत हात पसरून नाचणारी, गार्डन सिल्कमधील छबकडी दाखवली की व्यापाऱ्यांचं काम होतं आणि सरकारी तिजोरी चाळीस चाळीस सेकंदांनी फुगत जाते.

त्या सटवीला मिक्सरची भांडी स्वच्छ करताना दाखवा आणि हिंमत असेल तर वॉशर बसवूनही, मिक्सरमधून ओघळणाऱ्या धारा दाखवा. एकाही कंपनीचा मिक्सर विकला जाणार नाही. तसंच, स्वयंपाक करताना गार्डन सिल्क वापरणाऱ्या त्या सटवीला ती साडी स्वत:च्या पैशांनी विकत घ्यायला लावा, मग ती बया नाचते की ती साडी सांभाळते ते बघू.

फटकन् येणाऱ्या गॅसच्या शेगड्या आल्या तर गॅस लायटर टिकत नाही. 'क्रिस्टल' असं निव्वळ नाव देऊन त्याचा स्फटिक होत नाही. स्फटिकासारखं निर्मळ मन लागतं. मग कोणतीही वस्तू मार्केटमध्ये विका. ती मग जाहिरातीशिवाय खपेल.

'माझ्याच चांदण्यात फिरा, ते मन प्रसन्न करणारं आहे.' हे चंद्राला सांगावं लागत नाही. आपणच मन प्रसन्न होताक्षणी हात जोडतो. आपला देश असाच! आणि जोपर्यंत विषाच्या बाटलीवर अमृताच्या चिठ्ठ्या चिकटवून व्यापारी जनतेच्या जिवाशी खेळत आहेत आणि राज्यकर्त्यांचा पान-पराग रंगतोय तोपर्यंत असंच चालणार. शम्मी कपूरनं वाट्टेल ते करावं, त्याला स्टेटस आहेच कुठे? — पण अशोककुमार—दादामुनीसुद्धा विकले जावेत...?

७ वी आवृत्ती

स्त्री मनोगुणांचा शोध घेणाऱ्या कथा

चिकन सूप फॉर द वुमन्स सोल



लेखन व संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
जेनिफर रीड हॉथॉर्न । मार्सी शिमॉफ

अनुवाद
श्यामला घारपुरे

किंमत : २४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

स्त्रीची व्याख्या अनेक प्रकारांनी करता येईल. विद्यार्थिनी, कन्या, मैत्रीण, पत्नी, आई, गृहिणी, व्यावसायी! प्रत्येक रूप हे खास व अलौकिक असे असते. तरी त्यांतही एक असा सामान्य धागा असतो. तो प्रत्येकीच्या स्वभावात असतो. प्रेमाचे बंध हळुवारपणे जपणारी, आजीवन मैत्री किंवा नाते निभावणारी, निवडलेल्या क्षेत्रांशी बांधिलकी घट्ट करणारी ही स्त्री! कौटुंबिक जीवनात फुलोरा फुलवणारी, त्याचबरोबर सामाजिक जीवनही सुसह्य करणारी! 'New York Times'च्या 'Chicken Soup for the Soul' ह्या मालिकेत वेगवेगळ्या शीर्षकांखाली भावभावनांचे खास मिश्रण आहे! या पुस्तकामध्ये स्त्रीशी निगडित असलेल्या साऱ्या गुणवैशिष्ट्यांचे मार्मिक चित्रण आढळते. स्त्रीच्या आत्म्याची मंगलता व सौंदर्य इथे प्रगट होते! व्यावसायिक असो की गृहिणी, बालिकेपासून वृद्ध स्त्रीपर्यंत सगळ्यांना हे अनुभव भावतील. ह्यातून त्यांना स्फूर्ती, आनंद मिळेल. इतकेच नव्हे;

— नीलमचं मन आज भरकटलं होतं. हातात साप्ताहिक होतं पण मजकूर कळत नव्हता. ती पानं उलटीत होती. पुन्हा कोणत्या तरी कुकिंग रेंजची जाहिरात आली आणि नीलमला अकारण आजीची आठवण झाली.

आजीने कधी गॅस वापरला नाही. तिचा स्टोव्हवर विश्वास. पण तिची वेगळी व्यथा. रॉकेलमध्ये पाणी मिसळतात हे तिचं गाऱ्हाणं. मग ती सांगायची, 'माझ्या आईनं कध्धी स्टो वापरला नाही. चुलीवर जास्त भरवसा.

पणजी तरी सुखी होती का? नाही लाकडंही ओली मिळायची.

संसार सुखासाठी करावा तर तो दुःखाने व्यापलेला. मॉडर्न सोयी कराव्यात तर पोटात गैरसोयी. सोयींची किंमत जाहिरातींच्या खर्चासकट भरूनही वर मनस्तापाचं चक्रवाढव्याज भरायचं.

कुणी?— फक्त बायकांनी. का? तर संसार सुरक्षितता देतो आणि नवरा म्हणे प्रेम देतो?

नीलमचं लक्ष दारात उभ्या राहिलेल्या एका स्त्रीकडे गेलं. ह्याला निसर्गदत्त सौंदर्य म्हणतात. साधी वेणी. लिपस्टिक नाही की कोरलेल्या भुवया नाहीत. साडी साधी पण नीटनेटकी. पौर्णिमेचा चंद्र दारात उभा आहे, असं नीलमला वाटलं...ही बया काय विकायला आली? ती जे नाव घेईल ती वस्तू कालच घेतली म्हणून सांगायचं.

''आपण नीलम कुंटे का?''

''हो!''

''मी उर्मिला सौमित्र. आपल्याला कारखानीसांचा फोन आला होता का?''

''नाही बाई!''

उर्मिलेचा चेहरा चिंताग्रस्त झाला.

''आत तर या. सविस्तर काय ते सांगा. कारखानीस कोण?''

''आर्किटेक्ट. तुमच्या सदनाची रचना त्यांनीच केली, असं कानी आलं.''

नीलमला गंमत वाटली. ती हसून म्हणाली, ''बरोबर! कारखानीसांनी तुमच्याही घराचं डिझाईन केलंय का?''

''नाही. त्यांचा आणि माझ्या वडिलांचा जुना स्नेह. मी भडोचला असते.

मुंबईत प्रथमच आले आणि ठाण्याची तर मला काहीच माहिती नाही. कळवा कुठे आहे?''

''इथून रिक्षानं जाता येतं.''

''मला कारखानिसांनी तेच सांगितलं. तेवढ्यासाठी तुम्हाला ते फोन करणार होते.''

''अहो, आमचे ठाण्याचे फोन! काही विचारू नका. आमचा हा फोन तर विकतचं श्राद्ध आहे. गेला महिनाभर ह्याची बेल एखादं टिंब द्यावं तशी वाजते. आपण फोनजवळ असलो तरच समजतं. तेही घारीसारखी झडप घातली तर. परवा माझ्या मैत्रिणीने ठाण्यातल्या ठाण्यात पोस्टकार्ड पाठवून मला कळवलं, 'मी तुला फोन करणार आहे, फोनजवळ थांब.' ''

उर्मिलाला गंमत वाटून तिने टाळी वाजवली आणि 'मग?' अशा अर्थाने पाह्यलं.

''मी गळ टाकून फोनजवळ उभी. तिच्या फोनचा पत्ता नाही. पुन्हा पत्र वाचलं. तर पत्रच मला तारखेनंतर तेरा दिवसांनी मिळालं होतं. टेलिफोन निगम आणि पोस्टखातं, दोन्हींचं 'तेरावं' केलं आणि गप्प बसले.''

उर्मिला पटकन् म्हणाली, ''सुवासिनींनी स्वगृही असं अमंगलसूचक बोलू नये.''

''जाऊ दे. मी तुमच्यासाठी काय करू?''

''कारखानीसांनी मला इथपर्यंत सोडलं आणि ते मुलुंडला मीटिंगला गेले. मीटिंगनंतर पार्टी आहे. 'काक, काक' असं कायसं म्हणत होते.''

''कॉकटेल!''

''हां, तेच. देवीजींना हे नाव कसं माहीत?''

नीलम काही बोलली नाही.

''कारखानीस पार्टी संपल्यावर न्यायला येतो म्हणाले. पण आता फोन...''

''तो तसाच आहे. कारखानीसांनी केलाही असेल. त्यांचा ऑफिसचा ऑपरेटर वैतागला असावा. एम.टी.एन.एल.—म्हणजे 'माझा टेलिफोन नाही लागत!' ''

उर्मिला मनापासून हसली. तिच्या प्रतिसादाने नीलमचं मळभ दूर झालं. ती पुढे म्हणाली, ''टेलिफोन निगमची 'यलो पेजेस'ची टिमकी ऐकत

राहायची. अर्धा अर्धा पान जाहिराती पाहून चेहरा पांढरा पडतो. म्हणे ‘यलो पेजेस!’ त्या जाहिरातीचे पैसे आम्ही ऑनरेबल कस्टमर्स भरतो. तेव्हा फोनचं राहू दे. आपण चहा घेऊ.’’

‘‘मी कळव्याचं काम करून येते अगोदर. मला जरा तेवढी माहिती द्या.’’

नीलम उर्मिलाबरोबर बाहेर पडली. तिने एक रिक्षा थांबवली आणि उर्मिलेला एका बाजूला घेऊन तिने सांगितलं,

‘‘आपण जरी नवख्या असलो तरीही चेहऱ्यावर तसं दाखवायचं नाही. कळव्यात पोहोचलात की तुम्हाला जिथं जायचं आहे...’’

‘‘माझ्या आत्याकडे. तिने नवं घर घेतलंय. पत्ता दिलाय.’’

‘‘त्यातून घर नाही सापडलं तर ही रिक्षा सोडू नका. तशाच परत या. म्हणजे माझं घर पटकन मिळेल. मला तुम्ही आवडलात. मी बरोबर यायला हवं. पण...’’

‘‘नाही, नाही. तशी आवश्यकता नाही. मी जाईन एकटी. आत्यानं सोडलं नाही तर उद्या कारखानीसांची गाडी मागवीन.’’

साडेनऊच्या सुमाराला उर्मिला जेव्हा परत आली तेव्हा अभिजीतचा तिसरा पेग चालला होता. नीलमने ओळख करून दिली.

‘‘नमस्कार! मी अभिजीत. कंपनी देणार का?’’

‘‘मी घेत नाही.’’

‘‘तुम्ही नीलमच्या जातीतल्या म्हणजे. एकदा घेऊन बघा. सगळी दु:खं विसराल.’’

उर्मिला हसत म्हणाली, ‘‘सकाळ होईपर्यंत ना?’’

अभिजीत म्हणाला, ‘‘आयुष्यातल्या सगळ्याच गोष्टी तात्पुरत्या असतात म्हणून तर रोज प्यावं लागतं.’’

‘‘जेवायला कधी येताय?’’ मध्येच नीलमनं विचारलं.

‘‘आज तुला कंपनी आहे, तुम्ही जेवून घ्या. माझं झाकून ठेव. जेवण झाल्यावर गप्पा माराव्याशा वाटल्या तर वेलकम. निंदागेम खेळायचा असेल तर नो प्रॉब्लेम!’’

‘‘निंदागेम?’’ उर्मिलाने आश्चर्याने विचारलं.

‘‘इसका मतलब, नवऱ्याबद्दल सुखसंवाद करणं.’’

‘‘तुम्ही त्यांचं ऐकू नका. आपण आत जाऊ.’’

''हे पिणं कधीपासून?'' जेवताना उर्मिलाने विचारलं.
''आठ वर्षं झाली.''
''काही तसंच कारण?''
''मूल होत नाही म्हणून.''
''हेच कारण असेल तर तुम्हीही घ्यायला हवी.''
''करतात आग्रह. मी ऐकत नाही.''
''ह्यापेक्षा एखादा छंद...''
''त्यात कष्ट आहेत.''
''आनंद नाही का?''
''मग लोकांची सहानुभूती मिळणार नाही. आता कसं, 'पुरुष असून धक्का पेलत नाही, पण नीलमला काही आहे का बघा' असं कानावर आलं म्हणजे ते श्रेष्ठ ठरतात ना?''
''त्याऐवजी तुम्हाला घेऊन नातेवाईक, मित्र ह्यांच्याकडे जावं, सहल काढावी. एरवी तुम्ही घरी एकट्या असता, मग कामावरून आल्यावर तरी...''
''मी कायम एकटी असते. आज तुम्ही आलात, मला आवडलात, बंद आहे म्हणून टेलिफोनचे आभार मानले पाह्यजेत.''
''नको. तसं करू नका. फोन बंद पडल्याचा आनंद झाला तर त्याचंही बिल पाठवतील.''

उर्मिला आली आणि गेली हे मनीषा कधीच विसरली. मुलं क्वचित मावशीची आठवण काढीत, पण तेवढ्यापुरतीच.
उर्मिलेचं अचानक पत्र आलं. तिने मनीषाचे आभार मानले होते. तिचं वाशीचं काम झालं ते मनीषाच्या सहकार्यामुळे. तिने सेन्टॉरमध्ये डिनर ठेवलं होतं. मनीषाने यायलाच हवं असा तिचा हट्ट होता.
'उभ्या आयुष्यात पुन्हा भेट होईल की नाही सांगता येत नाही. तेव्हा यायलाच हवं'— ह्या वाक्याने पत्राचा शेवट होता.
सेन्टॉरमध्ये कोणत्या हॉलमध्ये जायचं हा मनीषाला प्रश्न पडलाच नाही. 'उर्मिला सौमित्रांच्या अतिथी' आणि त्याच्यासमोर दालनाचं नाव असा फलक तळमजल्यावर काऊन्टरपाशीच झळकत होता. आपल्या एकटीसाठी उर्मिलेने इतकं का करावं?—असा विचार करीत मनीषा

लिफ्टकडे वळली.

तिने हॉलमध्ये प्रवेश केला. आठ-दहाजणींसाठी टेबल सजवून सज्ज होतं. प्रत्येकीचं नाव त्या खुर्चीसमोर झळकत होतं. ग्लासात पांढरेशुभ्र नॅपकिन्स मोरपिसासारखे खोचले होते. फ्लॉवर ॲरेंजमेंट तर नजर फिरवणारी होती. वसंतराव देशपांड्यांचं 'बगळ्यांची माळ' जीव कासावीस करीत होतं. ह्याच गाण्यासाठी वसंतरावांचा जन्म झाला होता असं मनीषाला नेहमी वाटायचं. एखाद्याच गायकाचा आर्त, उत्कट, जखमी सूर ती माळ किती उंच नेऊ शकते, ते फक्त ह्या गाण्यात कळतं. कवी अनिल आणि वसंतराव, दोघांनाही चरणस्पर्श करायचं राहून गेलं.

उर्मिलेनं स्वागत केलं.

"बसा! सगळ्या जमल्या की परिचय करून देईनच. पण ह्याचा अर्थ तोपर्यंत एकमेकींत बोलायचं नाही, असं नाही."

आपली खुर्ची ओढून घेत मनीषा शेजारच्या बाईला म्हणाली, "मी मनीषा देऊस्कर."

"मी विभावरी रानडे."

"कुठे राहता?"

"चिंचवडला."

"चिंचवडहून खास पार्टीसाठी आलात?"

"माझं माहेर मुंबईचंच. मी माहेरी पळण्यासाठी निमित्त शोधत असते. पण ह्या वेळेला उर्मिलेनं भुरळ घातली."

"ती वेगळीच वाटते, इतकं नक्की."

तिसऱ्या बाईने न राहवून मध्येच बोलायला सुरुवात केली.

"सौंदर्य अनेकजणींपाशी असतं. उर्मिलेपाशी एक तेजस्वीपणा आहे."

"अगदी मनातलं बोललात. तुम्ही मुंबईतल्याच ना?"

"मी नाशिकरोडला राहते. उर्मिला चंद्रपूरहून आली..."

"चंद्रपूर? अय्या, मला सांगितलं भडोच..."

"मला म्हणाली बिकानेर."

"मला अमरावती..." आणखी एकजण म्हणाली.

तोपर्यंत इतर खुर्च्या भरल्या होत्या. उर्मिला वेटर्सशी बोलण्यात दंग होती. तेवढ्यात हॉटेलच्या स्टुअर्डने तिला बाहेर बोलावलं. सगळ्याजणी

मग एकत्र जमल्या. कुणीतरी म्हणालं, ''ती आता इथं नाही तोपर्यंत पोलिसला फोन करू या का?''
''तिने तुमच्या-आमच्यापैकी कुणाला फसवलं का?''
''गावाची नावं वेगवेगळी सांगितली ना?''
''त्यानं आपलं काही नुकसान तर झालं नाही? तिने काही चोरलं नाही, लुबाडलं नाही, शिवाय आज एवढी जंगी पार्टी देते आहे. तिच्यावर कोणता आरोप ठेवायचा?''
त्या कुणा बाईचं बोलणं संपेसंपेतो आत येत उर्मिला म्हणाली,
''तुमच्या सगळ्यांच्या घरी एकेक रात्र राहून, तुमच्या संसारातल्या व्यथा ऐकल्या हा गुन्हा असेल तर तो मी जरूर केला आहे. तुम्ही पोलिसांना जरूर फोन करा पण त्यापूर्वी हा मेजवानीचा कार्यक्रम हसतखेळत होऊ द्या. आपली खरोखरच पुन्हा भेट होणार नाही. तेव्हा...''
''उर्मिला, तू जे आम्ही बोललो ते विसर. तू आणि मी एक रात्र ज्या जिव्हाळ्याने बोललो ती रात्र मी कधी विसरणार नाही. माझ्या माहेरच्या माणसांपासून मी माझी संसारगाथा लपवली होती. आतल्या आत मी कुढत होते. सारखी आजारी पडत होते. पण त्या रात्रीनंतर माझी अमृतांजनाची बाटली सुटली.''
जिने पोलिसांचा प्रस्ताव मांडला होता ती पटकन म्हणाली, ''आय प्लीड गिल्टी.'' सगळ्यांना बसायची विनंती करून उर्मिला म्हणाली,
''तुमच्यापैकी कुणाचंही काहीच चुकलं नाही. मी जर माझ्या सौंदर्याच्या जोरावर...क्षमा असावी, मी माझी स्तुती करते,''
एकीला न राहवून ती म्हणाली, ''तू मला हिप्नोटाईझ केलंस.''
उर्मिला गोंधळली.
नीलमने खुलासा केला, ''म्हणजे मोहिनी घातलीस. संमोहित म्हणतात तसं. माझं तेच झालं.''
उर्मिलाने प्रारंभ केला, ''माझ्या सौंदर्याच्या आणि मार्दवतेच्या आधारानं तुम्हाला जिंकल्यानंतर, मी काही धन उसनं मागितलं असतं, चोरलं असतं तर तुम्ही गप्प बसला असतात. शेजारणीजवळ चर्चा केली असतीत. क्वचित नवऱ्याला सांगितलं असतंत. आपण अजागळासारख्या फसलो कशा, असं म्हणत तुम्ही माझ्या बाबतीत मौन बाळगलं असतंत. कदाचित 'वाचकांच्या पत्रव्यवहारातून' इतरांना सावध...''

‘‘नाही ग उर्मिला...’’
‘‘हे सगळं स्वाभाविक आहे. सध्याच्या ह्या परिस्थितीत, बनवाबनवीच्या राजवटीत, एक बाई संबंध नसताना चांगली वागते, ह्यावर विश्वास बसणं अशक्य आहे. आम्हाला हल्ली चांगुलपणामागेही योग्य कारण हवं असतं. इतका आमचा त्याच्यावरचा स्वातंत्र्य मिळाल्यापासून विश्वास उडाला आहे. तुमचं काहीही चुकलं नाही.’’
‘‘उर्मिला...’’ ‘‘मी सगळं सांगणार आहे. सविस्तर बोलणार आहे. तुमच्या घरांतून मी एकेक रात्र मुक्काम केला. तुम्हा सगळ्यांचा एकमेकींशी परिचय नाही, हे मला माहीत आहे. म्हणूनच मी कुणाच्या संसारात काय पाह्यलं, त्यांची नावं सांगणार नाही. व्यक्तीपेक्षा वृत्ती महत्त्वाची. मी तुमचे संसार पाह्यले आणि व्यथित झाले. कुणाच्या वाटेला सोमरसाचं यथेच्छ सेवन करणारा पती, कुणी शेअर्सच्या मागे, काहींना फक्त युनियनचं वेड. फोनवर वीस-वीस मिनिटं चर्चा, ऑफिसातून घरी पोहोचेपर्यंत, तासाभरात असं काय घडतं की पुन्हा त्याच विषयावर फोनवर बोलावं, मला कळलं नाही. जीवनावश्यक गरजा भागल्या, भरपूर पैसा आहे, तिथं शांती असावी. मला तर सुबत्ता आणि स्थैर्य ह्याच व्याधी वाटायला लागल्या. फक्त एकाच घरी मी पाह्यलं की त्या नवऱ्याला दांडगा उत्साह आहे, कधी एकदा सगळं बायकोला सांगता येईल ह्याबद्दल कासाविशी आहे, तर तिथं त्या बाईलाच नवऱ्यात रस नाही. नवरा बोलायला आतूर तर तिला झोपायची घाई. मग तो पहाटे तीनपर्यंत मलाच सगळं सांगत राह्यला.’’
चित्राने शुष्क स्वरात सांगितलं,
‘‘लग्नाच्या पहिल्या रात्रीसुद्धा आमचे साहेब रात्री एक वाजता आले. सगळ्या आयुष्याची इतिकर्तव्यता सोशल वर्कमध्ये. त्यात बाधा येऊ नये म्हणून चिरंजिवांची रवानगी पाचगणीच्या शाळेत. ज्यांच्यासाठी जीव टाकला ती माणसं जेव्हा उलटली तेव्हा ते सावध झाले. पण तोपर्यंत मध्ये अकरा वर्षं गेली. मी प्रतीक्षा करून संपूर्ण कोरडी झाले तेव्हा त्यांना वाटलं, बायकोवर अन्याय झाला. आता मलाच रस राह्यला नाही. उर्मिला, तुला आमची सगळ्यांची ओळख व्यथेसकट झाली. तुझी आम्हाला काहीच माहिती नाही. आमच्यापैकी प्रत्येकीला तू वेगवेगळ्या गावांची नावं सांगितलीस. आता सगळ्यांना काय जे आहे ते सांगायला हवंस तू.’’

''हां, सांगाच. उर्मिला सौमित्र म्हणजे नक्की तुम्ही कोण?''
''मी खरोखरीची उर्मिला. कौसल्या, कैकयी, सुमित्रा ह्या तीन सास्वांची सून. पतिदेव लक्ष्मण ह्यांची पत्नी.''
सगळ्या अवाक् झाल्या.
''मी एक उपेक्षित स्त्री. रामायणकारांनी गृहीत धरलेली एक व्यक्ती. लक्ष्मणाचा उर्मिलेशी विवाह झाला ह्या एका विधानापलीकडे उर्मिलेला अस्तित्व नाही. लक्ष्मणाच्या मागे चौदा वर्षं उर्मिलेनं कशी काढली, ह्याचा पुसट उल्लेख नाही.''
''अगदी खरं! ती बिचारी एकटी, त्यात भर म्हणजे एक नव्हे, दोन नव्हे तर तीन सास्वा! आम्हाला एकीला तोंड देताना नाकात दम येतोय. त्या तिघींनी तुला सळो का पळो केलं असेल.''
''तसं नाही झालं.''
''नवल आहे!''
''नवल नाही. ते स्वाभाविक आहे. दुसऱ्याचा छळ करण्यासाठी स्वत:चं आसन स्थिर लागतं. निरुद्योगी आणि स्वास्थ्य लाभलेली व्यक्तीच उपद्रवी बनते. मामंजींच्या निधनामुळे माझ्या तिन्ही सास्वा दु:खी होत्या. मग माझा छळ त्या कधी करणार? वाल्मिकींनी मला अस्तित्वच ठेवलं नाही. उर्मिला कधी मेली, ह्याचासुद्धा निर्देश नाही. आज मला, तुमच्याकडे पाह्यल्यावर, सगळ्यांच्या संसारात राह्यल्यावर समजतंय, उर्मिला अमर आहे. आपण सगळ्या लक्ष्मणाच्या बायका. आमचा लक्ष्मण रामाच्या मागोमाग गेला. तुमच्या सगळ्यांचे लक्ष्मण त्यांना ज्याच्यात 'राम' वाटतोय, त्यांच्यामागे ते धावताहेत. चित्रा, तुझं काहीच चुकलेलं नाही. चौदा वर्षांनी लक्ष्मण जेव्हा वनवासातून परत आले, तेव्हा प्रतीक्षा करून करून, मीही तुझ्यासारखीच आटून गेले होते. स्त्रियांचं असंच होतं. त्या आटून जातात, विटून जात नाहीत म्हणून लौकिक अर्थानं संसार चालू राहतो. वाल्मिकींना दोष देण्यात अर्थ नाही. ते खरे द्रष्टे आहेत. उर्मिला फक्त जन्माला येते आणि तिचा विवाह होतो. संसार होईलच ह्याची शाश्वती नाही. राम आणि लक्ष्मण ह्यांना काही ना काही जीवितकार्य-विहितकार्य होतं. ते कार्य सफल झालं. दोघांच्या जीवनाची अखेर कशी झाली त्याचा निर्देश आहे. ज्यांना आयुष्यात जगण्यापलीकडे प्रयोजनच ठेवलेलं नसतं अशा माणसांची 'जयंती' आणि 'पुण्यतिथी' कोण लक्षात ठेवतो?''

''तरीसुद्धा लक्ष्मणानं तुमचा विचारही करू नये?''
''सत्कार्य आणि संसार ह्यात सत्कार्य श्रेष्ठ. राजवैभव सोडून रानोमाळ हिंडणं, तारुण्यात स्त्री-सुख डावलणं, हे सगळं सोपं नव्हतं. तुम्हा सगळ्याजणींचे लक्ष्मण केवळ स्वत:चा जीव रमवताहेत. म्हणूनच वाटतं उर्मिलेला मरण नाही.''
''हे असले सगळे पुरुष मग लग्न तरी का करतात?''
''त्याला पर्याय नाही म्हणून. आपण सांकेतिक पद्धतीवरच जगतो आणि आत्ताचे दिवस आणि प्रत्येकाचं आयुष्य, आनंद आणि शांती ह्यांचा बळी देऊनच सगळे घालवताहेत. मूल तीन वर्षांचं झालं रे झालं की त्याला शाळेत अडकवायचं. शाळेच्या बससाठी दोन वेळा सोसायटीच्या फाटकात 'टाटा, बिर्ला' केलं की आया 'फेमिना' वाचायला मोकळ्या! का?—त्या लेकरांच्या पाठीवर त्यांच्याच वजनाची दप्तरं का द्यायची?— त्यांना मनसोक्त खेळू दे, बागडू दे. राज्यकर्त्यांना नाही अक्कल! पण पालकांनी ह्या रेसमध्ये भाग का घ्यायचा? मूल पाच वर्षांचं होईपर्यंत घरातल्या घरात त्याला काहीही शिकवण्यासारखं नसतं का? सगळ्यांना घाई झाली आहे. त्याच न्यायानं लग्नाचं वय झालं की लग्न लावायचं. साधं बी. कॉम. व्हायचं ठरवलं तर आयुष्याची वीस-बावीस वर्षं शिक्षणात जातात. संसारात आदर्श पती आणि पिता होण्याचं शिक्षण कधी कुठे मिळेल का?''
सगळ्या गप्प होत्या. वातावरण गंभीर होणं अपरिहार्य होतं.
''ह्याच्यावर कधीच उत्तर सापडणार नाही का?''
उर्मिला म्हणाली,''पुरुष वाईटच असतात असं नाही. स्त्री आणि पुरुष ह्यांच्यातला हा निसर्गदत्त गुणधर्म आहे. पुरुष संकल्प करू शकतो आणि स्त्री समर्पण!''
''स्त्रियांना संकल्प करता येत नाही म्हणून कुणी सांगितलं?''
''ती जितकी संकल्पाकडे वळते तितकी समर्पणापासून दूर जाते. समर्पणाची शक्ती असेल आणि वृत्ती पण त्याला साथ देणारी असेल, तर उर्मिलेचं आयुष्य जगावं लागतं. आपण सगळ्या उर्मिलाच. लक्ष्मणाच्या बायका. उर्मिलेला मरण नाही.''

– व. पु. काळे
('सखी'मधून)

❖

२ री आवृत्ती

माय फॅमिली इज ऑल आय हॅव

हेलन-ॲलीस डिअर

अनुवाद
चित्रा वाळिंबे

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

ही सत्यकथा आहे एका ब्रिटिश स्त्रीची! ती पूर्व युरोपात तब्बल पन्नास वर्षं अडकून पडली. पहिल्यांदा नाझींच्या दृष्टचक्रात आणि मग साम्यवादाच्या विळख्यात! पण तिनं स्वत:च्या घरी परत जाण्याचं स्वप्न उराशी घट्ट कवटाळून ठेवलं. १९३७ मध्ये कौटुंबिक सहल म्हणून लंडनहून बल्गेरियाला निघालेली हेलन फक्त पंधरा वर्षांची होती. तिथे पोहोचली आणि काळाचं चक्र निराळ्याच गतीनं फिरू लागलं. परिस्थिती गंभीर बनली. बल्गेरियातून बाहेर पडणं मुश्किल झालं. रोजचं जगणंही कठीण बनलं होतं. तिला बल्गेरिअन माणसाशी लग्न करणं भाग पडलं. त्याच्यापासून हेलनला चार मुलं झाली. भुकेल्या, थंडीनं गठाळलेल्या मुलांबरोबर सतत आसरा शोधत फिरणं नशिबी आलं. समोर कष्टांचा डोंगरच होता. हेलननं मात्र धीर सोडला नाही. परिस्थितीच्या तडाख्यांना तोंड देत तिनं मुलांना वाढवलं. १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली. स्वगृही जाण्याचं हेलनचं स्वप्न पुरं होण्याची वेळ जवळ आली होती. तिनं लिहिलेल्या आठवणी हृदयद्रावक आहेत... पण ही गोष्ट आहे तिच्या धीराची, आशावादाची आणि पराभव अमान्य करणाऱ्या तिच्या कणखर मनाची!

बहिणाबाईंची जीवनाभिमुख कविता

– अंजली पटवर्धन

मराठी काव्याच्या समृद्ध दालनात अहिराणी बोलीचं सौंदर्य घेऊन बहिणाबाई चौधरींची कविता अवतीर्ण झाली. अक्षर ओळखही नसलेल्या बहिणाबाईच्या कवितांनी काव्यरसिकांना तर भुरळ घातलीच; पण समीक्षक, अभ्यासक यांनाही त्यांच्या कवितेचं सामर्थ्य मान्य करावं लागलं. बहिणाबाईंच्या कवितेतून त्यांची जीवनाभिमुखता जाणवत राहते. त्यांच्यातील तत्त्वज्ञाचं दर्शन होत राहतं.

बहिणाबाईंना ऐन तारुण्यात वैधव्य आलं, पण ते दुःख त्यांच्या कवितेमध्ये क्वचितच डोकावताना दिसतं. जीवनाकडे बघण्याची त्यांची दृष्टी प्रगल्भ होती. त्यामुळे एकूणच माणसाविषयी (त्याच्या प्रवृत्तीविषयी) आणि जीवनाविषयी त्या चिंतन करताना दिसतात. पतीच्या निधनानंतरही त्या दैवाधीन होत नाहीत. त्यांचा हात पाहू इच्छिणाऱ्या ज्योतिषाला त्या सांगतात :

राहो दोन लाल सुखी
हेच देवाले मांगनं
त्यात आलं रे नशीब
सत्य सांगे पंचागन!

भावनाविवश होऊन रडत बसण्यापेक्षा आपल्या दोन मुलांमध्ये आपलं भविष्य त्या बघतात. त्यांचा नशिबापेक्षा कर्तृत्वावर विश्वास दिसतो आणि देवाघरी गेलेल्या पतीविषयी निष्ठाही दिसते. त्या म्हणतात -

जरी फुटल्या बांगड्या,
मनगटी करतूत,
तुटे मंगयसूतर,

उरे गयाची शपत

बहिणाबाईंमध्ये येवढी सोशिकता, धैर्य कशामुळे होतं? तर त्यांची सर्जनशीलता, परमेश्वराची भक्ती आणि काळ्या मातीशी असलेलं त्यांचं अतूट नातं. त्या म्हणतात –

माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता भागवत
पावसात समावतं, माटीमधी उगवतं!

त्यांचं हे ईश्वराशी, मातीशी, निसर्गाशी असलेलं नातं त्यांच्या कवितेतून तादात्म्याने प्रकट होताना दिसतं. शेतात डोलणाऱ्या पिकाकडे पाहून त्या म्हणतात–

कसे वाऱ्यानं डोलती,
दाने आले गाडी गाडी,
दैव गेलं रे उघडी,
दैव अजब गारोडी

शेतातील पेरणी, कापणी आणि रगडणी (मळणी) याबद्दल त्यांनी स्वतंत्र कविता रचल्या आहेत आणि या कवितांतूनही हे नातं असोशीने जाणवत राहातं :

पेरनी पेरनी
देवा, तुझी रे करनी
दैवाची हेरनी
माझ्या जीवाची झुरनी

या ओळींमधून जगनियंत्याचं ऋण तर त्या मान्य करतातच; परंतु पेरणी करताना पाऊस कधी येईल? वेळेत येईल की नाही, हा प्रश्न शेतकऱ्याच्या मनात असतो. त्यामुळे त्या बाबतीत तरी तो दैवाधीन असतो. ही दैवाधीनता बहिणाबाईंच्या मनाला साशंक करते; पण ही साशंकता रगडणी (मळणी)च्या वेळी दूर झालेली दिसते.

रगडनी रगडनी, देवा, तुझी रे घडनी
दैवा तुझी झगडनी, माझी डोये उघडनी

शेतातील प्रत्येक कामात त्या परमेश्वराला पाहतात आणि शेती करताना आलेल्या अनेक अडचणींतून मिळालेलं डोळसपणही त्या

अधोरेखित करतात.

तर बहिणाबाईंचं जीवन असं मातीशी, तिच्या सृजनाशी, परमेश्वराशी जोडलं होतं. त्यामुळे त्यांच्या जीवनाला एक रसरशीतपणा आला होता. जीवनाकडे, माणसाकडे बघण्याची त्यांची दृष्टी अगदी सहज होती. त्यामुळे त्यांच्या कवितेत भावना असतात, पण भावकल्लोळ नसतो. तत्त्वज्ञान असतं, पण तत्त्वज्ञाचा आव नसतो. त्यामुळे त्यांचं सांगणं सहजतेने मनाला जाऊन भिडतं. त्या अगदी सहजतेने सांगतात–

मन जह्यरी जह्यरी, त्याचं न्यारं रे तंतर
अरे इचू, साप बरा, त्याले उतारे मंतर

मानवी मनाचं हे दाहक वास्तव अधोरेखित करून त्या माणसाला परखड शब्दांत सांगतात-

मानसा मानसा, तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं, गोठ्यातलं जनावर

माणसाला नुसतं त्याच्या बाबतीतलं वास्तव सांगून त्या थांबत नाहीत, तर त्याला त्याच्या क्रियाशीलतेची जाणीव देतात. सुगरणीच्या खोपा विणण्याच्या कौशल्याचं त्यांना कौतुक वाटतं. तिचा दाखला माणसाला देताना त्या सांगतात –

तिची उलूशीच चोच, तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं, दोन हात दहा बोटं

तर माणसाविषयी, जीवनाविषयी त्यांचं चिंतन असं सदैव चालू असे. हाताने काम आणि मुखी हरिनाम अशा रीतीने सदैव कार्यरत राहणाऱ्या बहिणाबाई म्हणतात -

ये रे ये रे माझ्या जीवा, काम पडलं अमाप
काम करता करता, देख देवाजीचं रूप

बहिणाबाईंचं जीवन असं निसर्गमय, ईश्वरमय होतं. त्यांची दोन मुलं आणि माहेर हे दोन धागे त्यांना जीवनाशी घट्ट बांधून ठेवतातच; परंतु, सासरची माणसं, गावातील माणसं यांच्याशीही त्यांचं नातं जिव्हाळ्याचं आहे. गुढीपाडवा, अक्षयतृतीया, बैलपोळा या

सणांवरच्या कवितेतून, वारीवरच्या कवितेतून त्यांचा सांस्कृतिक बंधही स्पष्ट होतो. तर एकूणच सर्वांगाने त्या जीवनाला कवेत घेताना दिसतात. त्यांची कविता मनाला प्रसन्न, जीवनाभिमुख, अंतर्मुख करून जाते.

बा. भ. बोरकरांनी बहिणाबाईंच्या कवितेचं सार्थ वर्णन केलं आहे. ते लिहितात -

तुझ्या साध्या उत्तराने, योगी होतो निरुत्तर
नेणीवेतली जाणीव, अशी कशी लोकोत्तर

('अक्षरधारा' मासिकातून साभार)

❖



स्मरण

आरती प्रभू

अभिजात मराठी वाङ्मयात आपल्या नावाची स्वतंत्र सुवर्णमुद्रा उमटवणाऱ्या अत्यंत श्रेष्ठ अशा फार थोड्या लेखकांमध्ये चिं. त्र्यं. खानोलकर, म्हणजेच कविश्रेष्ठ आरती प्रभू हे नाव आवर्जून घेतले जाते. कथा, कादंबरी आणि कविता ह्या तिन्ही वाङ्मय प्रकारात सूर्यतेजाने चमकणारे चि. त्र्यं. खानोलकर ह्यांनी आपल्या कविता लेखनासाठी मात्र 'आरती प्रभू' हे नाव धारण केले होते. त्याची अनेक कारणे खानोलकर देत असत. विशेषत: घरगुती नाव जे 'रघुनाथ' होते, त्यावरून आर टी. ही नावातली जी आद्याक्षरे होती, ती घोकता घोकता 'आरती' निर्माण झाले. 'प्रभू' हे नवे आडनाव धारण करून त्यातून 'आरती प्रभू' नाव निर्माण झाले, असे खानोलकर खूप वेळेला गमतीने सांगत. टोपण नावाने कविता लिहिण्याची प्रथा केशवसुतांनी सुरू केली आणि 'बालकवी', 'गोविंदाग्रज', 'अनिल', 'कुसुमाग्रज', 'ग्रेस' ही परंपरा 'आरती प्रभूं' नी तितकीच उज्ज्वल केली. शालेय वयात त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली, तेव्हा खानोलकरांनी 'बालार्क' ह्या शालेय हस्तलिखितात 'पुष्पकुमार' ह्या नावाने काही कविता लिहिल्या होत्या; परंतु सत्यच सांगायचे झाले तर 'शून्य शृंगारते' ही 'सत्यकथेत' प्रसिद्ध झालेली त्यांची पहिलीच कविता 'आरती प्रभू' ह्या नावाने प्रसिद्ध झाली आणि ह्या टोपण नावाला जे वलय प्राप्त झाले, ते वलय आजही तितक्याच तेजाने चकाकते आहे.

ये रे घना, ये रे घना
न्हाऊ घाल माझ्या मना...

दक्षिण कोकणात कुडाळमध्ये वास्तव्य असताना, १९५४च्या दरम्यान, ह्या पहिल्या दोन ओळींचा पिंगा खानोलकरांच्या कविताभरल्या मनात सुरू झाला होता. कोकणातल्या घनदाट वेलींवर उमलून आलेल्या नानाविध फुलांच्या रंगसुगंधांच्या असंख्या छटांवर झुलत राहणाऱ्या मनावर कवितेच्या ओळींचा अव्यक्त सडा पडत होता; परंतु कविता पूर्ण होत नव्हती. पुढच्या ओळी खोनलकरांना सुचत नव्हत्या; परंतु खूप वर्षे उलटल्यावर, मुंबई मुक्कामी ही कविता पूर्ण झाली.

फुले माझे अळुमाळू, वारा बघे चुरगुळू
नको नको म्हणताना, गंध गेला रानावना...

अत्यंत तरल भावविश्वात बुडून गेलेल्या ह्या अप्रतिम कवितेला स्वत: हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीत दिलं आणि आशा भोसले यांनी आपल्या मधाळ आवाजात सादर करून आरती प्रभू यांच्या कवितेला अमरत्व प्राप्त करून दिलं. कुडाळमधल्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला कंटाळून मुंबईत नोकरी मिळेल ह्या आशेवर खानोलकरांनी आपले गाव सोडले होते. त्यांचे काही जिवाभावाचे मित्र मुंबईत होते. ‘सत्यकथे’चे संपादक प्रा. श्री. पु. भागवत, कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर, कथा- कांदबरीकार मधु मंगेश कर्णिक, वि.ज. बोरकर अशी आरती प्रभू ह्या कवीवर विलक्षण प्रेम करणारी माणसे होती. दारिद्र्याचे पांघरूण दूर व्हावे म्हणून खानोलकरांनी ह्या मित्रांच्या सहकार्याने मुंबईत बस्तान बसवण्यासाठी प्रयत्न सुरू केले होत; परंतु इतक्या श्रेष्ठ प्रतीच्या कवीला मुंबईत हरकाम्यासारखे राबावे लागले. फूलकोमलशा मनावर होणारे आघात खानोलकरांना सहन होत नव्हते. जगण्यासाठी खूप धडपड करूनही निराशाच पदरी पडत होती.

टाकुनिया घरदार, नाचणार नाचणार
नको नको म्हणताना, मनमोर भर राना...

मानसिक पातळीवर होणाऱ्या त्रासांना आरती प्रभूंनी ह्या अप्रतिम गीताच्या कडव्यांमधून अर्थभारली वाट काढून दिली. प्रतिभेच्या वाटा अतर्क्यच असतात.

नको नको किती म्हणू, वाजणार दूर वेणू
बोलावतो सोसाट्याचा, वारा मला रसपाना...

निरभ्र आकाश एका क्षणत पावसाळी मेघांनी गर्जना करीत उसळून यावे, तशा ह्या अप्रतिम गाण्यातल्या अक्षय ओळी आरती प्रभूंच्या मनात प्रथम उसळून आल्या आणि अगदी अचानकपणे कागदावर उतरल्या. १९५४ साली अपूर्णावस्थेत असलेली, कुडाळमध्ये त्यांना सुचत असलेली कविता नंतर कित्येक वर्षांनी परिस्थितीचे असह्य चटके सोसत असताना पूर्ण झाली. त्या गाण्याला अप्रतिम संगीताचे पंख लाभले आणि स्वर्गीय स्वरात ते गाणे अवकाशभर झाले.

खानोलकरांचा जन्म ८ मार्च १९३० रोजी दक्षिण रत्नागिरीतल्या कुडाळमध्ये झाला. जन्मापासून कुडाळ, बागलांची वाडी सारख्या निसर्गरम्य ठिकाणी वाढलेल्या खानोलकरांनी आपले जन्मदारिद्र्य संपवण्यासाठी ९ फेब्रुवारी १९५९ ह्या दिवशी म्हणजे वयाच्या २९व्या वर्षी आपला जन्मगाव सोडला आणि २६ एप्रिल १९७६ मध्ये त्यांचा वयाच्या ४६व्या वर्षी मृत्यू होईपर्यंत ते मुंबईतच राहात होते. अत्यंत तरल मनोवृत्तीतूनच खानोलकर ह्यांचे गूढरम्य आणि झपाटून टाकणारे लेखन झाले. कुठल्याही श्रेष्ठ असणाऱ्या साहित्यिकाच्या आयुष्यात कधीच डोकावले नसेल असे आयुष्य पचवत, दुःखाचे आणि तीव्र अपमानाचे असंख्य चटके सोसत आयुष्य जगणाऱ्या खानोलकरांची 'कोंडुरा' ही कादंबरी मराठी अभिजात साहित्यात मानाचे पान ठरली. 'कोंडुरा'तले गूढरम्य वातावरण आणि भाषाशैली तर अप्रतिमच होती. विशेषतः त्यातले काळोखे विवर हा खानोलकरांच्या अफाट प्रतिभेचा अपूर्व विलास होता. खानोलकरांची काव्यमय भाषा, कल्पनांचा एक विलक्षण असा चांदणखेळ तर त्यांच्या समग्र वाङ्मयातून प्रामुख्याने प्रगट होत होता. 'एक शून्य बाजीराव' ह्या रंगायन ह्या मातब्बर संस्थेने सादर केलेल्या नाटकाने तर प्रायोगिक नाटकांच्या मालिकेतले उच्चतम स्थान प्राप्त करून घेतले होते. 'सनई', 'राखे पाखरू' सारखे कथासंग्रह तर खानोलकर यांच्या नावामगे एक तेजभारले, गरागरा फिरणारे जणू चक्रच झाले होते. साहित्यामध्ये खानोलकरांचे नाव आता अत्यंत

आदराने घेतले जात होते. श्री. पु. भागवतांचे मौज प्रकाशन खानोलकारांच्या प्रतिभेमागे खंबीरपणे उभे होते. आरती प्रभू आपल्या ‘अनुप्रासलो मरणे’ ह्या कवितेच्या सुरुवातीला लिहितात की,

मी मातीचे ऋण फेडाया, देवाघरून आलो
नक्षत्रांचे क्षेत्र सोडुनी गर्भवासी मी झालो...

आणि ही खानोलकरांनी भूमिका सत्यच होती. आपल्या एकूणच जगलेल्या, तीव्र भावनांनी ओथंबलेला जमाखर्च ‘दु:ख ना आनंदही’ ह्या कवितेत मांडताना ते म्हणतात -

दु:ख ना आनंदही, अन् अंत ना आरंभही
नाव आहे चाललेली, कालही अन् आजही...

चिदानंदस्वामींवर विलक्षण श्रद्धा असणाऱ्या खानोलकरांनी, प्रारब्धानुसार प्राप्त झालेला आयुष्याचा पट जसा आहे तसाच श्रद्धेय अंत:करणाने स्वीकारलेला होता. आपले एकाकीपण जोजवताना आरती प्रभू म्हणतात -

जीवनाला ऐल नाही, पैल तैसा मध्य ना
याद नाही, साद नाही, ना सखी वा सोबती
नाद आहे या घड्याला, अन् घड्याच्या भोवती...

१९७८ साली आरती प्रभूंच्या ‘नक्षत्रांचे देणे’ ह्या काव्यसंग्रहाला अत्यंत प्रतिष्ठेचा म्हणून मान्यता पावलेला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला; परंतु हा अत्यंत मानाचा पुरस्कार सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्याचे भाग्य खानोलकरांना लाभले नाही; कारण २६ एप्रिल १९७६च्या मध्यरात्री खानोलकरांनी ह्या मर्त्य विश्वाचा निरोप घेतला होता. हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेताना, त्यांच्या मुखातून चार ओळी प्रगट झाल्या.

अखेरच्या वळणावर यावा, मंद सुगंधी असा फुलोरा
थकले पाऊल सहज उठावे, आणि सरावा प्रवास सारा...

खानोलकर यांची ‘चानी’ ही छोटेखानी कादंबरी म्हणजे कादंबरी वाङ्मयातला मैलाचा दगड होता. खानोलकरांचे भाग्य असे, की

त्याच्यावर व्ही. शांताराम यांनी चित्रपट काढला. ह्या काव्यात्मक गाभा असणाऱ्या 'चानी'मध्ये ज्या कविता आहेत, त्या अत्यंत तरल भाव व्यक्त करणाऱ्या आहेत. खानोलकरांनी जशा कथा आणि कविता लिहिल्या तशीच नाट्यक्षेत्रात त्यांनी आपल्या 'एक शून्य बाजीराव', 'कालाय तस्मै नम:' 'असाही एक अश्वत्थामा' सारखी नाटके लिहून स्वत:चे नाव एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले होते. 'महाराष्ट्र टाइम्स'मधून 'दीपमाळा' सारखे अप्रतिम सदर लिहिले. कवी हृदयाच्या खानोलकरांचे एकूणच व्यक्तिमत्त्व मात्र ज्याला इंग्रजीत 'Split Personality' म्हणजेच दुभंगलेले व्यक्तिमत्व असे होते. एक अत्यंत श्रेष्ठ साहित्यिक म्हणून त्यांना मानमान्यता जेवढी मिळायला हवी होती तेवढी मिळाली नाही. हा त्यांच्या प्राक्तनाचा भाग होता; परंतु कवी 'आरती प्रभू' मात्र विसाव्या शतकातला निश्चितच एक चमत्कार होता. कधी कधी माझ्या मनात त्यांच्याच ओळी सतत रुंजी घालतात-

गेले द्यायचे राहूनि तुझे नक्षत्रांचे देणे..

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान त्यांना लाभला नाही, ही खंत मला नेहमीच वाटते.

– वामन देशपांडे

अर्धवट प्रश्नांचे गुंते ठेवून संमेलनाची सांगता

मराठी सारस्वतांचा मेळा म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. शंभरीकडे वाटचाल करत असलेल्या या संमेलनाचं रुपडं दिवसेंदिवस बदलताना दिसू लागलं आहे. संमेलनाच्या आयोजकांनुसार त्याच्या धाटणीत फरक दिसू लागला आहे. यंदा ३ ते ५ फेब्रुवारी दरम्यान डोंबिवलीत पार पडलेलं ९०वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनही याला अपवाद नव्हतं. कोळी साज आणि थाटमाटानं डोळ्यांचं पारणं जरूर फेडलं; पण अभिव्यक्तीच्या या महामेळाव्यात उमद्या वैचारिक बैठकीच्या माणसांची वानवा जाणवलीच.

साहित्य संमेलनाचं व्यासपीठ म्हणजे सखोल विचारमंथनाची नव्वद वर्षांची परंपरा. समकालीन जगणं आणि सामाजिक प्रश्नांचं जणू प्रतिबिंब. संमेलनाच्या उद्‌घाटन सत्रात अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणातून या साहित्यभानाचं ओझरतं दर्शन घडलं. या उद्‌घाटन सत्रातील सर्वांत जमेची बाजू म्हणजे ज्येष्ठ हिंदी साहित्यिक विष्णू खरे यांचा सत्कार. विष्णूजींनी यावेळी बोलताना साहित्य क्षेत्रातील प्रादेशिक अनास्थाच उघड केली. जगभरचं अनुवादित साहित्य देशात दाखल होत असताना प्रादेशिक भाषांमधील संवाद आणि देवाण-घेवाण अजूनही वाढत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मराठी साहित्य क्षेत्रात दुर्लक्षिल्या जाणाऱ्या अनुवादाकडे त्या निमित्ताने लक्ष वेधलं गेलं.

साहित्य संमेलनात संपूर्ण महाराष्ट्राचं प्रतिबिंब उमटावं, ही प्रत्येक साहित्य रसिकाची अपेक्षा; पण या अपेक्षापूर्तीत यंदाचं संमेलन स्पशेल अपयशी ठरलं. समग्र वैचारिक संवादासाठी अपेक्षित विचारवंतांचा वावरच संमेलनात दिसला नाही. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, अच्युत गोडबोले अशी मोजकी नावे सोडल्यास संमेलनात वेळ काढून ऐकावं, असा एकही उपक्रम नसल्याची खंत अनेकांनी व्यक्त केली. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी हजेरी लावली. पाटील यांनी यावेळी वाचकांशी मनमोकळा संवाद साधला. संभाजीसह इतर पुस्तकांच्या निर्मितीची प्रक्रिया आणि लेखनाचे अनुभव सांगत वातावरणात अनोखी रंगत आणली; पण प्रत्यक्ष संमेलनाचं

व्यासपीठच अशा उपक्रमांपासून दूर असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. संमेलनाच्या आयोजनाच्या वेळी सर्जनशीलांकडे होणारं दुर्लक्ष आणि आयोजनातल्या भपकेबाजपणावर पाटील यांनी सडेतोड टीका केली.

यंदा संमेलनात कवितेला मात्र विशेष गौरवलं गेलं, ही जमेची बाजू. गझलसाठी स्वतंत्र कक्ष उभा करून नव्या उपक्रमाची सुरुवात झाली. याचा राज्यातल्या अनेक गझलकारांनी आस्वाद घेतला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं ग्रंथविक्री दालन हे प्रत्येक वाचकाच्या आस्थेचा विषय; पण इथल्या आयोजनातही सावळा गोंधळ अनुभवाला आला. एकाच प्रकाशनाला वेगवेगळ्या ठिकाणी दालनं देऊन जेवढा विक्रेत्यांचा गोंधळ उडवण्यात आला, तितकाच वाचकांनाही मनस्ताप झाला; पण तरी या दालनाकडे दर्दी वाचकांचा ओघ कायम राहिला. असंख्य अडचणी आणि त्राग्यातूनही इथली देवाण-घेवाण वाखाणण्याजोगी होती. त्यामुळे संमेलनातला किमान हा विभाग यशस्वी झाला. साहित्य संमेलन आलं आणि गेलं. साहित्यात मुशाफिरी करणारे आपापल्या वाटांवर आपापल्या प्रवासात व्यस्तही झाले; पण या साहित्य यात्रेच्या पुढच्या टप्प्यावर पुन्हा नव्या अपेक्षा फुलतील. त्या अपेक्षांचा आयोजकांकडून रास्त विचार झाल्यास संमेलनाच्या आयोजनातल्या सुसूत्रतेला हातभारच लागेल. फक्त त्यासाठी संमेलन आयोजकांकडून साहित्य क्षेत्राचा केंद्रबिंदू असणाऱ्या बुद्धिजीवी वर्गाकडे दुर्लक्ष होता कामा नये.

आवर्जून वाचावे असे काही





RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 Mar, 2017. Posting Date : 11 Mar, 2017.

आवर्जून वाचावे

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.